# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक – १६

## सभावृत्तांत

दिनांक – २०.०४.२०१३ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे एप्रिल-२०१३ची मा.महापालिका सभा शनिवार दि.२०.०४.२०१३ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
२. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.थोरात वनिता एकनाथ
१०. मा.सायकर अजय शंकरराव
११. मा.जाधव साधना रामदास
१२. मा.आल्हाट मंदा उत्तम
१३. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१४. मा.काळजे नितीन प्रताप
१५. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१६. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१७. मा.उल्हास शेट्टी
१८. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
१९. मा.पवार संगीता शाम
२०. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२१. मा.तानाजी विठ्ठल खाडे
२२. मा.बो-हाडे शुभांगी संजय
२३. मा.भारती फरांदे
२४. मा.आर.एस.कुमार
२५. मा.जावेद रमजान शेख
२६. मा.चारुशीला प्रभाकर कुटे
२७. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
२८. मा.पांढरकर निलेश शंकरराव
२९. मा.नंदा विकास ताकवणे
३०. मा.नेटके सुमन राजेंद्र
३१. मा.तरस बाळासाहेब जयवंत
३२. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३३. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३४. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
३५. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३६. मा.लोंढे गणेश नारायण
३७. मा.शमीम पठाण
३८. मा.†›.संदीप गुलाब चिंचवडे
३९. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
४०. मा.अपर्णा निलेश डोके
४१. मा.अनंत सुभाष को-हाळे
४२. मा.जयश्री वसंत गावडे
४३. मा.अविनाश (दादा) टेकावडे
४४. मा.काळभोर वैशाली जालिंदर
४५. मा.सौ.साळुंके सविता सुरेश
४६. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
४७. मा.मडिगेरी वर्षा विलास
४८. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
४९. सौ.गवळी सुनिता (ताई) पांडूरंग
५०. मा.सुपे आशा रविंद्र
५१. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५२. मा.अजित दामोदर गव्हाणे
५३. मा.गोफणे अनुराधा देविदास
५४. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
५५. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
५६. मा.महेशदादा किसन लांडगे
५७. मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
५८. मा.लोंढे शुभांगी संतोष
५९. मा.विश्वनाथ विठोबा लांडे
६०. मा.ननवरे जितेंद्र बाबा
६१. मा.सावळे सिमा रविंद्र
६२. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
६३. मा.भोसले राहूल हनुमंतराव
६४. मा.पालांडे सुजाता सुनिल
६५. मा.बहल योगेश मंगलसेन
६६. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
६७. मा.छाया जगन्नाथ साबळे
६८. मा.कदम सदगुरु महादेव
६९. मा.कैलास महादेव कदम
७०. मा.छाया जगन्नाथ साबळे
७१. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास
७२. मा.चाबुकस्वार गौतम सुखदेव
७३. मा.आसवाणी सविता धनराज
७४. मा.वाघेरे सुनिता राजेश
७५. मा.आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम
७६. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
७७. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
७८. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
७९. मा.काळे विमल रमेश
८०. मा.पाडाळे निता विलास
८१. मा.विनोद जयवंत नढे

८२. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
८३. मा.कैलास गबाजी थोपटे
८४. मा.विमलताई सुरेश जगताप
८५. मा.बारणे निलेश हिरामण
८६. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
८७. मा.बारणे माया संतोष
८८. मा.ओव्हाळ शेखर अशोक
८९. मा.यमुनाताई रमणनाना पवार
९०. मा.कलाटे स्वाती मयुर
९१. मा.नांदगुडे विलास एकनाथ
९२. मा.चौंधे आरती सुरेश
९३. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
९४. मा.बोकड रामदास गेणभाऊ
९५. मा.जवळकर वैशाली राहुल
९६. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
९७. मा.जगताप राजेंद्र गणपत
९८. मा.शितोळे शैलजा बाबुराव
९९. मा.जगताप नवनाथ दत्तु
१००. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
१०१. मा.जम सोनाली पोपट
१०२. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
१०३. मा.काटे रोहितअप्पा सुदाम
१०४. मा.गायकवाड संध्या सुरदास
१०५. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
१०६. मा.मोटे किरण बाळासाहेब
१०७. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
१०८. मा.संजय केशवराव काटे
१०९. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब
११०. मा.पाटील सुजित वसंत
१११. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.डॉ.श्रीकर परदेशी-आयुक्त, मा.प्रकाश कदम-अति.आयुक्त, मा.टेकाळे, मा.झुरे- सहा.आयुक्त, मा.पवार, मा.मुंढे, मा.कुलकर्णी, मा.दुरगुडे सहा.आयुक्त, मा.घाडगे-मुख्यलेखापरिक्षक, मा.गावडे-नगरसचिव, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.भोसले-मुख्यलेखापाल, मा.भदाणे-उपसंचालक (नगररचना), मा.दुधेकर, मा.सवणे, मा.तांबे, मा.शरद जाधव, मा.साळवी, मा.पठाण, मा.लडकत, मा.पिरजादे, मा.सय्यद-कार्य.अभियंता, मा.कांबळे-प्र.शिक्षणाधिकारी(माध्य.), मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक, मा.चव्हाण-आरोग्य कार्यकारी अधिकारी, मा.पोमण-संगणक अधिकारी, मा.इंदलकर-कामगार कल्याण अधिकारी, मा.जराडे-सुरक्षा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर:-** उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

प्रतिक्षा दत्तात्रय थोरात (४०० मी.शर्यत ब्राँझपदक), तुषार शेखर लांडगे, चिंचवड ज्येष्ठ नागरीक संघ, प्राधिकरण निगडी, पराग पाटील-जागतिक एथलेटिक स्पर्धा, ऐश्वर्या धर्माजी शिंदे-कबड्डी स्पर्धेत ३ सुवर्णपदक, तेजस दत्तात्रय चव्हाण-व्हिडीओ डायरेक्टर/संगीतकार यांचा मा.महापौर, मा.अति.आयुक्त, मा.पदाधिकारी, मा.गटनेते, मा.नगरसेवक यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

मेजर उदय जराडे, सुरक्षा अधिकारी यांचा मा.महापौर, मा.महापालिका आयुक्त यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

-----------

**मा.विनोद नढे :-** मा.महापौर साहेब, स्वातंत्र्यपूर्व काळातील ज्येष्ठ कामगार नेते कै.नारायण मेघाजी लोखंडे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ नारायण मेघाजी लोखंडे प्रतिष्ठाण, मुंबई यांचेवतीने कामगार क्षेत्रात उल्लेखनीय व भरीव कार्य केल्याबद्दल शिरोळ,कोल्हापूर येथे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते व कामगार नेते कैलास महादेव कदम यांना मा.ना.शरदचंद्रजी पवारसाहेब व मा.ना. पृथ्वीराजजी चव्हाण साहेब यांच्या शुभहस्ते व मा.ना.बाळासाहेब थोरात, मा.ना.जयंतराव पाटील, मा.ना.हसन मुश्रीफ, मा.ना.सतेज पाटील, मा.खा.कल्लाप्पाण्णा आवाडे व मा.माजी खा.श्रीमती निवेदिता माने यांच्या उपस्थितीत कामगार क्षेत्रातील समर्पित कार्यकर्ता पुरस्कार देण्यात आला.

कै.नारायण मेघाजी लोखंडे हे पुणे जिल्ह्याचे भुमीपुत्र असल्याने त्यांच्या नावे दिला जाणारा हा बहुमोल पुरस्कार प्रथमच कैलास कदम यांच्या माध्यमातून पिंपरी चिंचवड शहराला मान मिळाला आहे. म्हणून मनपा सभेत त्यांचे अभिनंदन करण्यात यावे अशी सूचना करतो.

**मा.राजेंद्र काटे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

(मा.कैलास कदम यांचा मा.महापौर, मा.महापालिका आयुक्त यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.)

**मा.उल्हास शेट्टी** – मा.महापौर साहेब, आपले सहकारी मा.शत्रुघ्न (बापु) काटे यांचा आज वाढदिवस आहे. त्यांचा सुद्धा वाढदिवसाच्या निमित्ताने सत्कार करण्यात यावा.

**मा.शांताराम भालेकर** – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन देत आहे.

(मा.शत्रुघ्न (बापु) काटे यांचा सत्कार करण्यात आला.)

**मा.शांताराम भालेकर** – मा.महापौर साहेब, महापालिकेने ठरविल्याप्रमाणे अनाधिकृत बांधकामावरील कारवाई मा.न्यायालयीन आदेशाचा अवमान न होता व सर्वसामान्य नागरीकांना कारवाईपर्यंत दुसरीकडे स्थलांतर होणेकरीता संधी दिली जात नाही. त्यामुळे घरगुती बांधकामांना (बी-३ दर्जाच्या) नोटीसा दिल्या जातात व कारवाई केली जाते. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना कौटुंबिक, आर्थिक, मानसिक त्रास होत आहे. त्यामुळे याचा सहानुभूतीपूर्वक विचार करणेकरीता ही सभा तहकूब करण्यात यावी अशी विनंती करतो.

**मा.गोरक्ष लोखंडे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देतो.

**मा.महापौर** – आजची सभा दि.४/५/२०१३ पर्यंत दुपारी २.०० वा. पर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

(मोहिनीताई विलास लांडे)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक - १६**

**(दिनांक २०/४/२०१३ ची तहकूब सभा)**

**सभावृत्तांत**

दिनांक - ०४/०५/२०१३ वेळ - दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे एप्रिल २०१३ ची तहकूब मा.महापालिका सभा बुधवार दिनांक ०४/०५/२०१३ रोजी दुपारी २.०० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
२. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.सायकर अजय शंकरराव
१०. मा.जाधव साधना रामदास
११. मा.जाधव राहुल गुलाब
१२. मा.आल्हाट मंदा उत्तम
१३. मा.काळजे नितीन प्रताप
१४. मा.विनया प्रदीप (आबा) तापकीर
१५. मा.जगदीश शेटटी
१६. मा.बाबर शारदा प्रकाश
१७. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१८. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१९. मा.उल्हास शेट्टी
२०. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

२१. मा.पवार संगीता शाम
२२. मा.तानाजी विठ्ठल खाडे
२३. मा.बो-हाडे शुभांगी संजय
२४. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित
२५.मा.भारती फरांदे
२६. मा.आर.एस.कुमार
२७.मा.जावेद रमजान शेख
२८. मा.चारुशीला प्रभाकर कुटे
२९. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
३०. मा.नंदा विकास ताकवणे
३१. मा.नेटके सुमन राजेंद्र
३२. मा.तरस बाळासाहेब जयवंत
३३. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३४. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३५.मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३६. मा.शमीम पठाण
३७.मा.†›.संदीप गुलाब चिंचवडे
३८. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
३९. मा.अपर्णा निलेश डोके
४०. मा.अनंत सुभाष को-हाळे
४१. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४२. मा.काळभोर वैशाली जालिंदर
४३ मा.शेख अस्लम शौक
४३. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
४४. मा.मासुळकर समीर मोरेश्वर
४५. मा.मडिगेरी वर्षा विलास
४६. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
४७. मा.सौ.गवळी सुनिता(माई) पांडूरंग
४८. मा.सुपे आशा रविंद्र
४९. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५०. मा.अजित दामोदर गव्हाणे
५१. मा.गोफणे अनुराधा देविदास
५२. मा.जालिंदर (बाप्पू) शिंदे
५३. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
५४. मा.महेशदादा किसन लांडगे
५५. मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
५६. मा.लोंढे शुभांगी संतोष
५७. मा.विश्वनाथ विठोबा लांडे
५८. मा.सावळे सिमा रविंद्र
५९. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
६०. मा.पालांडे सुजाता सुनिल
६१. मा.बहल योगेश मंगलसेन
६२. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
६३. मा.कदम सदगुरु महोदव
६४. मा.गिता सुशील मंचरकर
६५. मा.कैलास महादेव कदम
६६. मा.छाया जगन्नाथ साबळे
६७. मा.चाबुकस्वार गौतम सुखदेव
६८.मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
६९.मा.ऊषा संजोग वाघेरे (पाटील)
७०.मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
७१.मा.काळे विमल रमेश
७२. मा.पाडाळे निता विलास
७३. मा.विनोद जयवंत नढे
७४. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
७५. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
७६.मा.विमलताई सुरेश जगताप
७७. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
७८. मा.बारणे निलेश हिरामण
७९.मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८०.मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे
८१. मा.बारणे माया संतोष
८२.मा.ओव्हाळ शेखर अशोक
८३.मा.यमुनाताई रमणनाना पवार
८४.मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
८५. मा.कलाटे स्वाती मयुर
८६.मा.नांदगुडे विलास एकनाथ
८७. मा.चौंधे आरती सुरेश
८८.मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
८९.मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे
९०.मा.बोकड रामदास गेणभाऊ
९१. मा.जवळकर वैशाली राहुल
९२.मा.जगताप राजेंद्र गणपत
९३.मा.शितोळे शैलजा बाबुराव
९४.मा.जगताप नवनाथ दत्तू
९५.मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
९६.मा.अतुल अरविंद उर्फ नानासाहेब शितोळे
९७.मा.जम सोनाली पोपट
९८.मा.प्रशांत शितोळे
९९.मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
१००. मा.काटे रोहितअप्पा सुदाम
१०१. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
१०२. मा.शेंडगे आशा सुखदेव
१०३. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
१०४. मा.संजय केशवराव काटे
१०५. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती
१०६. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब
१०७. मा.पाटील सुजित वसंत
१०८. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.डॉ.श्रीकर परदेशी-आयुक्त, मा.मुंढे, मा.कारचे, मा.कुलकर्णी, मा.दुरगुडे–सहा.आयुक्त, मा.घाडगे-मुख्यलेखापरिक्षक, मा.गावडे-प्र.नगरसचिव,

मा.कांबळे-प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.चव्हाण - सहशहर अभियंता, मा.भोसले-मुख्यलेखापाल, मा.गायकवाड-प्र.आरोग्य वैद्य.अधिकारी, मा.भदाणे-उपसंचालक (नगररचना), मा.दुधेकर, मा.निकम, मा.सवणे, मा.इंगळे, मा.चव्हाण, मा.शरद जाधव, मा.तांबे, मा.साळवी, मा.कुलकर्णी, मा.लडकत, मा.पिरजादे, मा.दांगट, मा.सय्यद-कार्य.अभियंता, मा.कांबळे -प्र.शिक्षणाधिकारी (माध्य.), मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक, मा.चव्हाण - आरोग्य कार्यकारी अधिकारी, मा.पोमण-संगणक अधिकारी मा.लावंड - कायदा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर**:- उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

(श्रीकांत चौगुले, भारती मोहनलाल परदेशी यांचा सत्कार करण्यात आला.)

**मा.दत्ता साने** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, एक गोष्ट आपल्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे, राष्ट्रवादीची प्रेस कॉन्फरन्स झाली होती. त्यात आयुक्तांनी लिहीले आहे, राजकारण्यांकडून बागुलबुवा होतो आहे. आम्हाला या शब्दाचा अर्थ समजला नाही. आपण प्रेसला स्टेटमेंट देता. आपण दिलेल्या स्टेटमेंटबाबत मी सभागृहाच्या वतीने निषेध व्यक्त करु इच्छितो. आदरणीय मुख्यमंत्री, आदरणीय शरद पवार, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे प्राधिकरणामध्ये आले असताना त्यांनी आपल्याला ठोस रहा,सबुरीने वागा, असा कानमंत्र दिला असताना सुद्धा आपण या कारवाईचा कारभार चालविला आहे. हे खरेतर निंदनीय आहे. लोकांचे नळ कनेक्शन तोडून, ड्रेनेज लाईन बंद करण्याचा जो काही कार्यक्रम चालविला आहे तो खरेतर सभागृहाला मान्य नाही. हे सर्व करत असताना आपण असे सांगताय, राजकारण्यांकडून बागुलबुवा होतो आहे. हे यातून समजायला तयार नाही. आपल्याला विनंती आहे, सभागृहात निर्णय घेत असताना हा निर्णय महापौरांनी जाहीर करायचा असतो. कोणताही सार्वजनिक उपक्रम राबविला तर तो महापौरांनी जाहीर करायचा असतो. आयुक्त जाहीर करत नसतात. आयुक्त महापौर झालेत का काय असे वाटायला लागले आहे. महापौर आपला पदभार विसरलेल्या आहेत. महापालिकेची कोणतीही योजना असो, महापौर असो, पक्षनेते असो, सभागृहाचे विरोधी पक्षनेते असो, सभागृहातील नेते मंडळींनी खरेतर डिक्लेअर करायचे असते.

पिंपरी चिंचवडमध्ये उलटा कारभार चालला आहे. मनमानी कारभार कुठेतरी थांबवणे गरजेचे आहे. २०१२-१३ मध्ये आपला खरेतर फक्त ११ % खर्च झालेला आहे. आज मी नगरसेवक होऊन १४ महिने झाले आहेत. कोणत्याही वॉर्डातील कसलेही काम आयुक्त महाशयांना करायची आहे का नाही माहीत नाही. सर्व अधिका-यांनी जास्त कनेक्शन तोडा, जास्त नोटीसा द्या, जास्त पंचनामे करा. स्थापत्य विभागाचे सर्व अधिकारी अनधिकृत बांधकामे पाडण्यात जुंपले गेले आहेत. कामाचे एस्टिमेट तयार करताना नवीन नियम काढले. ज्याठिकाणी काम करायचे, त्याठिकाणीच तोडफोड करायला जात आहेत. १० कि.मी.चा रस्ता करण्यासाठी बजेट मंजूर केले असले तरी स्थापत्य, आरोग्य कोणतेही काम चालू नाही. सर्व नगरसेवक निवडून आले आहेत. माझी विनंती आहे, हे सभागृह प्रशासनाला चालवायला द्यावे. जे.ई. यांनी नगरसेवक व्हावे. आयुक्तांनी महापौर बनून सभागृह चालवावे. आम्ही घरी बसून राहतो आणि नागरिकांना सांगतो, १५ दिवसांत काम होईल. १४ महिन्यांत वॉर्डातील कोणतेही काम झाले आहे का? कोणतेही नवीन काम चालू नाही. अशा माध्यमातून मे महिना आला, उद्या जून महिना येईल. ७ जूननंतर पाऊस चालू होतो. नाल्यांची साफसफाई इतर माध्यमातून कामे करावीत हे आयुक्त महाशयांना सांगावे लागेल. आरोग्य विभागाच्या अधिका-यांना विचारले तर ते म्हणतात, आज करु, उद्या करु. जर काही वेगळे घडले तर आपल्याकडे यंत्रणा सुद्धा नाही. आपल्याकडे एकच जेट मशिन असताना उद्या कमीतकमी दहा वॉर्डामध्ये नदीनाल्याचे पाणी गेलेतर वेगळा प्रसंग घडेल. दुर्घटना घडलीतर प्रशासन किंवा आयुक्त नाल्यांची साफसफाई करणार? आम्ही घरी बसून सांगू. प्रशासनाने सभागृह चालवावे. सभागृहात काम करत नसालतर, काही करायचे नसेलतर नक्की तुमच्या मनात काय आहे? ठिक आहे, अनधिकृत बांधकामाबाबत कोर्टाचे आदेश आहेत हे आम्हाला मान्य आहे. सगळेच अनधिकृत बांधकामाचे काम करणार आहेत का? नगरसेवकांच्या वॉर्डातील कामे करणार नाहीत का? आम्हाला वॉर्डातील नागरीकांना काही सांगता येत नाही. आमच्यासमोर नाले वाहतात, खराब झाले आहेत. सगळ्या ठिकाणी बोंब होते. कोणत्याही वॉर्डात पावसाळ्यात एकसारखी साफसफाई झाली पाहीजे, का करत नाही. धोरणात्मक कामे सोडून फक्त एकच काम चाललेले आहे असे ठरवून आला आहात का? मला फक्त अनधिकृत बांधकामे पाडायची आहेत. आमचा विषय आहे. या लोकांना कोण सूचवतो? त्यांनी अनधिकृत बांधकामे पाडायची, त्यांनी आमची कामे करायला यायचे. उद्या कोणाला काही केलेतर त्याला जबाबदार कोण आहे? चुकीचा मेसेज चालला आहे. कामाचा ठसा दाखवा. शहरात काहीतरी चांगले काम

केले, अशा माध्यमातून दाखवा अशी विनंती आहे. आज शहरात चांगली कामे केल्यावर त्यावेळी सभागृहाला सांगू इच्छितो. आयुक्त महाशयांनी नवीन नियम काढला आहे. काम करायचे असेलतर, ड्रेनेजचे काम करायचे असेल तर वेगळ्या ठिकाणी वापरु शकतो. आत्ता तसे काम करता येणार नाही. असा आयुक्तांनी नियम काढला आहे. त्याच कामात या निधीचा वापर करायचा. निदान एका गल्लीतून दुस-या गल्लीत सुद्धा काम नेता येणार नाही. महापालिकेत नवीन पायंडा पाडण्याचा प्रयत्न केलेला आहे. खरेतर चुकीचे आहे. २ कि.मी. रस्ता त्यातील अर्धा कि.मी. रस्ता डांबरीकरण करायचा ठरला आहे. हे काम दुस-या गल्लीत नेऊ शकत होतो. आत्ता तसे करता येत नाही. एस्टीमेटला वेळ घालवून, कामाला वेळ घालवून, कामाची गती मंदावून पुन्हा निधी घेऊन वेगळ्या कामासाठी वापरायचा का काय**?** जेएनएनयूआरएमचा फंड मिळाला नाही म्हणून हा निधी द्यायचा आहे का**?** शून्य टक्के निधी आहे. नक्की डोक्यात काय विचार आहे**?** आम्हा लोकांना सांगा. आयुक्तांचा, प्रशासनाचा निर्णय झाला आहे. वॉर्डात ५ वर्षांत कामेच होणार नाहीत असे सांगायला होईल. आमचा भाग ग्रामीण भाग आहे. सुखसुविधा पुरवल्या नाहीत. हा विषय बाजूला केलातर ग्रामिण भागाला भरपूर निधी, किती निधी टाकला कोणाला माहित नाही. कामे का सुरु होत नाहीत**?** अधिका-यांना विचारले आहे का. मिटींग घेतल्याबरोबर वॉर्डातील कामे किती, टीडीआर किती, एस्टीमेट किती, फौजदारी किती हे काय चालले आहे. शहरात एवढी कामे आहेत का. आपल्याकडून वेगळी अपेक्षा आहे. दुसरी माध्यमे आहेत. नगरसेवक निवडून आलातर त्याला विचारायला नागरीक आहेत. आयुक्तांना हेच कळत नाही. असे सांगायचे का. खरेतर अशी नोट देणे योग्य नाही. आयुक्तांनी पूर्णपणे आमदार, नगरसेवक यांना जेव्हा टार्गेट केले, स्वतःची पॉवर वाढवायचे काम करत आहेत. निंदनीय बाब आहे. हे सगळे सांगितले, या माध्यमातून आपण विचार करावा. अन्यथा हे सभागृह जोपर्यंत आमच्या वॉर्डातील कामे सुरु होत नाहीत, तोपर्यंत कुठलीही सभा चालू होऊ देणार नाही असे या निमित्ताने सांगतो.

**मा.प्रशांत शितोळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आमचे आदरणीय दत्ता साने यांनी वेगळ्या विषयाला सुरुवात केली आहे. शहरातील परिस्थिती हे वेगळे सांगायला नको. प्रत्येकाला कळते. खरेतर पेपर पाहिल्यानंतर प्रत्येक राजकीय व्यक्तीला, आमच्यासारख्या निवडून आलेला पदाधिकारी, आमच्यासारखा लोकनियुक्त प्रत्येकाला ज्याला राजकारण कळते, त्या प्रत्येक व्यक्तीला वाईटच वाटणार. तुम्ही

पेपर पाहिलातर राजकारण्यांकडून बागुलबुवा होतो आहे असेच हेडींग आले होते. एवढ्या बांधकामांबाबत हे शहर एवढ्या बांधकामांमुळे बकाल होत चालले आहे असा प्रशासन व आयुक्त यांचा समज असेल तर सभागृहात बराच सुर सारखा आहे. हे शहर चांगल्या पद्धतीने विकसित सुद्धा झालेले आहे. या विकासाचे साक्षीदार या सभागृहात अनेक नगरसेवक आहेत. त्यांचा प्रत्यक्ष हातभार या विकासात आहे. परंतू डॉ.श्रीकर परदेशी यांनी आयुक्त पदाची सुत्रे जेव्हापासून हातात घेतली, त्यानंतर कोणताही भरीव विकास झाल्याचे दिसले नाही. परंतू शहरातील नागरीकांना चांगल्या पद्धतीने खेळावे लागणार. उच्च न्यायालयाचा आदर राखायचा, त्यांच्या आदेशाचे पालन करायचा प्रयत्न केला हे नक्कीच चांगले आहे. जेणेकरुन भविष्य त्यांना दिसत असणार. शहरात बकाल वस्ती होणार नाही, सोयीसुविधांवर ताणतणाव येणार नाही याच्यासाठी बरीचशी पाऊले उचलली आहेत. हे करत असताना इतर गोष्टींकडे लक्ष दिले गेले पाहीजे. तुमच्याकडून शहरातील अनधिकृत बांधकामांवर कारवाई होण्याबरोबरच लोकांना लागणा-या इतर सुखसुविधा यासंदर्भात परिपूर्ण असले पाहीजे. याकडे सुद्धा लक्ष दिले गेले पाहीजे असे माझ्यासारख्याला वाटते. पेपरमध्ये वाचतोय, अनेक अराजकीय,सामाजिक संस्था पाठिंबा देणार आहेत. तुम्ही कुठेतरी चांगले काम करत आहात. आपल्या कारकीर्दीत हे काम करत असताना या कामाबरोबरच आपल्याकडे चांगल्या प्लॅनिंगची, ठोस नियोजनामागच्या नजरेची, जी तुमच्याकडे अभ्यासू प्रवृत्ती आहे. त्या दृष्टीकोणातून शहराचा विकास झाला पाहीजे. सगळ्या सुविधा दिल्या गेल्या पाहीजेत. मला वाटत नाही, आपल्याकडून केवळ पुढील बजेटला शहरात कामे केली जावीत. तुम्ही आल्यापासून खुप मोठा कार्यक्रम, धोरण, प्रत्येक हेडबरोबर कार्यक्रम घेतला. तुमचा या कामात संबंध नाही. तुम्ही फक्त खुर्चीवर बसलेले आयुक्त आहात. उदघाटन तुमच्या काळात झाले. १० वर्षांपूर्वी त्या सायन्स आणि टेक्नॉलाजी पार्क कमिटीत मा.मंगलाताई कदम,मा.योगेश बहल होते. त्यावेळचे त्यांचे प्लॅनिंग प्रविण तुपेंकडे होते. शहरात सायन्स अ ण्ड टेक्नॉलॉजी पार्क असावे. शहरातील मुलांना विज्ञान कळावे, यातून ही संकल्पना पुढे आली. प्रविण तुपे यांनी अनेक वेळा या प्रकारचे दौरे केले. त्यातून हे उभे राहीले आहे. महापालिकेच्या अधिका-यांच्या प्रयत्नांतून हे खरेतर उभे राहीले आहे. अनेक चांगल्या गोष्टी ७ ते ८ वर्षात उभ्या राहील्या आहेत. पुणे-मुंबई रस्ता, बर्ड व्हॅली, भोसरी सहल केंद्र, शिवसृष्टी उद्यान असू द्या. शहरात अनेक गोष्टी उभ्या राहत असताना कधी कायदा जाचक आहे म्हणून कामाला टाळा बसला असे कधी दिसले नाही. जो कायदा आपण वापरतोय, तो जाचक वाटत असेल तर, शहरातील

कामे होत नसतील तर तो कायदा काय कामाचा आहे? अतिशय चांगली कामे करायची आहेत. नवीन पद्धतीने कामे करत असताना प्रेझेंटेशनच्या वेळी सर्व गटनेते, सर्व पक्षांचे लोक होते. त्यावेळी तुम्हाला म्हटले होते, मा.मंगलाताईंनी सांगितले, आमचे काम नाही, प्रशासनाचे काम आहे. नको त्या गोष्टी नगरसेवकांसमोर ठेवायच्या, पाहीजे त्या गोष्टींची अंमलबजावणी करायची. हे मात्र कुठेतरी थांबले पाहीजे. आयुक्त म्हणून महापौर पाहीजेत. प्रोटोकॉल याबाबत आम्हाला सांगायची गरज आहे असे वाटत नाही. महापौर हा शहराचा प्रथम नागरीक असतो. पर्यायाने सुविधांबाबत त्याने पब्लिकमध्ये डिक्लेअर करावे. शंभर टक्के हा महापौरांचा अधिकार आहे. इथून पुढे कोणतीही योजना आयुक्तांनी डिक्लेअर करायची नाही, असा महापौरांनी आदेश द्या. आयुक्तांनी हा प्रोटोकॉल पाळला पाहीजे. संपूर्ण प्रशासन किंवा आमच्यासारखा राजकीय पुढा-यांना महापौर हा महापौरच असतो. त्यांचा प्रोटोकॉल आयुक्तांना समजला पाहीजे. आयुक्तांनी रु.१०,०००/- दंड ठोठवून लोकांची बांधकामे नियमित करावीत म्हणून सांगायचे. महापौरांनी डिक्लेअर करायचे, दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. आयुक्तांनी ऑन लाईन सुखसुविधा डिक्लेअर करायच्या हे बरोबर नाही. सगळ्या सुविधा देत असताना महापौरांनी या शहरात राष्ट्रवादीचा कार्यकर्ता म्हणून सांगतो, या महापालिकेत आमची एकहाती सत्ता आहे. सर्व पक्षांचा निर्णय असेलतर पक्षाच्या माध्यमातून हे सांगणे गरजेचे आहे. कोणतीही योजना आणताना सक्षम समितीची मान्यता लागते, तशी महासभेची सुद्धा मान्यता लागते. योजना डिक्लेअर करत असताना तांत्रिक बाबी तपासल्या पाहीजेत. कायदेशीर चुका होऊ नयेत. नागरीकांना अडचण होऊ नये. कामे व्यवस्थित केली जावीत हे प्रशासनाचे काम आहे. तुमचे सुद्धा नियंत्रण ठेवावे. आम्ही भारतीय संविधानातून निवडून आलेलो आहोत. आमच्या मनातून गेलो, आमच्या-आमच्या मतप्रवाहातून वाहत तुमच्यापर्यंत आलो अशातला भाग नाही. ज्यापद्धतीने चांगली कामे करतो, तुमचा प्रभाव केवळ अनधिकृत कामांवर नसावा. अधिकृत कामांवर सुद्धा असावा. हे एवढे जाचक नसावे. आपल्याकडे टेंडरची माहिती दिली. कोणतीही जागा महापालिकेच्या ताब्यात आल्याशिवाय काम केले जाणार नाही. किती टक्के जागा ताब्यात आहेत. ८० टक्के ताब्यात असतील तरच काम होईल. पहिला हा प्रश्न आलातर आपोआप १०० कामे २० किंवा ५० वर आलीतर कामेच होणार नाहीत. १००% कामे होणार नाहीत. जे जे नगरसेवक त्या त्या वॉर्डात प्रत्येक ठिकाणी परिस्थीती वेगळी आहे. हातापाया पडून जागा ताब्यात देतोय. अनेक लोकांनी मोबदला घेतलेला नाही. तुम्ही मोबदला देत

नाही. जागा ताब्यात घेऊन सुद्धा आज सुद्धा अनेक लोकांनी टीडीआर घेतला नाही. ज्यांनी पैसे मागितले त्यांना पैसे तरी देऊ शकतो का, त्यांना पैसे द्यायला पाहीजेत. एवढे १५० कोटी द्यायला २ वर्षे लावली. पूर्ण शहरातील जागा ताब्यात देऊ शकतो. जागा ताब्यात घेऊ शकतो का. ताब्यात आलेल्या आरक्षणांवरची अतिक्रमणे काढता येत नाहीत. नवीन जागा ताब्यात घेऊन डेव्हलप करायचे म्हणताय. प्रॅक्टीकली सुद्धा विचार करा. कितपत शक्य आहे. प्रत्येक गोष्ट बी.पी.एम.सी. †क्ट पाहून शंभर टक्के यशस्वी झालेली दिसणार नाही. कुठेतरी नागरीकांना विश्वासात घेतले पाहीजे. अधिका-यांना विश्वासात घेतले पाहीजे. सभागृहाला विश्वासात घेतले पाहीजे. असा दृष्टीकोण ठेवला तर कामात नक्की १०० टक्के यश येईल असे वाटते. प्रशासनाला १५ दिवसांपूर्वी आदेश दिला, आदेश दिला का धमकी दिली हे कळाले नाही. तुमच्या अधिका-यांना तीन वर्षे जेलमध्ये जावे लागणार आहे. ढोस देताय. कायद्यात इतक्या तरतूदी आहेत. कोणतेही काम करु शकणार नाही. तुम्ही आल्यावर कायदा तयार झाला अशी बात नाही. आम्ही नागरीक कायद्यासाठी का कायदा नागरीकांसाठी हे बघितले पाहीजे. शहरात कामे नाहीत. या महापालिकेत प्रशासनाकडून कामे करुन घेत असलो तरी कामात ठोस बदल केला पाहीजे. लोकनियुक्त पदाधिकारी, नगरसेवकांना, सभागृहाला विश्वासात घेतले पाहीजे. बाहेर आम्ही पेपरमध्ये वाचले,सी.एम. यांनी तुमची पाठ थोपटली. अनधिकृत बांधकामांसाठी केलेली कारवाई हा आय.ए.एस. लॉबीचा भाग आहे. चांगले नाव केले ठिक आहे. न्यायालयाचा अवमान न करता आदेशाचे पालन केले. राजकीय दबाव आणता. पण हे तुमचे काम नाही का? तुमची लॉबी नाही का. केवळ राजकीय लोकांवरच दबाव आणत आहात. शहर सगळे तुमचे लोकच करतात. आमदार, खासदार करत नाहीत. सी.एम. यांना प्रत्यक्ष भेटून सांगा, आमच्याकडे अशी अशी अडचण आहे. २,००० बांधकामे पाडावी लागतील. हे करताना केवळ राजकीय लोकांनाच फक्त दोषी धरु नका. सगळे निर्णय आम्ही राजकारणी घेत नाहीत. जवळपास ५० ते ६० हजार बांधकामे पाडायची का हे बघितले पाहीजे. वरुन कसे काम करायचे हे तुमचे काम आहे. आमचे किती तीन आमदार आहेत. त्यांनी त्यांच्या त्यांच्या पातळीवरुन प्रयत्न करत असताना तुमच्यासारखा आय.ए.एस. अधिका-याने काय करायचे. तुम्हाला निर्णय घेता आला पाहीजे. केवळ हा निर्णय होत नाही म्हणून कारवाई करावी लागेल. मला असे वाटते, तुमचा अभ्यास, तुमच्या अधिका-यांना मॅनेज करुन तुमचा पॅटर्न करा. आम्ही म्हणतो, परदेशी पॅटर्न दाखवा. परदेशींनी पाडले असे नको. परदेशींनी घडवले असे पाहीजे. आमच्या

आयुक्तांनी ही कामे केली. तुमच्या बदल्यामध्ये इंटर्नल कामात कोणी हस्तक्षेप केला नाही. किती अडचणींना सामोरे जावे लागते. तुमचे लोक एक महिनाभर काम करत नव्हते. येऊन काम करायला तयार नव्हते. अशाच पद्धतीने कामे होत असतील तर चुकीचे आहे. तुमच्या पद्धतीत बदल झाला पाहीजे. कामाचा वेग खूप चांगला आहे. तो चांगल्या पद्धतीने वापरलातर आम्ही सुद्धा रस्त्यावर उतरून अभिनंदन करु. आम्ही आमचे आत्मपरिक्षण करुन जगतोय का? शहरातील खूप लोक पाठिंबा देत आहेत. आम्ही एवढे कळकळीने सांगतोय. तुमचा झेंडा घेऊन शंभर टक्के आमच्या सारखी माणसे बाहेरुन पाठिंबा देतात. हे एकही घर नसेल. हे लोक आहेत, ते नियम ऐकणार. त्यातून आमचा राष्ट्रवादी काँग्रेस सत्ताधारी पक्ष आहे. विरोधी पक्षातील लोक पाठिंबा देणार असतील तर आम्ही सुद्धा त्यात सामिल व्हायला तयार आहोत. केवळ कोणतेही काम करु नका. तुमच्या बदलीसाठी शहरात चर्चा होण्याचे काहीच कारण नाही. मी म्हणतो, बदली करु नका. त्यासाठी तुम्ही काम करा. बदलीसाठी आंदोलन, आयुक्तांना पाठींबा, सह्यांची मोहीम आम्हाला काय गरज पडली. बंड साहेब इथे ४ वर्षे राहीले, कशासाठी, चांगली कामे केली म्हणून. त्यानंतर महापालिकेची तिजोरी खडखडीत झाली. त्यानंतर शर्मा साहेब आले त्यांना डेव्हलपर कधीच म्हटले नाही, कंट्रोलर म्हटले. शर्मा साहेबांनी पैशांचा वापर कसा करायचा हे पाहीले. दोन वर्षांनंतरची परिस्थिती काय असली तरी चांगल्या पद्धतीने शिकवण दिली. आज एस्टिमेटची अडचण नसून, खर्चायला पैसे असून कामे होत नाहीत. हे होणार नसेलतर उपयोग काय? २५% बजेट खर्ची होते. ४ वर्षांपूर्वीचा हिशोब सांगता. तुम्ही १००% करुन दाखवा. आम्हालासुद्धा परदेशी पॅटर्न बघायचा आहे. केवळ अधिका-यांना जबाबदार धरु नका. त्यांचे कॅप्टन तुम्हीच आहात. तुम्ही जसे चालाल, तसे ते चालणार. तुमचा आदेश त्यांना शिरसावंद्य आहे. आदरयुक्त भिती असावी. आमच्यासारख्या लोकांना सुद्धा कुठेतरी विचारात घेतले पाहिजे. तुमचे डिसिजन सर्वांना मान्य असावेत,सर्वांना पटणारे असावेत. आज अनेक प्रकल्प धूळखात पडलेले आहेत. त्याबाबत जो निर्णय घ्यायचा तो घ्या. प्रत्येक कामाला चांगल्या नजरेने पाहिले तर चांगले दिसेल, वाईट नजरेने पहाल तर वाईट दिसणार. माझ्या सारख्या छोट्या कार्यकर्त्याने हे सांगायची गरज नाही. आपण करत असलेले काम अतिशय चांगले आहे. केवळ पाडापाडीचे काम चांगले केले म्हणून परदेशी साहेबांनी मुंबईतील आय.ए.एस. अधिका-यांकडून पाठ थोपटून घेतली. असे ऐकण्यापेक्षा बंड साहेबांनी केंद्र शासनाकडून एवढे पैसे आणले. त्यासाठी पाठपुरावा लागतो. अनधिकृत कामांबरोबरच दुस-या कामांना सुद्धा पाठपुरावा ठेवा. चांगली

कामे दिसू द्यात. कोर्टाचा अवमान बिल्कूल झाला नाही पाहीजे. त्यांच्या आदेशाचा आदर राखणे तुमचे आमचे कर्तव्य आहे. बाकी कामे नाहीत का. नाहीतर अवघड आहे. ड्रेनेज लाईनबाबत अडचण होणार आहे. घाण रस्त्यावर येणार आहे. आरोग्याचा प्रश्न निर्माण होईल, रोगराई पसरेल. त्याची साफसफाई करावी. आयुक्त म्हणून तुम्ही एकटे जबाबदार राहणार आहात. सुविधा देणे तुमचे कर्तव्य आहे. पाणी, लाईट, रस्ता देणे आपले काम आहे. आमच्या नागरीकांना त्रास झालातर विरोध केला पाहीजे. असे आयुक्तांनी केले पाहीजे. हे आमच्यासारख्याला सांगायची गरज आहे का. काम करायचा आदेश नाही हे तुम्हीच मान्य केलेले आहे. सार्वजनिक टॉयलेट शहर भागात बांधणार आहोत. जिथे हॉल,मॉल,स्लम एरिया आहे, तिथे मलमूत्राची व्यवस्था करावी लागेल. ड्रेनेज सिस्टीमचा २५० ***MLD*** चा प्लान्ट आहे. सेप्टीक टँक बांधून ड्रेनेज कनेक्शन्स दिलेले आहेत. हजारो, कोट्यावधी रुपये खर्च झालेले आहेत. आरोग्याचा प्रश्न उपस्थित झालातर कोण काय करणार? सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला. ५ मजली बिल्डींग पाडायची. ५ महिन्यांसाठी स्टेऑर्डर होती. मुदत दिलेली होती, तोपर्यंत महापालिकेने जोडलेल्या सुविधा परत द्यायला लागल्या. आपण पाकिस्तानात रहात नाही, भारतात राहतो. सुविधा देणे आपले कर्तव्य आहे. तोडणे,फोडणे आपले काम नाही. बिघडवणे तुमचे काम नाही. आपले काम आहे घडवणे. या गोष्टी मा.महापौर तुम्ही लक्षात घ्या. याबाबत आदेश द्या, तुमचा प्रोटोकॉल तुम्ही पाळला पाहीजे. असे आयुक्तांनी कोणतेही डिक्लरेशन स्वतःहून करायचे नाही. महापौरांना बरोबर घेऊन सगळ्या योजनांचे डिक्लरेशन करायचे. सर्व प्रमुखांना योजना सांगितल्या पाहीजेत. याआधी असे कधी झाले नाही. अधिका-यांची मिटींग असेल तर तुम्ही सदस्यांना बसू देत नाही हे चुकते आहे. आम्ही देखील १२/१३ वर्षे इथे आहोत. असे कधीच झाले नाही. तुमच्या योजना तुमच्यापुरत्या मर्यादीत नाहीत. आमच्यासारखा लोकनियुक्त मनुष्य आलातर तो मिटींगमध्ये बसला पाहीजे. त्यांनी ऐकले नाही. तुम्हाला प्रेझेंटेशन द्यावे, का नाही म्हणता. योजना तुम्ही एकटे राबवत नाही. आमच्यासारख्यांकडे मान्यतेसाठी यावे लागते. मा.महापौरांना विनंती करतो, प्रत्येक योजनेबाबत तुम्हाला व सर्व पक्ष प्रमुखांना त्यांनी सांगितले पाहीजे. त्यावेळीच योजना डिक्लेअर झाली पाहीजे. धोरणात्मक कारवाई असू द्या. नागरीकांना सुखसुविधा देण्याचे असू द्या. राजकीय पाठबळाशिवाय लोकशाही चालू शकत नाही. प्रशासन व राजकारण एका गाडीची दोन चाके आहेत. आपण बोलत असताना ते बघतच नाहीत. त्यांना राजकारणी लोक आवडत नाहीत. तुमची काम करायची पद्धत आवडली. त्यामुळे

तुम्ही जी काही कारवाई अतिशय जोमाने, तुमच्या पद्धतीने करताय, अतिशय चांगल्या, मोठमोठ्या लोकांचे तुम्हाला आशिर्वाद आहेत. साथसंगत आहे. राज्यातील सचिवांकडून शाबासकी घेऊन आलात. इतरबाबतीत सुद्धा हिच अपेक्षा आहे. कायद्याची अंमलबजावणी करणार आहात असे सांगत असता. चांगली कामे करुन शहराचा नावलौकीक वाढवण्यावर भर द्या. शहराचा नावलौकिक असाच राहू द्या. कुठेतरी महापौरांचा आदर राखा. अनादर होऊ देऊ नका. धन्यवाद, एवढा वेळ बोलण्याची संधी दिलीत.

**मा.गोरक्ष लोखंडे** – मा.महापौर साहेब, मराठवाड्यातल्या बीड जिल्ह्यातले लोक एका अधिका-यासाठी रस्त्यावर आले. बीडचे जिल्हाधिकारी सुनिल केंद्रेकर सारखा एखादा अधिकारी चांगले काम करत असताना या अधिका-याची बदली झाली. तेव्हा लोक रस्त्यावर आले होते. बीडवासियांनी अतिशय चांगला संदेश दिला आहे. हे लोक कोणत्या संघटनेचे होते याचा ऊहापोह केलातर बघता बघता हे लोण इथे आले. आयुक्तांची बदली करायची नाही. अनेक पक्षांचे, संघटनांचे लोक रस्त्यावर आले. कोणताही अध्यादेश काढला नाही. चर्चा केली. अनावश्यकपणे प्रसिद्धी फार कमी लोकांना लाभत असते. हीच हवा, पेपरमध्ये बातम्या वाचल्यानंतर अधिकारी राजकारण्यासारखा वागायला लागला असा संदेश जातो. शासन व प्रशासनाने एकत्रितपणे काम केलेतर हे सभागृह चालवता येणार आहे. ***We people are the representative of the city.*** याचे सगळे अधिकार १९५० साली संविधानाच्या अधिनियमांत नमूद केलेले आहेत. भारतीय संविधानाची अंमलबजावणी तुम्हाला आम्हाला करावी लागणार आहे ही सगळ्यांत महत्वाची गोष्ट आहे. श्री.वंजारी यांनी हायकोर्टात अपिल केले होते. रिट करता येत नाही म्हणून ऑनरेबल कोर्टाने त्यावर निर्णय दिला. जस्टिस मुजुमदार व जस्टिस सय्यद यांनी निर्णय दिला. त्यांचे अभिनंदन करतो. त्याची आपण अंमलबजावणी करत आहोत. त्याचबरोबर दुसरी महत्वाची गोष्ट आहे, या देशामध्ये ही पहिली महापालिका किंवा शहर राहणार आहे, इथे अधिकृत बांधकामे झालेली आहेत. आपण पूर्वी यु.एस.ए.ला जाऊन आलात, तिथे कामाची पद्धत पाहीली असेल. आपल्याला खास अधिकार दिलेले आहेत. या विहीत अधिकारांचा फायदा आपण या कामासाठी करु शकता. जर आपण ठरवले तर ज्या कोर्टाने आदेश दिले आहेत, त्याच कोर्टाने निर्णय दिलेला आहे. व्होल्गा टेल्स् केसमध्ये, त्यांच्याबरोबर मे.कर्नाटक शासन होते. राज्यभरात या निर्णयाची अंमलबजावणी केली गेली. दिल्ली शासनाने निर्णय घेतला होता. १४.५ लाख

लोकांना याचा फायदा झाला. ग्रीन झोनमध्ये जे लोक रहात होते. त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करुन त्यांची घरे वाचवली. अशा लोकांना आपण एक चांगला विचार करुन यलो झोनमधील लोकांवर दंडात्मक कारवाई करुन त्यांची घरे वाचवू शकतो. आपली बदली होऊ नये म्हणून लोक रस्त्यावर येतात. त्यांचे कौतुक आहे. महापालिकेला चांगला अधिकारी मिळाला आहे. प्रशासनाचे काम अतिशय सुधारते आहे. त्याचबरोबर या महिन्याच्या २०/२२ तारखेला या गोष्टीला वर्ष होत आले आहे, फक्त अनधिकृत बांधकामे या विषयावर सभागृह चालते आहे. मागील वर्षांचे पैसे खर्च करु शकलो नाहीतर पुढील वर्षात त्या तरतूदी नाकारल्या जातात. शहरात खूप कामे करता येण्यासारखी आहे. जेएनएनयूआरएम मधून करोडो रुपये इथे दिलेतरी अनेक प्रोजेक्ट चालू आहेत. भारतातल्या माणसांना चांगली कामे मिळाली आहेत. कोणी हौसेने रहायला जात नाही. या प्रोजेक्टमध्ये काय चालले आहे. कधीतरी डोकावले का. विठ्ठल नगरमध्ये १४०० फ्लॅट तयार आहेत. ६७२ लोकांना ताबा दिलेला आहे. अनधिकृतपणे लोक रहायला लागले आहेत. झोपडपट्टीत जो माणूस राहतो. ज्यांना ताबा दिलेला आहे, त्यांना अजून कम्प्लिशन सर्टिफिकेट दिलेले नाही. ज्यांचा संबंध आहे त्यांना जर का दिले नाहीतर जे अर्धे लोक राहतात त्यांच्या सुविधा महापालिकेने तोडल्या आहेत. लहान-लहान मुले उघड्यावर बसतात. नैसर्गिक विधीसाठी बायका संध्याकाळ व्हायची, अंधाराची वाट बघत बसतात. सामान्य माणसाला टेंडर पद्धतीमध्ये काय चालले आहे? अधिकारी सेवेसाठी येतो का यापलिकडे जाऊन विचार करावा लागणार आहे. अनेक गोष्टी आहेत म्हणून शासन व प्रशासन दोघांना बरोबर घेऊन करावे लागणार आहे. त्याविषयी होणा-या कोर्टाच्या ऑर्डरप्रमाणे वागले पाहीजे. प्रवाहात वाहत गेलेले अधिकारी अमर्याद आहेत, त्यांचा विचार करावा. तुमची बदली कोणी करणार नाही. चांगले काम करणारा अधिकारी असेलतर आम्ही उलट त्याच्या पाठीशी उभे राहू. सर्वांगिण विकासासाठी सर्वांना विचारात घेणे गरजेचे आहे. राजकारण्यांसारखे वागू नका. फक्त प्रशासन चालवा नाहीतर आम्ही काय करायचे आम्हाला ठाऊक आहे. मला बोलायची संधी दिल्याबद्दल आभार.

**मा.उल्हास शेट्टी** –मा.महापौर साहेब, प्रथमतः याठिकाणी सरबजीतसिंग य़ांची पाकिस्तानात झालेली क्रूर हत्या व एकनाथ खडसे यांचे चिरंजीव निखील खडसे यांचे दुःखद निधन झाले, त्याबद्दल त्यांना श्रद्धांजली वाहण्यात यावी. ही सभा तहकूब करण्यात यावी अशी विनंती राहणार आहे. सर्व सदस्य याठिकाणी बोलणार

आहेत. मला सुद्धा बोलावेसे वाटते. पहिलेच ठरले आहे काय होणार आहे. सर्वांची इच्छा आहे. काहीतरी वेगळे होणार आहे. आयुक्त आयपीएल २०/२० च्या जमान्यात टेस्ट मॅच हळूहळू खेळत आहेत. आपण वेगाने खेळले पाहीजे असे वाटते. आपले स्लो बट स्टेडी असे चालले आहे. माझी नम्र विनंती आहे, आपण सभागृहात शब्द दिला होता. कोणत्याही प्रकारची हानी पोहोचू देणार नाही. कोणत्याही प्रकारची नोटीस देणार नाही. अ प्रभागात ८०० घरांना नोटीस देण्यात आली होती. आम्हाला मान्य आहे, कोर्टाचा अवमान न करण्यासाठी पाडापाडी चालू आहे. मला विनंती करायची आहे, गेले १४ महिने बोलतोय. दर मिटींगमध्ये आमचे बारा वाजत आहेत. आमच्या अडचणी सांगतोय. वॉर्डातील विकास होण्यासाठी प्रयत्न करतोय. आपण सुद्धा आदेश देता त्याप्रमाणे अंमलबजावणी होता का नाही हे पहात नाही. माझी विनंती आहे,मी सभागृहात ज्या-ज्या संदर्भात वॉर्डात कामे सूचवली,त्याचा पाठपुरावा केला. माझ्या निदर्शनास आले, त्यासंदर्भातील कोणत्याही प्रकारचे कामे झालेले नाही. एकही मोठा प्रोजेक्ट पिंपरी चिंचवड शहरामध्ये गेले १४ महिन्यांमध्ये झालेला नाही. लोकांना वाटते आहे,चांगल्या पद्धतीने कामे कराल,चांगले प्रोजेक्ट राबवाल. दहा कलमी कार्यक्रम करताय. स्लमबाबत मा.लोखंडे यांनी सांगितले, ५ वर्षे झाली बिल्डींग उभी आहे. लाखो रुपये खर्च करतोय,पण घरे देताना कमी पडतोय. श्री.राजन पाटील यांना नेहमी फोन करत असतो. त्यांचे पुनर्वसन का करत नाही. कारण काय. नवीन काहीतरी सुरु केले. सर्टीफीकेट असल्याशिवाय देता येणार नाही. ५ वर्षांपूर्वी बांधलेल्या बिल्डींगची आजची परिस्थिती वाईट आहे. खिडक्यांच्या काचा फुटल्या आहेत. ठेकेदाराला परत काम करायला सांगितले होते,पण तो करुन देणार नाही. ठेकेदाराला परत काम सुरु करण्यासाठी पैसे द्यावे लागतील. पुढील महिन्यात पावसाळ्याआधी द्यावे म्हणून प्रयत्न करतोय. गावडे साहेबांनी बरेचसे कष्ट करुन लोकांना लोन मिळवून दिले. अडीच महिने झाले अजून ताबा देत नाहीत. श्री.राजन पाटील व तांबे साहेबांना वारंवार फोन करतो. ते म्हणतात, पर्यावरणाचे सर्टीफीकेट आल्याशिवाय ताबा देता येणार नाही. का द्यायचा नाही. त्यात अडचण काय?कोण सॉल्व्ह करु शकत नाही. त्यांनी झोपडपट्टीत रहायचे का?आशेला लावायचे, घर दयायचे नाही. पावसाळ्यात शिफ्ट करणार नाही असे सांगितले. किती वर्षे असे करणार. असलेली बिल्डींग ताबडतोब का देणार नाही. त्याठिकाणी असलेली अतिक्रमणे हटवत असताना,झोपडपट्टी विरहीत शहर करत असताना, जुन्या बिल्डींगमध्ये घुसखोरी करुन लोक राहत आहेत. त्याठिकाणी वॉर्डात सांगतोय, अतिक्रमणे आहेत.

घुसखोरांमुळे परत झोपडपट्ट्या वाढणार आहेत. याचा विचार करत नाहीत. वॉर्डात सर्व केले, त्याठिकाणी सांगण्यात आले, सध्या रस्ता करताना डबल खर्च करावा लागणार आहे. स्वच्छतागृहे नाहीत. डबल खर्च होईल म्हणून करत नाही. त्या लोकांनी कुठे जायचे? टॉयलेट पण करत नाही. त्या लोकांनी असेच पडायचे का? थरमॅक्स चौकातून यमुनानगरचा पूर्ण रस्ता ६ महिने झाले त्याठिकाणी नाला गार्डनचे काम चालू आहे. पाणीपुरवठा याचा सुद्धा विचार केला पाहीजे. शहरातून फिरताना सगळ्या गोष्टी दिसल्या पाहीजेत. डांबरीकरण नाहीतर अधिका-यांनी असा बदल केला, तुम्ही विचार करा. नियम करतो मान्य आहे. ३ ते ४ वर्षे कुठेतरी पाणीपुरवठ्यातून बदल केल्यानंतर कामे सांगायची, त्यांना माहिती नाही. सांगणार कसे? एक वर्षांत किती बदल्या केल्या. इंगळे गेले, सय्यद आले. निंबाळकर होते,तिथे कुलकर्णी आले. कृतीत कोणता बदल झाला. नाव सुद्धा आठवत नाही. कोणतीही चर्चा करायची माहित नाही. टेंडर नाही, बजेट नाही. एकाच ट्रॅकवर बघताय. दुस-या ट्रॅकवर बघणे गरजेचे आहे. आपण ए.सी.तून फिरतोय. गोरगरीबांचा विचार करा. बसस्टँड आहे. ४२ $^{0}$**C** मध्ये उभे राहत असतील तर ठराव मांडावा. जरी वाटले असले तरी त्या लोकांची व्यवस्था करा. लहान मुले, ज्येष्ठ नागरीक यांना उभे रहायला जागा नाही. चेक करा. आपण काहीच विचार करत नाही. कमीत कमी ज्येष्ठ नागरीक, गोरगरीबांचा विचार करा. करोडो रुपये खर्च करतो. बसस्टॉप बनवताना मांडववाल्याला कॉंट्रॅक्ट द्या. रेझोल्युशन संदर्भात बोलायचे आहे. १० वेळा सांगितले, माझ्या वॉर्डात काही आरक्षणे आहेत. ताब्यात नाहीत. टाऊन प्लॅनिंग यांना सुद्धा वारंवार विनंती करत असतो. काहीतरी डेव्हलपमेंट करा. आम्हाला केल्यासारखे वाटले पाहीजे. काहीच वाटत नाही. १० वेळा पत्र दिले. भदाणे मॅडम यांना सांगितले. त्या दखल घेत नाहीत. माझी विनंती आहे, विकास करण्यासाठी लक्ष दिले पाहीजे. ग्राऊंड संदर्भात, प्राधिकरणात बॅडमिंटन कोर्ट आहेत. माझा प्रामाणिक आरोप आहे, खेळाडूंचा विचार होत नाही. शंभर टक्के केवळ पैसा गोळा करायचे काम चालू आहे. छोट्या-छोट्या गोष्टींकडे लक्ष देत नाही. तुम्ही विचार करा, व्हिजिट करा. मुलांकडून कशा पद्धतीने पैसे गोळा करतात. लाईट आपली, ग्राऊंड आपले, कोच आपल्या नावाने बुक करतो. दिवसभर मुलांना कोचिंग करतो. लाखो रुपये गोळा करतो. बॅडमिंटन कोर्ट बंद आहेत. त्याकडे कोणी लक्ष देत नाही. पैसे कमी आहेत का. स्विमिंग पूल बंद आहेत. हायवेवर एकही टॉयलेट नाही. भक्ती-शक्ती चौकापासून दापोडीपर्यंत एखाद्याला टॉयलेटला जायचे असेल तर हॉटेलचा आश्रय घ्यावा लागतो. चव्हाण साहेबांना विचारले तर ते

म्हणतात, पाईपलाईनचे काम चालू आहे. ते कधी ओपन करणार परमेश्वराला माहित. आम्ही पुढे जाताना काय सांगणार. पाईपलाईनेच काम चालू आहे, पुढील टर्ममध्ये होईल. भविष्यात होईल असे सांगणार का. अनेक लोक तुम्हाला सपोर्ट करतात. चांगली कामे करत असताना याकडे सुद्धा लक्ष द्या. सदस्यांनी सांगितले. तुम्ही आम्ही दुश्मन नाही. तुम्ही म्हणता मला तळामध्ये जायचे नाही. कोर्टाचा अवमान करायचा नाही. काय हरकत नाही. लाखो लोक वाचणार असतील तर काय हरकत नाही. आपण नियमांत बसून काम करता. ज्या पद्धतीने चांगले काम करताय. तुम्हाला सपोर्ट करीत आहेत ते बसलेले लोक बघा. कोणत्या ना कोणत्या पक्षाचे आहेत. याचा अर्थ आमच्या पक्षाचा सपोर्ट नाही असे नाही. संबंधित ऑफीसर यांना सांगा. गार्डनचा हेड नवीन आला, पाणीपुरवठ्याचा हेड आला त्यांना सांगा. या या वॉर्डात काम करा.

**मा.श्रीरंग बारणे** – मा.महापौर साहेब, खरेतर एक वर्षापूर्वी मे मध्ये तुम्ही रुजू झाल्यानंतरच्या कालावधीत या शहरातील अनधिकृत बांधकामांबाबत उचललेली पाऊले, त्यासंदर्भात सातत्याने मी स्वतः व माझे सर्व सहकारी, शहरातील तमाम गोरगरीब माणसाच्या पाठीमागे सातत्याने उभे राहत आहोत. गोरगरीब माणसाच्या बरोबर उभे राहून रस्त्यावर येऊन साथ दिलेली आहे. गेले १ वर्षाचा कालावधी पाहील्यानंतर मला देखील व्यक्तिशः वाटू लागले, इतके दिवस शहरातील गोरगरीबाला खेळवण्याचा प्रकार सत्ताधारी पक्षाकडून चालला आहे. आयुक्त म्हणून खरेतर महापालिकेचा कारभार हाती घेतला नाहीतर राज्य शासनाकडून आदेश प्राप्त झाला. त्याची अंमलबजावणी करावी लागली. अनेक वेळा भेटून सांगितले. गोरगरीब माणूस घर बांधू शकणार नाही. साधारणतः अशा घरावरील छप्पर गेलेतर परत बांधू शकणार नाही. फार मोठी मुश्किलीची बाब झाली आहे. परंतू सर्वसामान्य माणसाला अंधारात ठेवायचे काम सत्ताधारी पक्षाने केलेले आहे. २९ डिसेंबर २०११ रोजी पहिली मिटींग झाली. त्यात विभागाचे आमदार उपस्थित होते. महापौर उपस्थित होते, आयुक्त होते. ज्यावेळी राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी सांगितले, यापुढे अनधिकृत बांधकामे होता कामा नयेत. ती थांबवली गेली पाहीजेत. तदनंतर मुख्यमंत्र्यांनी आदेश काढला. दि.३१ मार्च २०१२ पूर्वीचे बांधकाम असेल तर नंतर झालेली बांधकामे काढण्यात यावीत. याठिकाणी आरोप करतात. त्यांना प्रश्न विचारायचे आहेत. सात/आठ महिने सूचना दिलेल्या आहेत. गप्प का बसले आहेत**?** सर्वसामान्य मनुष्यासाठी केवळ कायदा होत आहे का केवळ राजकारण करण्यासाठी

वापर होत आहे. महापौरांच्या दालनात बैठक झाली. त्यावेळी सुद्धा सांगितले आहे. ख-या अर्थाने सर्वसामान्य माणसाच्या पाठीमागे उभे रहायचे असेलतर सगळ्या बैठका तहकूब करुन कोणतीही बैठक होऊ द्यायची नाही. महापालिका सभेत ज्यावेळी सांगितले गेले, इथून पुढे ही बांधकामे नियमित करणार आहोत. मा.महापालिका सभेत आश्चर्याची बाब होती म्हणून अभिनंदनाचा ठराव केला. ५ महिने झाले.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, ज्या-ज्या संघटना खरेतर आयुक्त साहेबांच्या बदलीसंदर्भात रस्त्यावर उतरल्या, त्यासंदर्भात बरेच काही बोलले गेले. उघडपणे जाहीर पाठींबा देते. तुम्हाला मनापासून शुभेच्छा देते. तुम्ही कोणाच्याही दबावाला बळी पडत नाही. आय.ए.एस. ऑफीसर कसा असावा तर तुमच्यासारखा असावा म्हणून आम्हाला तुमचा अभिमान आहे. भारतीय म्हणून, महाराष्ट्रीयन म्हणून अभिमान आहे. सगळ्यांनाच अभिमान आहे. आपले कौतुक सुद्धा दिसले पाहीजे. तुमचा अपमान करुन आम्ही मोठे होणार नाही. तुम्ही मोठेच आहात. मोठेच होणार आहात. मोठे व्हायचे असेल तर आमची मान मोठी करावी लागणार आहे. हे सुद्धा सभागृहाने लक्षात घेतले आहे. ज्या-ज्या अधिका-यांच्या बदल्या केल्या, त्याबाबत आपले अभिनंदन करेल. गेली ५ वर्षे बोंबलून दमलो. ५/१० वर्षे अधिकारी एकाच जागी ठाण मांडून बसले होते. त्यांना हलवायची हिंमत तुम्ही केली आहे. कोणत्याही प्रकारचा राजकीय दबाव आणला तर योग्य ती कारवाई केली जाईल असे ऑर्डरमध्ये म्हटल्यामुळे कोणताही अधिकारी गेलाच नसेल. इतका आपला दबदबा निर्माण केला आहे. त्याबद्दल आपले अभिनंदन करते. सगळी चांगली कामे चालत असताना नगररचना विभागातील कर्मचारी श्री.जवळकर यांच्यावर कारवाई केली. त्यांनी ताथवडेच्या नकाशात डी.पी. रस्ता दाखवला नाही. हा खरेच त्यांचा दोष आहे का? सर्वेअरची एवढी हिंमत असते का? आपण सांगितले त्याने केले नाही. त्याला कोणी करायला प्रवृत्त केले का? याचा सुद्धा फॉलो अप घेणे गरजेचे आहे. मोठे मासे सोडून छोट्या माशांना बाजूला करताय का? हे आपल्याकडून घडतेय का? खरेतर विभागप्रमुखांवर सुद्धा कारवाई व्हायला पाहीजे. १२ मी.चा रस्ता दाखवला नाही. त्याच्या लक्षात कसे आले नाही? हेतूपुरस्सर लक्षात आले नाही का? भदाणे मॅडम यांना आपण घरी बसवले पाहीजे. पर्यावरण विभागप्रमुख श्री.संजय कुलकर्णी यांना तक्रार केली होती. त्यांच्या हाताखालील जे.ई.ना नोटीस पाठवली होती. विभागप्रमुखांवर सुद्धा कारवाई झाली पाहीजे. जे.ई.

ने रिमार्क लिहिला तरी विभागप्रमुख ऐकून घेत नाहीत. ते सांगतात, तुम्हाला सांगितले ते करा, तुमची अक्कल पाजळू नका. तुम्ही जे.ई. ना धाक लावला. कारवाई विरोधात मी नाही. चांगल्या कामासाठी हे केलेच पाहीजे. दबाव असलाच पाहीजे. HoD ना कुठेतरी शिक्षेस पात्र धरले पाहीजे. अनधिकृत बांधकामांसंदर्भात चांगला निर्णय घेतलात. सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छिते. बरीचशी कारवाई संथ गतीने चालू केली आहे. पूर्णपणे बंद नव्हती. कधी चिंचवडमध्ये, कधी पिंपरीमध्ये. पिंपरीचे सन्मा. आमदार त्यांच्या बांधकामाचे पेपर्स माझ्याकडे आहेत. त्याठिकाणी असलेल्या बांधकामात ६ मजूर दबले गेले. सुदैवाने कोणीही दगावले नाही हे त्या लोकांचे सुदैवच. मुंब्रा इथे ७२ लोक बिल्डींगखाली दबून मेले. पश्चिम बंगालमध्ये ४५० लोक मेले. याबाबत शासनाने चांगला निर्णय घेतला असला तरी आम्ही ओरडायचे कारण काय. अनधिकृत बांधकामाबाबत किती लोक अपॉईंट केले. येथे सुद्धा लोक नाहीत. काय घाबरताय का? छोटी-छोटी बांधकामे पाडायची. ज्यांचा राजकीय वरदहस्त आहे, खासदार, आमदार असेलतर यांच्यावर सुद्धा फौजदारी दाखल करा. यासंदर्भात जास्तीत जास्त नगरसेवकांचा या विषयाला पाठींबा आहे. १० ड चा वापर केला तर यांचे सुद्धा पद धोक्यात येऊ शकते. महासभा अनधिकृत बांधकामासंदर्भात तहकूब होते. सर्वसामान्यांचा कळवळा आहे. महासभा होऊ दिली पाहीजे. अनधिकृतबाबत वेगळा विषय ठेवला पाहीजे. विकास कामे झाली पाहीजेत. एकच विषय घेऊन गेले सहा महिन्यांपासून सभागृहात त्याचेच तुणतुणे वाजवतोय. सर्वांना नियम करताना दोषी धरले जाते आहे. आयुक्त साहेब वारंवार सांगतात, उलट पत्र द्या. हे आम्ही करु शकत नाही. अधिका-यांना दोषी धरतात. प्रशासनाचा अपमान करतो. त्यांचा निषेध करते. हे सभागृह सर्वोच्च आहे. विकास कामाला गती देण्यासाठी आयुक्तांवर दबाव वाढला पाहीजे. महासभा तहकूब न करता किती निविदा निघाल्या, कोणत्या स्तरावर वर्क ऑर्डर दिल्यात का नाही हे पाहणे आपले काम आहे. मघाशी उल्लेख केला होता. विठ्ठलनगर झोपडपट्टीचा पुनर्वसन प्रकल्प बंड साहेबांमुळे रखडला आहे. त्यांनी अनधिकृतपणे वापरलेले अधिकार, अनागोंदी कारभार याचे परिणाम महापालिका भोगतेय. जेएनएनयूआरएमला डिपीआर पाठवला. विठ्ठलनगर सर्वे नं.१०० चिंचवड असा उल्लेख केला. खोटी माहिती देऊन निधी मिळवला होता. राज्य शासन व केंद्र शासनाची फसवणूक केली. सगळ्याच प्रकल्पांमध्ये कोणताही नगरसेवक अधिका-याशी भांडत असेलतर राग असण्याचे कारण नाही. आम्ही सुद्धा लोकांमधून निवडून आलेलो आहोत. एखादे अनुचित काम असेल तर त्याला पाठिंबा देण्याचे कारण नाही. त्यावर ऊहापोह करु नका. ही चर्चा

घडवून आणली तरी ५/६ वेळा चर्चा केलेली आहे. सगळेजण आपल्याला टार्गेट करत आहेत. तुमच्या कार्यकाळात सर्वात जास्त सभा तहकूब झाल्या आहेत. आपण महापौर आहात. आपल्या घरात आमदार, नगरसेवक आहेत. आपण शासनाबरोबर पुन्हा एकदा बैठक लावावी. आयुक्त साहेब त्यांचे काम करतात, त्यांना करु द्या. शासनाने निर्णय घेतला नसला तरी त्यांनी चुकीचे काम केले तर त्याला शिक्षा होणार आहे. आयुक्त साहेब त्यांच्या अधिकारांत त्यांच्या ब-याचशा अधिकारांचा वापर करत आहेत. त्यांच्या अधिकारांत शासनाने वाढ केलेली आहे. स्थायी समितीत विषय मंजूर केली नाहीतरी आयुक्त त्यांच्या अधिकारांत मंजुरी देतात व काम सुरु करतात. आपण फक्त खेळणे होऊन रहायचे का? याचा विचार करायाची खरी गरज आलेली आहे. मी पुन्हा एकदा तुमचे अभिनंदन करते.

**मा.राजेंद्र जगताप** – मा.महापौर साहेब, सर्व सदस्यांनी सांगितले, ड्रेनेज लाईन कट करायची मोहिम चालू केलेली आहे. दुसरीकडे सुद्धा पाहीले पाहीजे. जलपर्णी काढा म्हणून 1 वर्ष झाले सांगतोय, पाठपुरावा करतोय. आमच्याकडे एवढे करुन परिसरात लोकांना राहणे मुश्कील झालेले आहे. जलपर्णी अजून निघालेली नाही. पत्रकारांना विनंती करतो, ज्या जागेत जलपर्णी साफ झाली तेवढा फोटो काढून देता. जिथे जलपर्णी आहे, त्याचा सुद्धा फोटो काढून दिला पाहीजे. जी विकास कामे कायदेशीर आहेत, तिथे दुर्लक्ष केलेले आहे. 6 ते 7 महिन्यांपूर्वी ऑटोक्लस्टर येथे मिटींग झाली. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार होते. त्यांनी सांगितले, प्र.क्र.57 मध्ये नाट्यगृहाचे टेंडर काढले. ते सुद्धा कॅन्सल झाले. अनधिकृत बांधकामाबाबत कोर्टात गेले, स्टे आहे. नाट्यगृहाची जागा स्टे आला म्हणून वरवर ऐकतो. स्टे उठवून टेंडर कॅंसल झाले. त्यांचे काम आजपर्यंत सुरु झालेले नाही. माझ्या वॉर्डात नैसर्गिक नाला आहे. पुढील महिन्यात पाऊस चालू झाल्यानंतर नाल्यातील पाणी संपूर्ण घरात जाते. तिथे 5 ते 6 हजार लोक राहतात. आपल्याला किती वेळा पत्र दिले. एकाही पत्राचे उत्तर आलेले नाही. 2 महिन्यांत पूर्ण करु म्हणून उत्तर आले. एकही काम पूर्ण झालेले नाही. तुम्ही कायदेशीर करता हे सांगितले. हे काम बेकायदेशीर आहे असे तुम्हाला वाटते का? तुम्ही अनधिकृत बांधकामांना प्राधान्य देता मग या कामांना प्राधान्य का देत नाही? इथे सुद्धा लक्ष दिले पाहीजे. स्विमिंग टॅंक अजून चालू झालेला नाही. पेपरमध्ये पाहत असतो. वॉर्डातले फोटो काढून पत्रकार देत असतात. परवा सुद्धा पेपरमध्ये बातमी होती, का चालू होत नाही याचा खुलासा द्या. आजही चालू झालेले नाही. 2 महिन्यांत सगळ्या पत्रांची उत्तरे आली. एखाद्याने

कोर्टात केस केली असेल, कोर्टात जाऊन स्टे घेतला असेल, बिल्डींग पाडली त्यामुळे कोट्यावधी रुपये खर्च वाया घालवला. एखादे घर पाडू शकत नाही का. आम्हीच सगळी बेकायदेशीर कामे सांगतो का याचा सुद्धा आपण विचार करावा. प्रत्येक वेळी पत्र दिलेले आहे. ब-याच वेळा सांगितले आहे, यात जातीने लक्ष घालावे. सगळ्यांनी तुमचे अभिनंदन केले आहे. मी सुद्धा आपले अभिनंदन करतो. सगळे सदस्य विकास कामासाठी निवडून आलेले आहेत. आमची विकास कामे करावीत. खरोखरच आयुक्त साहेबांनी चांगले काम केले आहे म्हणून आम्ही सुद्धा स्तुती करु.

**मा.चंद्रकांता सोनकांबळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, बेकायदेशीर बांधकामाबद्दल चर्चा होते आहे. दोन्ही बाजूंनी चर्चा होते आहे. आयुक्त साहेबांची बदली होऊ नये म्हणून निदर्शने केली होती. यापुढे करावी लागतील. विचार करत आहोत, बदली करुन दुसरा कोणी अधिकारी इथे आला म्हणून प्रश्न सुटेल असे अजिबात नाही. बदली होणे हे काम असू नये. इतके सत्ताधारी पक्षाने वाईट वाटून घेऊ नये. मुख्यमंत्र्यांनी लोकांचे, आमचे ऐकले, एवढे ताकदवान आम्ही नाही. बीडला सुनिल केंद्रेकर यांची बदली झाली तेव्हा लोक रस्त्यावर आले होते. पुण्यात भाटिया यांची बदली झाली त्यावेळी जनआंदोलने झाली होती. आमची मागणी हीच आहे की, सगळे शहर बकाल होऊ नये, कायद्यानुसार सुरळीत कामे चालली पाहीजेत, विकास कामे झाली पाहीजेत. जेव्हा आयुक्तांनी बांधकामे पाडायला सुरुवात केली, शिवसेना,भारतीय जनता पार्टी, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया यांनीच शहरात सगळयात मोठा मोर्चा काढला होता. गेले ९/१० महिन्यांत बघितले ठोस कधी कळवणार. राज्याच्या मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी ही ताकद इथे लावली. अध्यादेश लवकर निघेल. बांधकामे पाडण्यापासून वाचतील, तरी आयुक्तांना दोष देऊ नये. काही अधिका-यांच्या लगेच बदल्या केल्या. इंजिनिअरींग सेक्शनमधील, स्टोअर रुममधील अधिकारी/कर्मचारी 15 वर्षांपासून एकाच जागेवर काम करत होते. बांदल,क्षिरसागर यांचे म्हणणे होते की, जोपर्यंत बांधकाम परवानगी विभागातील इंजिनिअर यांच्या बदल्या होत नाहीत, तोपर्यंत आमच्या काही बदल्या होत नाहीत. चमत्कारच झाला, त्या इंजिनिअरचा मला फोन आला, माझी बदली झाली. त्यावेळी मी झोनमध्ये होते. १५ वर्षांपासून जे इंजिनिअर बांधकाम परवानगी विभागातच होते, त्यांची मक्तेदारी मोडून काढणे गरजेचे होते. आयुक्त बी.पी.एम.सी. †क्टप्रमाणे काम करतात. वाईट वाटायचे कारण नाही. नियम केला त्याच्याशी आम्ही सुद्धा सहमत आहोत. सर्वसामान्य माणसाचे घर पाडत आहोत. दोनही गोष्टींचा संयोग

घडवून माणूसकी जपली पाहीजे. नागरीकांना जीवनावश्यक सुविधांपासून वंचित ठेवता कामा नये. यासाठी मार्ग काढता आलातर नक्की काढावा. नियमानुसार चालत राहीलो तर शहरातील नागरीकांचे फार मोठे नुकसान होणार आहे. मुंबईमध्ये चार बिल्डींगज् बेकायदेशीर आहेत. त्या पाडण्याआधी नागरीकांना मदत दिली गेली. लोकांचा काही दोष नाही. त्यांना पर्यायी व्यवस्था करुन देता आलीतर नक्की तशी व्यवस्था करावी. गरजेचा वसा शिरसावंद्य मानून गरजा पूर्ण करतो. ड्रेनेज लाईन साफ करताना मशीन ५ फुटाच्या गल्लीत पोचत नाही त्यामुळे साफ करता येत नाही. त्यावेळी कामगार आठ ते नऊ फूट खाली चेंबरमध्ये उतरून ड्रेनेज साफ करतात. प्रशासनाने गटर साफसफाईचे काम मशीननेच करावे असे कोर्टाचे आदेश आहेत त्याचे सुद्धा पालन आपल्याकडून व्हावे. आपल्या कामाला आमचा विरोध नाही. कायम चांगली कामे चालू ठेवावीत. अध्यादेश लवकरात लवकर काढण्यासाठी सर्व नगरसेवकांना प्रयत्न करावेत. आम्हाला सांगा, आम्ही सुद्धा मुख्यमंत्र्यांकडे मोर्चा या शहराच्या वतीने काढू. महापौर हा शहराचा प्रमुख असतो. ज्या काही नागरीकांच्या फायद्याच्या योजना असतील, त्याचे खरे श्रेय आयुक्तांना जात असते. त्याची सुरुवात करणे महापौरांचे काम आहे. महापौरांचे श्रेय बाकीच्यांनी घेऊ नये ही सुद्धा अपेक्षा व्यक्त करते. आम्ही आयुक्त साहेबांच्या पाठीशी आहोत हे सुद्धा पुन्हा सांगते.

**मा.अजित गव्हाणे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, तुम्ही सुरुवातीला या महापालिकेत आल्यानंतर कोर्टाचा आदेश आल्यानंतर सभागृहाला व महापालिकेला सांगितले होते, कोर्टाच्या आदेशाप्रमाणे अंमलबजावणी करावी लागणार आहे. शहरातील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करावी लागणार आहे. सगळ्यांनी एकत्र बसून निर्णय घेतला. २०१२ पूर्वीच्या बांधकामांवर कारवाई न करता, त्यासंदर्भातील कारवाईची भूमिका घेत असताना, त्यावेळी शब्द दिला. याच बी१, बी२, बी३ असे भाग पाडले. सुरुवातीला बी1 वर कारवाई करणार. शासनाकडून सर्व स्तरावर लवकरात लवकर तशा प्रकारचा अध्यादेश निघावा. जेणेकरुन नागरीकांना, बांधकामांना दिलासा मिळेल. जास्तीत जास्त बांधकामे पाडली जाऊ नयेत असा सर्वांचा प्रयत्न यासंदर्भात राहीला आहे. सभागृहात बोलत असताना वेगळ्या पद्धतीने भावना व्यक्त करतात व खाजगीमध्ये मान्य करतात की, यासंदर्भातील अध्यादेश निघणे गरजेचे आहे. सामुहिक प्रयत्न करणे गरजेचे आहे. तसा प्रयत्न आमच्या पक्षाकडून सातत्याने प्रयत्न केला जातो आहे. फक्त पिंपरी चिंचवड शहरात अनधिकृत

बांधकामे नाहीत. संपूर्ण देशात, राज्यात अशा प्रकारची बांधकामे मोठ्या प्रमाणात झालेली आहेत. अधिकृत बांधकामे होण्यासाठी शासन स्तरावर निर्णय घेत असताना फक्त पिंपरी चिंचवड पुरते नाहीतर संपूर्ण राज्यासाठी निर्णय घेताना घाईघाई न करता अभ्यासपूर्वक निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी व्यवस्थित करणे आवश्यक होईल. मुख्यमंत्र्यांसह सर्वच जण या दृष्टिकोणातून विचार करीत आहेत. निश्चितपणे आगामी काळात या दृष्टीकोणातून निर्णय होईल. दुस-या बाजूने विनंती आहे, पिंपरी चिंचवड ही एकमेव महापालिका नाही जिथे अनधिकृत बांधकामे झाली आहेत. संपूर्ण राज्यात कुठेही अशाप्रकारची मोठ्या प्रमाणात कारवाई केली जाते आहे. माणुसकीच्या दृष्टीकोणातून विचार केला तर निश्चितपणे आज तुमचे पेपरमध्ये आलेले स्टेटमेंट व आकडेवारी दिलेली आहे. नेमक्या किती बांधकामांवर कारवाई केली, फौजदारी केली, नोटीसा पाठवल्या, अशी आकडेवारी आली. गरीब माणसाची खरी बाजू बघा. दिघीत ज्या माणसाच्या घरावर कारवाई झाली, त्याच्या कुटूंबाची अवस्था काय झाली असेल हे तुमच्या लक्षात येईल. ते माजी सैनिक आहेत. त्यांनी त्यांच्या आयुष्यातील पै न पै जमवून ते बांधकामात लावले होते. दूर्दैवाने बांधकामावर कारवाई झाली. त्यांचे कुटूंब उद्धवस्त झाले. एवढ्या मोठ्या प्रमाणात जीवनाचा पैसा लावत असतो. अशी कारवाई होते. त्यावेळी तुमच्या सुद्धा लक्षात आले असेल किती मोठी हानी होते. शहरात अशी हानी होऊ नये. सगळे लोकप्रतिनिधी म्हणून काम करतात. आज अनधिकृत बांधकामे का करतात. आपला कायदा किचकट आहे. सर्वसामान्य माणूस प्लॅन पास करुन घेऊ शकत नाही. कायद्यात बदल होणे गरजेचे आहे. एक दिवसात कायद्यात दुरुस्ती करु शकत नाही. राष्ट्रवादीची सत्ता असो. एक दिवसांत कायद्यात कधीही बदल होणार नाही. दरवेळी हेच बोलत आलेलो आहोत. आम्हाला कालावधी लागणार आहे. हा कालावधी शहराच्या सिस्टीममध्ये सुधारणा करत नाही. कारवाई करायचे ठरवले तर एकही कर्मचारी, अधिकारी कामावर राहणार नाही. अशा प्रकारच्या चूका सगळ्यांकडून झालेल्या आहेत. मुद्दाम केलेल्या नाहीत. काही नजरचुकीने झालेल्या आहेत. कारवाई करायला लागलीच तर शंभर टक्के स्टाफ सस्पेण्ड करावा लागेल. एकही माणूस महापालिकेत शिल्लक राहणार नाही. मोरे सर म्हणायचे, काम करणारा चुकतोच. काम न करणारा बिनचुक असतो. मागील वेळी सभागृहात विनंती केली होती की, अधिका-यांचे मॉरल वाढवा. अधिका-यांची काम करायची मानसिकता राहीलेली नाही. आम्ही घाबरत आहोत. चुकून चुकलोतर सस्पेण्ड व्हावे लागेल अशी मानसिकता अधिका-यांची झाली आहे. माझ्या वॉर्डातील बॅटमिंटन हॉलच्या कामाला

विलंब होतो आहे, ते त्वरित करावे मी सांगितले होते. अधिका-यांना साफ सांगितले, फी वाढवावी लागेल. त्या अधिका-यावर कारवाई केली. अशा प्रकारची तुमची भूमिका आहे. तुम्ही असा चष्मा घालून बसला आहात. प्रत्येक तक्रारीवर कारवाई करत. तुमच्याकडून विकास कामे अपेक्षित आहेत. लोकांनी आम्हाला विश्वासाने निवडून दिले आहे. त्याला तडा न जाता विकास कामे व्हावीत. मा.लोखंडे यांनी सांगितले, माझ्या वॉर्डात पाण्याची टाकी दीड वर्षापासून बांधून तयार झाली आहे. ती अजून सुरु झाली नाही. आम्हाला तुमच्याकडून अपेक्षित आहे. संबंधित अधिका-याला फोन करुन विचारा. नेमके काय झाले. तुम्ही उत्तर दिले बघतो, नंतर सांगतो, आमची मानसिकता झाली आहे की, तुमचे जास्त लक्ष अनधिकृत कामे पाडण्यात, शिस्त लावण्यात आहे. विकास कामे होण्याच्या दृष्टीकोणातून ताबडतोब †क्शन घडत नाही. अनेक वेळा तुमच्याकडे बैठका चालू असतात. दुस-या दिवशी येतो. दोन/तीन दिवस सातत्याने आल्यानंतरही बैठका चालू असतात. आमचे प्रश्न ऐकून घ्यायला तुम्हाला वेळ मिळत नाही. एक/दोन मिनिटे ऐकता. बघतो असे आम्हाला सांगता. सगळ्या नगरसेवकांना असा अनुभव आला आहे. तुम्ही तातडीने उठता व तुमच्या कामाला लागतात. आम्ही तुमचा रिस्पेक्ट ठेवतो. तुम्ही सुद्धा आमचा रिस्पेक्ट ठेवला पाहीजे. आम्ही लोकप्रतिनिधी आहोत. लोकांच्या कामासाठी तुमच्याकडे येत असतो. १००% शहर तुमच्याबद्दल नाराज आहे. एक कलमी काम करणार असाल तर आम्हाला काम करायची गरज आहे. राष्ट्रपती राजवट चालू झाली की काय असे पिंपरी चिंचवडमध्ये वाटते आहे. विरोधी पक्षाचे लोकही हे मान्य करतात. आयुक्त साहेबांची काम करायची पद्धत चुकीची आहे. निकाळजे तुमच्याकडे त्यांच्या कामासाठी दोन वेळा आले होते. त्यांच्या घरच्या जमिनीतून रस्ता जातो. त्याचा मोबदला मिळावा म्हणून विनंती केली. टीडीआर संदर्भात तुम्ही तुमच्या सर्व प्रश्नांचा खुलासा दिला. अशी भूमिका घेतली, जमिनीला टीडीआर देता येणार नाही. जमिनीतील काही भाग रेसिडेन्शियल, काही भाग ग्रीन झोनमध्ये आहे. असे असतानासुद्धा रेसिडेन्शियल भागावर शंभर टक्के टिडीआर देता येतो. तो तुम्ही द्यायला पाहीजे. त्याचा अधिकार आहे. तुम्ही भूमिका घेतली लिगल विभागाकडे पाठवतो. हा लिगल मॅटर नाही. त्यांनी फाईल वाचल्यानंतर त्यांनी सांगितले, हा माझा रोल नाही. माझ्याकडे कशासाठी फाईल पाठवता. त्यांना नगररचनाकडे पाठवावे. आत्ता फाईल पॅनलला गेलेली आहे. महापालिकेने पैसे भरुन घेतले. ७/१२ वर महापालिकेची नोंद लागली. आमची मानसिकता होते की, नगरसेवकाचे काम म्हणून त्रास दिला जातो का, नगरसेवक झाला त्याची चूक आहे का? अशी वागणूक

दिली जात असेल तर सर्वसामान्य माणसाची फार वाईट अवस्था आहे. सकाळी नगररचना विभागात आलो तेव्हा सर्वांचे एस्टिमेट काढले. मोनार्च संस्थेने टेंडर भरले. त्यांना काम मिळेल. द्यायचे का नाही. त्यांना स्थापत्य विभागाकडे न पाठवता नगररचना विभागाकडे पाठवले. एस्टिमेट चुकीचे आहे का बरोबर आहे हे चेक करणे नगररचना विभागाचे काम आहे का. नियम करुन प्रत्यक्षात कामाला विलंब लावायचा अशी प्रशासनाची भूमिका झालेली आहे. एकही नगरसेवक म्हणून इथे येण्यासाठी पात्र नाही असे वाटते. मी कधी प्रशासनासंदर्भात बोललो नाही. सत्ताधारी म्हणून पेपरवाले आम्हाला नावे ठेवतात, आमच्याकडे बोट दाखवतात. मा.आप्पा बारणे म्हणाले, स्पष्ट बहुमत असूनही आम्ही काम करु शकत नाही. तुमच्याकडे तक्रार केलीतर तुम्ही त्याची लगेच दखल घेता. खरे खोटे तपासत नाही. निदान तक्रार आल्यावर त्याची दखल घेता, असे असेलतर एकही काम करता येणार नाही. आम्ही सुद्धा रोज हेच काम करायचे अशा प्रकारची ब्लॅकमेलिंगची मानसिकता डेव्हलप झाली आहे. तुम्ही त्याला प्रोत्साहन देत आहात. हे कुठेतरी थांबले पाहीजे. जवळकर याचा अभिप्राय देणेत काय त्याची चूक होती? नगररचना विभागामध्ये काम करणे इतके सोपे नाही. सिटी सर्वेचा नकाशा कधीच जुळत नाही. जागा ऑफीसला द्यायची. प्लॅन पास करुन दाखवण्याचा किती त्रास होतो. ५ गुंठ्याचा मोठा प्लॉट घ्या. अधिकारी मुद्दाम करत नाहीत. सांगतात, मी आयुक्त नाही. कायद्यातील त्रुटी तुमच्या लक्षात आल्या पाहीजेत. प्लॅन पास करताना सर्वसामान्य माणसाला त्रास होतो. बिल्डरला हाच त्रास होतो. बिल्डरकडे बघायची भूमिका बदलली पाहीजे. तुम्ही उलट विचार करा. शहरात किती अधिकृत बांधकामे आहेत. १० ते २० टक्क्यांच्यावर नाहीत. शासनाच्या, महापालिकेच्या चुकीच्या नियमावलीमुळे यु.एल.सी. कायदा रद्द झाला. तरीसुद्धा प्रत्येक केसमध्ये एन.ए.साठी फाईल गेल्यावर यू.एल.सी. आणावी लागते. सत्ताधा-यांची ही जबाबदारी आहे का? अधिकारी म्हणून कुठेतरी बाजू मांडली पाहीजे. सिटी सर्वे यांचा किती त्रास होतो. चार गुंठ्यासाठी चार एकरचे पैसे भरावे लागतात. याबाबत कुठेतरी शासनाकडे बाजू मांडा. रेड झोनच्या नावाखाली भोसरी,च-होली, तळवडे, चिखली, किवळे या गावांची काय परिस्थिती आहे? महापालिकेचा डी.पी. सँक्शन केला त्यावेळी रेड झोन ठरवताना झोपले होते का, रेड झोन कधी झाला? आपल्या लोकांची बाजू घेतली पाहिजे. प्रत्यक्षात तसे होत नाही. दिल्ली शासनाकडे बैठका लावल्या पाहिजेत. वारंवार केंद्र शासनाकडे विनंती केली पाहिजे. सगळ्या गोष्टींचा विचार करुन काम करावे लागणार आहे. भविष्य काळात तुमच्या विरोधात, तुमच्या बदलीची मागणी

आम्ही मुळात केलेली नाही. आंदोलने झाली. शंभर टक्के चुकीचे आहे. आमची भूमिका एवढीच आहे. आयुक्त साहेबांनी लोकांच्या हिताच्या दृष्टीकोणातून निर्णय घ्यावेत. प्रत्यक्षात विरोधी पक्षाने असे केले आहे की, आम्ही तुमच्या बाजूने, सत्ताधारी तुमच्या विरोधात असे चित्र निर्माण केलेले आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, ४/५ विरोधी पक्षाचे लोक तुमच्या बाजुने बोलले. प्रत्यक्षात खाजगीत तुमच्या विरोधात किती वाईट बोलतात. दोन्ही बाजुंनी बोलणे फार सोपे असते. आम्हाला पण हे बोलता येते. अजून लोकसभा, विधानसभा लांब आहे. तेव्हा अशी भाषणे करा. आत्ता करु नका. राजकीय भाषण ठोकताना लोकांच्या हिताचे निर्णय घ्या. आम्ही तुमच्या पाठीशी आहोत. विकास कामे कशी होतील? बजेट कसे खर्ची पडेल या दृष्टीकोणातून विचार करा. तुमची बदली होणार नाही याची शंभर टक्के खात्री मी तुम्हाला देतो.

**मा.आर.एस.कुमार** – मा.महापौर साहेब, मा.दत्ता साने यांनी या विषयाला सुरुवात केली. विकास कामे होत नाहीत याचा सर्व नगरसेवकांमध्ये राग आहे. १५ महिन्यांत वॉर्डातली कामे झालेली नाहीत. अतिक्रमणाचे काम जे.ई.कडून काढून घ्या. त्यांना कधीही फोन केला की ते म्हणतात अतिक्रमण काढायला गेलो होतो. त्यासाठी वेगळा सेल तयार केला पाहीजे. जे.ईं.ना विकास कामांसाठी ठेवा. अतिक्रमणासाठी स्वतंत्र मॅनपॉवर पाहीजे. जे.ईं.ना अतिक्रमणाची कामे मुळीच देऊ नका. तरच विकास कामे होतील. अतिक्रमणाबद्दल वारंवार चर्चा करतो. अनेक लोक म्हणतात, पिंपरी चिंचवडचा वंजारी नावाचा मनुष्य त्याला माहिती पडले, आपल्या केसमुळे शहरातील दीड लाख लोकांची घरे जाणार आहेत. त्याने केस मागे घेण्यासाठी अपिल केले होते. पण हायकोर्टाने सांगितले, रिट एक्झिक्युशन, जजमेंटनंतर सर्वे सुरु झाला आहे. (जजमेंट वाचून दाखवली.) जजमेंटमध्ये म्हटले आहे, respondent no.2 should take appropriate action. हे आपण करत नाही. महापालिकेच्या अधिका-यांनी एक्सटेंशन मागितले असते तरी त्यांनी दिले असते. आपण त्यांना ६ महिन्यांपेक्षा जास्त एक्सटेंशन मागितले तिथे चूक झाली असे मला वाटते. ऑर्डर आल्यानंतर आयुक्त साहेबांनी †क्शन घ्यायला सुरुवात केली. बी३ वर †क्शन घेणार नाही असे सांगितले. कामगारांना एक रुम, दोन रुमची घरे मिळणार म्हणून प्राधिकरणाने निर्णय केला. गेली १० वर्षे एकही प्लॉट निघाला नाही. साहजिकच प्रत्येक मनुष्याने व्यापार सुरु केल्यानंतर त्याला स्वतःचे घर पाहीजेच. या भागातील जागेचा मार्केट रेट २५ लाख एवढा झाल्यानंतर कुठेतरी एक

गुंठा जागेत कामगाराने घर बांधले तर ते अनधिकृत होते. प्रत्येकाचे स्वप्न असते, स्वतःचे घर पाहिजे. बँक लोन मिळत नाही. सोसायटी लोन, प्रॉव्हिडंट फंड यातून तो घर बांधतो. गरीब माणसाला एक/दोन रुम बांधताना त्याच्या आयुष्याची परवड होते. तो परत उभा राहू शकत नाही. तुमची चूक आहे असे म्हणत नाही. दुर्दैवाने कोर्टाच्या निर्णयाच्या आधारे तुम्हाला शासनाने आदेश दिलेले आहेत. रेग्युरलाईज करायला पाहीजेत. एकदा केल्यानंतर अतिक्रमण होत नाही. कॉर्पोरेटर रिस्पाँसिबल नाही. अधिकारीच रिस्पाँसिबल आहे. बांधकामे अधिकृत होत नाहीत. काही अधिका-यांनी पैसे घेतल्याशिवाय हे झाले नाही,नसते. प्राधिकरणात २ ते ३ हजार घरे झाली. घराचे प्लिंथ पूर्ण होत आल्यानंतर अधिकारी येऊन बोलतो, प्रोजेक्ट सोडवून देतो. अशाप्रकारे येणारा पैसा कलेक्ट करत होता. आमच्या जीवावर पैसे कमावतात. आम्हाला उदबत्ती सुद्धा दाखवत नाहीत. मोठ्या कॉलमला १०,०००/- घेतले. याला कॉर्पोरेटर जबाबदार आहे का? याच्यासाठी मग तुमच्याकडे येतात. घरी बसू शकत नाही. आमच्याकडे लोक येतात. आम्ही २/३ लेटर दिलेले आहेत. आमचे प्रोटेक्शन करायचे तुमचे काम आहे. या हाऊसमध्ये या विषयावर अनेक वेळा चर्चा झाली आहे. We do not renew for that. आपल्याला विनंती आहे, अतिक्रमण विभाग establish करा. Govt. च्या guidelines आहेत. त्याप्रमाणे आत्तापर्यंत establish केलेले नाही. It should be under Joint Commissioner. सेपरेट अधिकारी पाहिजे. जे.ई. ला नियमांत धरुन सस्पेण्ड केले. कायदा आहे पण एवढी मोठी महापालिकेची बिल्डींगकडे जे.ई. ला बघायचे गटस् आहेत का? तो करु शकतो का याचा तुम्हीच विचार करा. †क्शन घेतल्यानंतर १० ते १५ दिवस याच्यासाठी सुद्धा प्रोसिजर आहे. १५ दिवसांनंतर काढले म्हणून जे.ई.ला एवढी मोठी पनिशमेंट करु नका. पाहिजे तर त्यांची एक इन्क्रिमेंट कमी करा. त्यांना सेवेतून काढू नका. डेव्हलपमेंटबद्दल सांगायचे झालेतर आम्ही सगळे त्याबद्दल नाराज आहोत. तुम्ही चांगले प्रशासकीय अधिकारी आहात यात शंका नाही. यात अनेक वर्षांची गंदगी साफ केली. तुमचे डेव्हलपमेंटवर लक्ष कुठेतरी कमी आहे. गेल्या वर्षीचे टेंडर अजून उघडले नाही. वर्कऑर्डर दिलेल्या नाहीत. †डमिनिस्ट्रेटिव्ह अप्रूव्हलसाठी यायला पाहीजे. ५० लाखाचे असेलतर जुन,जुलैतच यायला पाहीजे होते. पुढील मार्चपर्यंत हे काम पूर्ण व्हायला पाहीजे. अनेक टेंडर्स जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर मध्ये रिलिज केलीतरी वर्कऑर्डर देण्याचे काम जानेवारीमध्ये सुद्धा झालेले नाही. वर्षभर लोकांना प्रॉमिस देत आलो. ज्या-ज्या वेळी अधिका-यांकडे जातो त्यावेळी ते म्हणतात, टेंडर नाही. आत्ता वर्कऑर्डर काढली. कामे होत नाहीत, करु शकत नाही. आमच्याकडे

लोक येतात. सांगतात, गटर तुंबलेले आहेत, फुटपाथ बरोबर नाहीत, रोड बरोबर नाहीत. गेल्या वर्षी डांबरीकरणासाठी एका प्रभागाला फक्त एक कोटी दिलेले होते. पूर्वी एका वॉर्डसाठी एक कोटी देत होतो. Every ward should get atleast one crores. १० कोटींचे सेपरेट टेंडर निघते आहे, ते सुद्धा काढले नाही. फक्त अंडरस्टँडींग असायचे. हे टेंडर तसे झालेले नाही. तुम्ही शिकायला पाहिजे. Administrative approval घ्यायला पाहिजे. त्यात ताबडतोब वर्कऑर्डर द्यायला पाहिजे. कामे सुरु व्हायला पाहिजेत. त्यासाठी क्वालिट कंट्रोलसाठी स्वतंत्र विभाग स्थापन केला. जसे co-ordination साठी वेगळे डिपार्टमेंट स्थापन केले तरी मी अनेक वर्षे इथे सांगितले आहे, पदाधिका-यांची १० ते २० टक्के टर्म अशीच जाते. ८० टक्के अधिका-यांकडे फिरण्यात जाते. नगररचना विभागातील कर्मचारी जवळकर यांना सस्पेण्ड केले आहे. तिथे किती भ्रष्टाचार चालू आहे. त्याच्या फिगर्स नीट पहा. इथे २५ लाखाचे एक/एक डील होते. जे.ई. काही निर्णय घेऊ शकत नाही. तुम्हाला उदाहरण देतो, मी महापौर असताना कंम्प्लेण्ट आली होती. ९६ ची गोष्ट आहे. त्यावेळी आयुक्तांना कम्प्लेंण्ट केली होती. आयुक्तांनी ४ जे.ई.ना सस्पेण्ड केले. ते स्वतः काही लिहितात का. एक्झिक्युटीव्ह इंजिनिअर म्हणतो तसे तो लिहितो. जो लिहितो त्याला टक्केवारी सुद्धा कमी आहे. विकास कामे व्हायची असतील तर तुमचा जे.ई. १२/१२ तास काम करत असतो. डॉकेट त्यानी तयार करायचे. इम्प्लिमेंटेशन त्याने करायचे. रोडवर त्याने उभे रहायचे. वरचा अधिकारी फक्त केबिनमध्ये बसून सही करणार. तरीसुद्धा त्याला कामाची टक्केवारी जास्त पाहिजे. डेव्हलपमेंटची कामे व्हायला पाहिजेत. वेळेवर झाली नाहीत तर अधिका-यांना काही फरक पडत नाही. १० वर्षांनंतर जे.ई. डेप्युटी नंतर एक्झिक्युटीव्ह होतो. But if we do not develop work, we can not get entry. भविष्यात उपयोगी पडतील अशी कामे झाली पाहिजेत. प्रत्येक अधिकारी म्हणतो, आयुक्तांकडे जायला पाहिजे. मग आमची efficiency काय? डांबरीकरणाचे प्रत्येक टेंडर पब्लिश झाल्यानंतर it should have been retender immediately. अजूनतरी हे झालेले नाही. माझी विनंती आहे, प्रत्येक टेबलवर फाईल किती दिवस राहिली पाहीजे हे ठरवा. Co-ordination Committee ठेवायला सांगा. जिथे-जिथे आवश्यकता आहे, तिथे अधिका-यावर कारवाई करा. आम्हाला फिक्सड् डिपॉझिट नको. प्रत्येक विभागात किती टक्के कामे झालेली आहेत. महिला बालकल्याणचा निधी ३५% सुद्धा खर्च झालेला नाही. जेएनएनयूआरएमचे ४०% सुद्धा खर्च झालेले नाहीत. १००% पैसा खर्च व्हायला पाहीजे. छोट्या-छोट्या कामांना सुद्धा अधिकारी म्हणतात, कमिशनर आमच्यावर

ॲक्शन घेतील. एखाद्या कामासाठी दोन वॉर्डातून तरतूद करायची असेल तर ती सुद्धा करत नाहीत. कुठेतरी भिती आहे. अधिकारी तुम्हाला इतके घाबरतात की काम करायला तयार होत नाहीत. त्यांना कॉन्फिडन्स द्या. Only mistake will be taken action. चार प्रभागांतून चार झोनल ऑफीसर आहेत. डेव्हलपमेंटची कामे चांगली होणे ही प्रशासकीय बाब आहे. फोन कोणाला, कुठून करायचा. We do not have any right to ask. तुम्ही डेव्हलपमेंट करा.

**मा.योगेश बहल**– मा.महापौर साहेब,महापालिकेच्या इतिहासात स्थापना झाल्यापासून मा.आर.एस.कुमार होतेच. मी स्वतः गेले २५ वर्षे सदस्य आहे. मला पहिला प्रश्न पडतो, आयुक्तांची बदली करु नका, आयुक्तांना इथेच ठेवा, यावर एवढी निदर्शने करतात. पण ही वेळच का आली?याचे आत्मपरिक्षण करणे गरजेचे आहे. आजपर्यंत असे कधी घडले नाही याचे कारण काय ते बघा. ऊगीले साहेबांसारखा रेव्हेन्यू डिपार्टमेंटचा अधिकारी असला तरी महापालिकेने, या सभागृहाने त्यांना जास्तीत जास्त काम करायची संधी दिली आहे. आम्ही सुद्धा या सभागृहात त्यांच्याबद्दल आजपर्यंत चांगले उदगार काढलेले आहेत. कधीच वाईट बोललो नाही. ट्रानझॅक्शन करत असताना हीच अपेक्षा ठेवली, हा चांगला, कर्तबगार अधिकारी, सुशिक्षित अधिकारी आहे. सहा महिन्यांपूर्वी मा.मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते, आपल्या महापालिकेत एक चांगला अधिकारी आणणार आहोत. आम्ही सर्वांनी आपल्याला आदर दिला आहे. आयुक्तांची बदली करा म्हणून आजपर्यंत कुठेही वाच्यता सुद्धा केली नाही. आता निश्चित वाच्यता करतो की,आपल्या कामकाज पद्धतीत बदल करा. हे होणार नसेल तर आम्ही तुम्हाला सपोर्ट करणार नाही, निदर्शने करणार. मी या सभागृहात,महापालिका सभेमध्ये आलो असलो तरी महापालिकेत यायचे सोडून दिले आहे. तुमची कार्यपद्धती बदलणार नसालतर जी.बी.त यायचे सोडून देऊ. तुम्ही काम करणा-याला का सस्पेण्ड केले, ॲक्शन का घेतली याबद्दल बोललो नाहीत. एकाच ठिकाणी एका अधिका-याला १० ते १२ वर्षे झाली. बदली करुन कर्मचारी बदलू शकतो. डिपार्टमेंटमध्ये छोट्या-छोट्या बदल्या करायच्या. बदलीसाठी जास्त काम करणा-या, कमी खर्च करणा-या इलेक्ट्रॉनीक सुपरवायझर सगळे बदलले तरी सगळी सिस्टीम असूनही कुठे ठेवली आहे असे विचारतो, अशी आपली अवस्था झालेली आहे. मी फोन केलेला नाही. कोणी अधिकारी माझा नातेवाईक नाही. सगळ्या डेप्युटींचे एका वेळेला डिपार्टमेंट बदली केलेतरी अशीच कामे होणार असतील तर आमचे तुम्हाला सहकार्य बिलकूल राहणार नाही.

मुख्यलेखापालाचे पद असले तरी शासनाला पत्र लिहीले होते. ९६ पासून हे पद मनपा कर्मचा-यांमधून भरले जात होते. तुम्ही महाराष्ट्र शासनाचे अधिकारी आहात.भोसले साहेबांना अपॉईंट करायचा अधिकार महापालिका सभेचा आहे. त्यांना पत्र देऊन मागवले. यावरुन आम्हा नगरसेवकांत वाद झाला. कर्मचारी महासंघाने पत्र दिले,हे पद महत्वाचे आहे. सेवेतून भरावे. आयुक्तांसारखे जबाबदारीचे पद आहे. कायदा बाजूला ठेवला. तुम्ही प्रत्येक वेळी अमुक अमुक सूचना केली तेव्हा तुमच्या पाठिशी राहीलो. भोसले साहेबांना सांगितले होते,आयुक्त साहेबांना सांगा. तुम्हाला फास्ट काम करायचे असेल तर तुम्ही प्रशासकीय मान्यता घ्या. तुम्ही म्हणालात,मला नको आहे. तुम्हाला चुकीचे सांगितले होते का. प्रशासकीय मान्यता घेतली असती तर महापालिका सभेत विषय तहकूब होत होता. तुम्ही कधी काम करणार? तुम्हाला चुकीचे सांगितले होते का? तुम्हाला सांगणारे,मार्गदर्शन करणारे लोक कोण आहेत माहित नाही. हे चुकीचे लोक आहेत. ते तुम्हाला भरवतात. तुम्हाला कोणावर विश्वास आहे हाच मोठा प्रश्न आहे. कोणत्या अधिका-यावर तुमचा विश्वास आहे,कोणावरही विश्वास नाही. त्यामुळे प्रॉब्लेम होतो आहे. तुम्ही माहिती घ्या. सगळे अधिकारी चोर नाहीत. सगळे नगरसेवक भ्रष्टाचार करतात असे नाही. जो तो त्याचा त्याचा धर्म पाळत असतो. कोणाला विश्वासात घेणार नसालतर तुम्ही कशी अपेक्षा करता. तुम्ही सरकारचे नोकर आहात तर आम्ही जनतेचे नोकर आहोत. ही आमची ड्युटी आहे. लोक आम्हाला माफ करणार आहेत का? बाकीचे रस्त्यावर आलेत. त्यांना हेच पाहीजे आहे. त्यांना भांडवल करायचे आहे. सत्ता आमची,मुख्यमंत्री आमचे,महापौर आमचे,पक्षनेते आमचे,सत्ता आमची असताना तुम्हीच खरे. ड्रेनेज लाईन्स बंद पडल्या. सत्ता असताना पाणी बंद झाले. याचेही भांडवल केले. तुमचे,आमचे फोटो दिसतात. टाळ्या वाजवून दिलगीरी व्यक्त करतात. हे राजकारण आहे. तरीसुद्धा चांगल्या कामाला आम्ही सुद्धा साथ दिलेली आहे. नावे ठेवायला,वाईट बोलायला इथे आलेलो नाहीत. मुंबई इथे पवार साहेबांबरोबर बैठक झाली. पेपरमध्ये वेगळेच आले. त्या बैठकीत मी सांगितले होते, आपण देशाचे संरक्षण मंत्री असल्यापासून मिलिटरीचा प्रश्न सुटत नाहीतर नागरीक आम्हाला नावे ठेवतात. असमर्थता सुद्धा मान्य केली पाहीजे. नुकतेच कलेक्टर यांनी अजून रेड झोन ठेवल्यामुळे नवीन अडचण आल्यामुळे सगळी डेव्हलपमेंट बंद झालेली आहे. ब्ल्यू लाईन, रेड लाईनचा प्रश्न आमच्याकडे आहे. या गोष्टी तुम्ही बघा. बीआरटीची जी पत्रे दिली, इथे ठराव केला, शासनाने काय पाठवले ते सुद्धा बघा. बीआरटीएसचा विषय मंजूर झाल्यानंतर शहरात किती प्रकरणे तुमच्याकडे आली. मा.आप्पा

बारणेंसारखा माणूस या विषयावर बोलतोय. सगळे बोलत आहेत, डेव्हलपमेंट होते आहे का? आग लावणे सोप्पे असते. आग विझवायला अक्कल लागते. हे असे असे करा. आम्ही म्हणतो, हे मान्य आहे, ते मान्य आहे. ब्ल्यू लाईन, रेड लाईन, बीआरटीएसचा प्रश्न, बेकायदेशीर घरांचा प्रश्न आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तुमच्या समोर होते. अद्याप या बैठकीत निर्णय घेतलेला नाही. आमच्या शहराला ग्रहण लागले आहे. कमिशनर आमचे काहीच ऐकत नाहीत हे स्पष्टपणे इथे सुद्धा बोलतोय. आम्ही तुम्हाला म्हटले का, जो पेपर सेट करतोय त्या अधिका-याचे नाव सांगा. माझ्या वॉर्डातला एक मुलगा वाय.सी.एम. मध्ये आहे. तो ९वी परीक्षा पास आहे. त्याला लेखी परीक्षेत ग्रॅज्युएट पोरापेक्षा ३ मार्कस् जास्त आहेत. आधीच्या आयुक्तांचा कालखंड होता. कोणाचा चहा पिलो नाही. विधी समितीत ९ वर्षे होतो. सुलभाताईंना विचारा. कोणत्या अधिका-याचा चहा पिलो नाही. गैर पद्धतीने पैसा घेतला नाही. आमचा मानसन्मान ठेवणार का नाही. ऑटोक्लस्टरमध्ये मिटींग ठेवली होती. मा.आबा पाटील आले होते. तुम्ही प्रोटोकॉल पाळला का. आमचा काही सन्मान आहे का नाही. लेखी परीक्षेचे मार्कस् वाढवायला सांगितले असते तर मी नालायक आहे. १० मार्कस् पैकी किती मार्कस् दिले. १० वी पास असेल तर १ मार्क, १२ वी पास असेल तर १ मार्क, ग्रॅज्युएट असेलतर २ मार्कस्, प्रश्नाला २ मार्कस्, पिंपरी चिंचवडमधला असेल तर २ मार्कस्, बाहेरील असेलतर याचे मार्कस्, हा प्रोटोकॉल ठरवला. तुम्ही आयुक्तांसारखे काम करत नाही तर कलेक्टरसारखे काम करताय. ५ पैकी २/४ लोक बसले पाहिजेत. माझ्या भागातली ३० माणसे इथे लावली आहेत. ग्रॅज्युएट मुलाला ॲडव्हानटेज दिला. त्याला ६२.५ टक्के मार्कस् होते. तो ग्रॅज्युएट म्हणून मार्कस् दिले. मार्कशिट होती. त्याला ६२.५ टक्के असताना सुद्धा माझी शिफारस होती. टेकाळे साहेब, डॉ. गायकवाड असतील, त्यांना आम्ही काय मदत केली नाही? त्यांनी भित त्याला प्रश्नाला २ मार्कस् देऊन टाकले. संत तुकाराम नगरच्या पोराला १ मार्क दिला. तो वायसीएममध्ये ६ वर्षांपासून काम करतोय. उद्या डॉ.जगदाळेच्या घरी मी सुद्धा जाईल, असा अधिकारी काम करतो. दोघांना ६२.५ टक्के असताना सुद्धा कमीत कमी आम्ही शिफारस केली म्हणून त्याला न घेता जुन्नरच्या मुलाला घेतले. माझ्या वॉर्डातला मुलगा म्हणतो, माझ्या ३ मार्कांसाठी आपले अधिकारी पैसे घेत नाहीत मी पण पैसे मोजले असते. ही काम करायची पद्धत नव्हे. त्याच्या एका सहका-याने एक दिवसांत कॉर्पोरेटरचे नाव जोडून आणले, डिसीजन दिला, पैसे भरले त्यावर तुमचा रिमार्क काय, आश्चर्याची बाब आहे. एकत्रित पैसे खाल्ले. रेव्हेन्यूवाल्यांनी ६/६ महिने पॅनलसारखे काम केले

पाहीजे. आमदार श्री.लक्ष्मण जगताप तुमच्याकडे आले होते. ते मला म्हणाले आयुक्त साहेबांकडे जाऊ. मी म्हणालो मी येणार नाही. तुमचे ऐकून घेतील. तुमच्यात खासियत आहे. आयुक्त साहेबांशी कधी बोलायचे झालेतर आम्ही बोलणार, ते लिहीत बसणार मग म्हणणार, ठिक आहे, बघतो. प्रशासकीय दिरंगाई होऊ शकत नाही का? एक फाईल ६ ते ७ महिने पॅनल मिटींगमध्ये घेतली. टीडीआरमध्ये, पॅनलमध्ये घेतली, त्या फाईल अजूनही पॅनलकडून येत नाहीत. तुम्हाला विनंती केली होती, टीडीआर या विषयावर बसायचे. तुम्ही म्हणालात, आम्ही आणि देशमुख बसू. देशमुखांना या विषयाचा काहीच गंध नाही. त्यांनी क्रिमिनलमध्ये प्रॅक्टीस केली आहे. तुम्ही लोकांच्या ओ.के. फाईल्स बाजूला ठेवून ते घरी गेल्यानंतर एक्सपर्टसच्या निर्णयासाठी पी.नारायण यांना पाठवले. त्यांनी उत्तर दिले, साठे खत रजिस्टर्ड लागते. याला आपले अज्ञान म्हणावे, ज्ञान म्हणावे काय म्हणावे. पॅनलच्या तुमच्या लोकांच्या फाईल्स् अजून आलेल्या नाहीत. त्यांचा काय दोष? तुमची टिडीआर मिटींग होते. पठाणताईंसारख्या ज्येष्ठ नगरसेविकेने अधिका-यांशी चर्चा करुन तुमच्याशी बोलून पैसे भरले. त्यांना एक पत्र दिले, तुम्ही रिव्हर्स घेतला. हा विचार पैसे घेताना का केला नाही. माझी स्वतःची फाईल असताना मी तुमच्यावर, टीडीआर कमिटीवर फौजदारी करायची का? तुम्हाला नोटीस का देऊ नये? टीडीआर कमिटीने विचार का केला नाही? रस्ता करुन घेतला नाही. आमचे कोणतेही काम करायला, बैठक झाली म्हणून आम्ही तुमच्याकडे येत नाही. तुम्हाला आमचे ऐकायचे नाही. चुकीचे काम करा म्हणतात. हा अमुक झोन आहे. जमणार आहे. डब्ल्यू.बी.एम. भरु नका असे सांगा. How to work. कमिटीने डिसिजन घेतला नाही. त्या कमिटीत डीटीटीपी होते, लिगर †डव्हायजर,सिटी इंजिनिअर होते. इतके सूज्ञ,सन्माननीय असताना अशा प्रकारचा निर्णय घेता येत नाही. ठाम रहात नाहीत. रिव्हर्स कशी टाकता. एकीकडे हायकोर्ट इफेक्टीवीटी मागते. We are acting as per authority directions of Director of Town planning, Maharashtra. नियम मंजूर आहेत. डायरेक्टरच्या डायरेक्शनप्रमाणे काम केले. डायरेक्टर यांनी डायरेक्शन्स् दिल्या. That is called singant. We are not act as per provisions of D.C. rule. You are back foot again. How he can act? आम्ही कसे काम करायचे तुम्ही सांगा. हा निर्णय होईल, होणार नाही ठिक आहे. १५ महिन्यांपासून फाईल फिरतेय, what is this. ही काय पद्धत आहे. उलटसुलट होते. कामाची बंदी नोकरभरतीत अशा ओपिनियनमध्ये अशा संबंधित परमिशनमध्ये अशा नोंदीच्या फाईल प्रॅक्टीसला तुम्हाला ही फाईल यायला ७ महिने लागले. टाऊन प्लॅनिंगच्या नकाशात नोंद

नाही. रेकॉर्डवर नोंद नाही. सर्वेअर गेला, डेप्युटी गेला. सन्मा.एम.टी. कांबळे यांना दोन महिन्यांनंतर फाईल मिळाली. येथे तुम्ही पहा. तुम्ही सगळे ड्राईंग पाठवले. नकाशा जोडून तुमच्याकडे पाठवला. मी डायरेक्टर, डेप्युटी डायरेक्टर यांना विनंती केली, आपण बघा, तुमचा अहवाल द्या. त्याने पाहिले,जागा पाहिली. गाव नकाशात नाही,डी.पी.त नाही. आय.आय.एस. नकाशात कुठेतरी दिसते आहे. मला सांगा अशा प्रकारचे रुल्स् आहेत. तुमच्यासारखे हुशार अधिकारी असताना असे ज्यावेळी होते, त्यावेळी रुल होतो. पब्लिक इंटरेस्टमध्ये तुमच्यासारख्या अधिका-याला जस्टीस द्यावा लागतो. त्यानंतर तो कायदा होतो,नियम होतो. प्रत्येक गोष्टीला कायद्यात ठेवले,त्या पद्धतीने चालायला लागलो तर काम करता येणार नाही. नगरसेवक स्वतःसाठी मागणी करतोय का? समाजाच्या हितासाठी करतोय. यातून मालकाचेही भले होणार आहे का हे पाहीले पाहिजे. चार/पाच तासांपासून ओरडतोय. पुण्यातले बघा, ठाण्यातले बघा. महापालिकेत पार्किंग करुन काय करणार? स्वतःचे पैसे सोडणार. पार्किंग उपलब्ध करणार. You should encourage people for parking. तुम्ही ऐकून घेताय का? तुमच्या पाठीशी उभे रहायचे कारण सांगा. भ्रष्टाचा-यांना पाठीशी घाला असे म्हटले आहे का? चुकीची कामे करा असे म्हटले आहे का? सगळ्या मिटींगला, कामांना समर्थन केले पाहिजे. तुमच्या कामाच्या पद्धतीत बदल करा. शिस्त लावताय, चांगले काम करताय. आम्ही अप्रेशिएट केले. निगेटिव्ह अप्रोच बाजूला ठेवला पाहीजे. अधिका-यांना विश्वासात घेतले पाहीजे. मा.आप्पा बारणे, मा.मंगलाताई, मा.पठाणताई, मा.कैलास कदम, मा.भाऊसाहेब भोईर हे मान्यवर, इतर सदस्य आजपर्यंत बोलले आहेत. सुलभाताईंना कधी बोलू नका म्हटले आहे का, श्रीरंग बारणे, सिमाताईंना कधी बोलू नका असे आम्ही म्हटले आहे का? समाजासाठी, शहरासाठी करायचे ते सर्वांनी मिळून करायचे आहे. त्यानुसार जे काय मांडायचे ते प्रॉपरली पुट अप करा अशी माझी आपल्याला ठोस विनंती आहे. तुम्हाला कोर्टाने ६ महिने दिले होते. ते ऑगस्टमध्ये संपले. प्लॅनिंगकडे बघु नका. नवीन बांधकामांना मंजूरी देऊ नका असे सांगून झालेतरी इथून पुढील काळात बेकायदेशीर बांधकामे होऊ द्यायची नाहीत हे सगळ्यांना सांगितले आहे. नवीन बांधकामे झालेल्या लोकांची घरे उद्ध्वस्त होणार नाहीत. ड्रेनेज लाईन, पाणी बंद करा म्हणून माझ्या प्रभागात २२ लोकांना नोटीसा दिल्या आहेत. म्हाडातले लोक ३५ वर्षांपासून रहात आहेत. ते टॅक्स भरतात. त्यांनी एखादी खोली वाढवली आहे. तुमच्या आधी शर्मा साहेब, बंडसाहेब आयुक्त होते. त्यावेळी सुद्धा कोर्टाचे आदेश होते. त्यांनी केले ते तुम्ही करु नका. चांगली कामे करा. इथून पुढे परस्पेक्टीव्ह

कामे करा. Retrospective should not create. जे होणार आहे ते होईल. सामान्य नागरीक आहेत. ते तळतळाट देणार, तो सर्वांना लागणार आहे. सर्व पक्षांना लागणार आहे. तुम्ही आल्यानंतर शिस्त लावेपर्यंत अध्यादेश देईपर्यंत बोलायचे झाले, करायचे झालेतर आधीच्या आयुक्तांनी केले का? आत्ता विषय आणताय, अधिका-यांची चूक नाही का? नवीन काही काम होऊ नये, कमर्शिअल जॉबमध्ये काही बोललो का, रस्त्याबाबत कधी काय बोललो का, आरक्षणाबद्दल कधी काय बोललो का. तुम्ही नियम करता. डिसाईड करु शकत नाही. माझ्या वॉर्डातले शेख यांच्या मिसेस हार्टअटॅकने गेल्या. त्यांची परिस्थिती नव्हती. मुलगा गेला. घराबाहेर प्लास्टर केलेले नव्हते तर लगेच तुमच्या लोकांनी नोटीस दिली. स्टे दिला गेला. तुम्ही काय करणार, ओरडणार आहोत का. मी स्वतः फोन केला होता. नेहरुनगरमध्ये अपंग माणूस आहे त्याचे घर दोन वेळेला पाडले आहे. दुर्दैवाने तुमचा, त्याचा फोन होईपर्यंत सगळे डिमॉलिश करुन टाकले. आपण त्याचे नुकसान भरुन देणार आहात का? नेहरुनगरमध्ये अशाच बिल्डींगी उभ्या आहेत. आम्ही ही कामे करत नाहीत. कोणत्या पक्षाचा आहे ते बघत नाही म्हणून लोक आम्हाला वारंवार निवडून देतात. प्रॅक्टीकली कमी पडला पण एक मार्क खरेतर लागू पडला. १/२ मार्कस् गेलेतरी त्याची योगेश बहल यांनी शिफारस केली. त्यात काय चूक आहे? केलेच पाहीजे. मी त्या भागाचा प्रतिनिधी आहे. त्याभागातील लोकांचे प्रश्न जर मी सोडवले नाहीतर मला कोणी निवडून देणार आहे का? ग्रीन बेल्टमध्ये परवानग्या द्या, दोन एफ.एस.आय. द्या,माझी फाईल अशीच सोडून विनाटेंडरचे काम द्या असे इथे बोललो नाही. How we can get together. We are supporting you. आम्ही कधी कंम्प्लेण्ट केली नाही असे होऊ शकत नाही. ५३चे पद असताना अपॉईंट करुन अधिकारी आणला आहे. गायकवाड यांच्याबाबत स्ट्रेट चर्चा केली होती. भोसले यांना आणताय तर त्यांना इंटर्नल चीफ ऑडीटरचे पद देता येईल असे सांगितले होते. पाच महिन्यांपूर्वी यांनी सांगितले. तसे असेल तर आमच्या समोर विषय ठेवा. तुम्ही घेतले नाही, त्याने ठेवले नाही. तुम्ही सदस्य प्रस्ताव ठेवा म्हणालात. आम्ही सदस्य प्रस्ताव ठेवला. त्याला मान्यता दिली. महापालिका सभा असताना सुद्धा डिपार्टमेंटला प्रमोशन कमिटी घ्यायला ६/७ महिने लागले. महापालिका सभेप्रमाणेच केले. तुम्ही बघा, महापालिका सभेप्रमाणे सदस्य प्रस्ताव करायचा नाही असे कोणत्या कायद्यात म्हटले आहे. योगेश बहल यांनी मांडले नाही. अधिकृतरित्या मान्यता देऊन, सभागृहाने सर्वानुमते मान्यता दिली. Why we are not implementing that. हा मनुष्य ३१ मे ला रिटायर्ड होणार आहे. हा आदेश

तहकूब झाला. तो प्रमोशनशिवाय घरी गेलातर केवळ तुमच्या दिरंगाईमुळे, तुमच्या हलगर्जीपणामुळे. तुमच्यासमोर लोक का ठेवत नाहीत. डॉ.नागकुमार यांनी जी.बी.च्या धर्तीवर हायकोर्टात केस टाकली होती. यात महासभेने डॉ.अय्यर व इतर जे कोणी त्यावेळी सेवाज्येष्ठतेत होते, त्यांना डावलून डॉ.नागकुमार यांना मान्यता दिली होती. महापालिका सभेने अपॉईंटमेंट दिली होती म्हणून हायकोर्टाचा निकाल डॉ.नागकुमार यांच्या बाजूने लागला. याला मंजूरी दिली असताना विधी समिति महासभेपेक्षा मोठी आहे का? ऑर्डर करुन मोकळे व्हा. कोण वेटींग आहेत. झुरे साहेबांचा विषय आत्ता आला. दुसरा अधिकारी असेलतर कोण त्याच्यासाठी थांबले आहेत. चांगला विषय असेल तर, दादांना सांगायचे, मुख्यमंत्र्यांना सांगितले असेल तर १के खाली कसे घेऊन या, आम्ही तुमच्या लोकांचे ऐकतो, मंजूर करतो. अनेक वेळा विरोध होतो. This is not understanding. अंडरस्टँडींग ओपन असले पाहीजे. Not only take, take and not go, it should be come & take. माझी आपल्याला कृपया विनंती आहे. किमान डिपार्टमेंटला डायरेक्शन्स द्या. डिपार्टमेंटकडे फाईल असलीतरी तुमच्यापर्यंत यायला इथे स्क्रिनींग होणार आहे. त्यासाठी स्क्रिनींग कमिटी सर्वेअर, जे.ई., एक्झिक्युटीव्ह इंजिनिअर, डेप्युटी इंजिनिअर सगळयांनी मेहनत केल्यानंतर डेप्युटी लेवलचा अधिकारी, जे.ई. लेवलचा अधिकारी किंवा एक्झिक्युटीव्ह लेवलचा अधिकारी एक्झामिन करणार. महिना घेणार. तुमच्याकडे जाणार. त्याला कटआऊट डेट केली. सगळे झाले नाही. १५ दिवसांत घ्यायला पाहीजे, १५ दिवसांत ओपिनियन पाहीजे. ज्या लोकांना काम करायचे, अशाच लोकांनी काम घ्यावे. ज्याला अपॉईंट करायचे, त्याला करा. ज्याला एक्सपर्ट समजतो, त्या लोकांनी तुम्हालासुद्धा चुकीचे ओपिनियन दिलेले आहे. २ मध्ये एक्सपर्ट ओपिनियन घेतले आहे. रेट योग्य होता, त्यात ओपिनियन आलेले होते. सभागृहात, महापालिकेत you just act. या गोष्टी क्लिअर असल्या पाहीजेत. किती वेळा सांगायचे. एवढ्या मिटींगा घेता. बिल्डींग परमिशनचे अधिकारी, भदाणे मॅडम she is brilliant lady, त्यांना घ्या. सिटी इंजिनिअर यांना घ्या. तुमची पॉलिसी कोणत्या पद्धतीने चालवायची आहे. पिंपळे गुरवचे पत्र तिथे काहीतरी लिहून दिलेतरी चालेल. वंदे मातरम, जय बजरंग या संघटना इथे एकमेकांचे कपडे काढायला इतके लोक बसले आहेत. काही लोकांना कामच नसते. सकाळी झोला घेऊन निघतात. कोण काय करतो ते काढायचे. कुठेतरी टाटा, बिर्ला झाले आहेत. तोंडावर पॉझिटीव्ह, सेन्सिबल बोलतात. तुम्ही अशा लोकांना ओळखायला शिकावे. तुमच्याबद्दल वैयक्तिक तक्रार नाही. तुमची काम करायची पद्धत बदलावी. आमची

विनंती ऐकाल असे मला वाटते. टेंडरची जी पद्धत आहे. ८० टक्के जागा असली पाहीजे. तिथपर्यंत ठिक आहे. १०० टक्के जागेसाठी टेंडर तुम्ही केले. It will be difficult. That is always negotiable. रेडी रेकनरप्रमाणे पैसे पाहीजेत. टीडीआर नको असे शेतकरी म्हणू शकतो. जमिनीची व्हॅल्यू ठरवावी लागेल. स्थायी समितीकडे जावे लागेल. त्याप्रमाणे नुकसान होणार नाही असे करावे लागेल. शेतक-याने १०० टक्के डिमांड केलेतर तसे होणार नाही. इथून पुढे टीडीआर मिटींग दर महिन्याला घेऊ नका. दोन महिन्यांना तरी घ्या म्हणून विनंती केली होती. टीडीआर,टीडीआर काय आहे हे एकदा कमिटीला, पत्रकार मंडळींना पण समजून सांगा. तुम्ही पैसे द्या, आम्ही कुठे नको म्हटले आहे. शहराचा विकास फास्ट करायचा असेल तर एक्सपेडीएट करायचे असेलतर सर्वांना विश्वासात घेऊन करावे लागणार आहे. केवळ बिल्डर लॉबीला फेवर करा, राष्ट्रवादीला फेवर करा असे म्हणणार नाही. सगळ्यांनी मिळून केलेतर we can work together. पर्सनल इंटरेस्ट नाही. शर्मा साहेबांचे आम्ही आजसुद्धा कौतुक करतो. आम्ही डायरेक्ट सांगितले होते, हे काम असे झालेतर महापालिकेचा इतका फायदा होणार आहे. यात अमुक अमुक पैसे मिळणार आहेत. मला त्यांनी उत्तर काय द्यावे. त्यांनी मला स्पष्ट सांगितले, योगेश मी माझ्या आई-वडीलांचा एकच मुलगा आहे. मी माझे कुटूंब वेल सेटल्ड आहोत. मी माझ्या पगारात खूप समाधानी आहे. मला अमिष दिलेतरी मी घेणार नाही, अशा चष्मा घालून ते वागले. प्रत्येक फाईलमध्ये त्याच चष्म्याने वागले. माझी नितीमत्ता बघतच नाही. कायद्याच्या चाकोरीत बसून मदत करता येईल तेवढीच करायची आहे. त्यांचे कौतुक करतो. उद्या तुमचे कौतुक व्हावे अशा पद्धतीने आम्हाला तुमच्याकडून अपेक्षा आहे. तुम्ही स्वतःचे नियम असणारे आहात. जर याठिकाणी त्याच पद्धतीने पक्षाच्या अनुषंगाने चूक केलेली असेल तर राज्य शासनाला निर्णय घेण्यात दिरंगाई होते. तुमची पण अडचण होते आहे. ज्या नोटीसा दिल्या आहेत त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन प्रत्येकाचे म्हणणे ऐका. त्यात तथ्य काय आहे ते बघून घ्या. अधिका-यांनी नोटीस कधी दिली. काम केव्हा सुरु झाले. याची अधिका-यांना प्रोव्हिजन करायला सांगा. तेवढे फोटोग्राफ बघा. समोरच्याचे म्हणणे सुद्धा बघा. याबाबत कंट्रोल आणला तरी शहरात बेकायदेशीर बांधकामे होऊ द्या. तुमचे सगळे बरोबर आहे. मागील कमिशनरांच्या वेळी दि.३१/३/१२ ही तारीख मानावी लागते आहे. राज्यपालांचा अध्यादेश आहे. हा जी.आर. मधून आलेला आदेश आहे. तुम्ही आलात, त्या तारखेपर्यंत कोण करु शकते हा तुमचा आमचा संकल्प समजून आम्ही २०१२ पर्यंतच्या लोकांना संजीवनी देणार. या २/३ महिन्यांत कायद्याप्रमाणे देता

येणार नाही. मुळात अंडरस्टॅंडींगमध्ये फेवर देऊन लोकांना मदत करु नका. भाडेकरु, कार्यकर्ता यांना त्रास देऊ नका. एवढी विनंती आहे. राज्य शासनाला पुन्हा अधिकारांत निर्णय घेताना राज्याचा विचार करुन निर्णय घ्यावा लागणार आहे. शासनाला त्रास होतो आहे. त्यातून मार्ग काढावा लागणार आहे. समंजसपणे निर्णय घ्यावा लागणार आहे. पक्षनेत्यांना व महापौरांना मनापासून शुभेच्छा देतो. पेपरमध्ये काय, कधी छापतात, कसे कळते. मी शहर अध्यक्ष किंवा कोणी सन्मा.नगरसेवकांने यांची बदली करा, असे कधी म्हटलेले नाही. उलट दादांनी त्यांना चांगले काम करतात म्हणून इथे आणले आहे.

**मा.मंगला कदम** – मा.महापौर साहेब, आज खरेतर सभागृहात कोणाच्याही मनात बोलावे असे नव्हते. परंतू मनात राहू नये म्हणून सभागृहाला चर्चेसाठी विषय आणला. ध चा मा झालातर काय होते हे पाहीले आहे म्हणून पहिल्यांदा सगळ्यांनी मनापासून मनातून चर्चा केलेली आहे. कोणीतरी उठवले, आम्ही मुंबईला गेलो. आदरणीय पवार साहेब, मुख्यमंत्री व दादांना समजावले. यांच्यासमोर सांगून चांगला मार्ग काढू. मार्ग सुकर करावा या दृष्टीकोणातून विषय निघाला होता. काही लोकांना याचा वेगळा अर्थ काढला. आम्ही काहीतरी करा म्हटले. जाहीररित्या सगळ्यांना सांगितले होते. आम्ही सुद्धा इतकी वर्षे राजकारणात काम करतो. तीन वर्षे झाल्याशिवाय बदली होत नाही. आहे त्यांच्याकडून काम करुन घ्यायची सवय पाहीजे. शहरातील रथाची दोन चाके बरोबर चालली होती. प्रशासन व नगरसेवक हे बरोबर चालले होते. मघाशी तुम्हाला म्हटले, दर मिटींगला काही ना काहीतरी गोष्ट घडते. एवढी निर्मिती होते. गोंधळात कोण कोणाला ओरडतो. सकाळपासून सगळ्या नगरसेवकांना कळाले, चारही प्रभागांत निवासी लोकांवर फौजदारी गुन्हा दाखल करणार आहेत. हे समजल्यानंतर नगरसेवकांची मानसिक स्थिती खराब होणार नाहीतर काय होणार? सगळे नगरसेवक भयभीत झालेले आहेत. यात नगरसेवकांची काय चूक आहे. नवीन नगरसेवक पहिल्यांदा निवडून आलेले आहेत. त्यांची तर अजिबात चूक नाही. पहिल्यांदा निवडून आलेले सगळेच नगरसेवक मुंबईला दादांबरोबर मिटींगला दोन वेळा होते. पदाधिका-यांची चूक नाही. पहिली प्लींथ पडली, बांधकामे झाले त्यावेळी अधिका-यांना का टोकले नाही. प्राधिकरणातील वेदपाठक नावाचा माणूस बांधकामात प्लींथ पडली की पैस घ्यायचा. याचा हा सगळा परिणाम आहे. आज सगळ्या कामगार लोकांची बांधकामे पाडली आहेत. अधिका-यांची चूक का नाकारता? पहिले प्रशासन गुन्हेगार आहे. सभागृहाला सांगू

इच्छिते, राष्ट्वादीची सत्ता असलीतरी चांगले काम करण्याचा ठसा दाखवताना ज्यावेळी कामे करत असतो, आम्ही सुद्धा अजिबात नागरीकांना सपोर्ट करत नाही की, तुम्ही चुकीची कामे करा, अनधिकृत काम करा. जिथे चुकीचे काम चालत असेल तर मी स्वतः सांगते. जाहीरपणे रस्त्यावर आंबेडकर पुतळ्यासमोर बोलले होते. प्रत्यक्षपणे कितीतरी वेळा तुम्हाला सांगत असते. सगळे जे.ई. सगळ्या नगरसेवकांकडे गेले तरी सगळ्या नगरसेवकांनी ठरवले आहे की, कोणी कोणाची शिफारस करायची नाही. प्रत्येक जण समजून आहे, इतकी वर्षे काम केलेली मंडळी जाणारच. तुमच्याकडे ज्यावेळी मिटींग झाली, तुमचे काम तुम्हीच केले पाहीजे. आमचे काम आम्हीच केले पाहीजे. जे लोक चुकलेले आहेत, त्यांना पाठीशी घालायला पाहीजे. एक वीट दहा रुपयाला येते. सिमेंट, वाळू, लेबर चार्जेस आले. अशा पद्धतीने एखादा माणूस घर बांधतो. अक्षरशः ते पडताना त्याला किती वाईट वाटते. नागरीकांमध्येही राजकारण केले जाते आहे. विरोधक असतो तो सांगतो, अशा पद्धतीची भूमिका चालली आहे. कुठेतरी एकमेकांना समजून घेण्याची वेळ आलेली आहे. तुम्ही इतके हुशार आहात. कामकाजाची पद्धत आहे. आजपर्यंत पिंपरी चिंचवड शहरात कधी झालेले होते. अधिका-यांनी कमिशनरांना रोखले होते. कमिशनरांना सुद्धा नगरसेवकांनी कधी रोखले नाही. या गोष्टीचा कुठेतरी ऊहापोह व्हायला पाहीजे. म्हणून चर्चा केलेली आहे. आज श्रद्धांजली वाहून सभा तहकूब करणार आहोत. या घटनेचा राग आहे. पाकिस्तानमध्ये निधन पावलेल्या सरबजितसिंग या भारतीय तरुणाचे यकृत, किडनी व पित्ताशय हे अवयव काढण्यात आले. या गोष्टीचा, घटनेचा निषेध म्हणून ही सभा तहकूब करायची का, महापौरांना टार्गेट करायचे काही कारण आहे का. देशाला या तरुणाचा अभिमान आहे. मा.उल्हास शेट्टी यांनी जी उपसूचना मांडली आहे त्याला अनुमोदन देते. सरबजितसिंग या तरुणास श्रद्धांजली वाहून ही सभा दि.९/५/२०१३ रोजी दुपारी १.०० वा. पर्यंत तहकूब करण्यात यावी.

**मा.तानाजी खाडे** – मा.महापौर साहेब, मा.मंगलाताई कदम यांनी मांडलेल्या सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.श्रीकर परदेशी (मा.महापालिका आयुक्त)** – मा.महापौर साहेब, सर्व उपस्थित सन्मा. नगरसेवक व नगरसेविका, जेवढे सदस्य बोलले त्याबाबत मला माझी बाजू मांडायची संधी देण्यात यावी अशी विनंती करतो.

**मा.महापौर** – ही सभा दि.९/५/२०१३ रोजी दुपारी १.०० वा. पर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

(मोहिनीताई विलास लांडे)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८</u>**

**<u>मा.महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक - १६</u>**

**<u>(दिनांक २०/४/२०१३ व दि.४/५/२०१३ ची तहकूब सभा)</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

दिनांक - ०९/०५/२०१३ वेळ - दुपारी १.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे दिनांक ४ एप्रिल २०१३ ची तहकूब मा.महापालिका सभा बुधवार दिनांक ०९/०५/२०१३ रोजी दुपारी १.०० वा.महानगरपालिकेची प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
२. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.सायकर अजय शंकरराव
१०.मा.जाधव साधना रामदास
११.मा.जाधव राहुल गुलाब
१२.मा.आल्हाट मंदा उत्तम
१३.मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१४. मा.काळजे नितीन प्रताप
१५.मा.जगदीश शेटटी
१६.मा.बाबर शारदा प्रकाश
१७.मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१८.मा.उल्हास शेट्टी

१९.मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
२०.मा.पवार संगीता शाम
२१.मा.उबाळे सुलभा रामभाऊ
२२.मा.तानाजी विठ्ठल खाडे
२३.मा.बो-हाडे शुभांगी संजय
२४.मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित
२५.मा.भारती फरांदे
२६. मा.आर.एस.कुमार
२७.मा.जावेद रमजान शेख
२८.मा.चारुशीला प्रभाकर कुटे
२९.मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
३०.मा.पांढरकर निलेश शंकरराव
३१.मा.नंदा विकास ताकवणे
३२.मा.नेटके सुमन राजेंद्र
३३.मा.तरस बाळासाहेब जयवंत
३४.मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३५.मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३६.मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
३७.मा.लोंढे गणेश नारायण
३८.मा.शमीम पठाण
३९.मा.†›.संदीप गुलाब चिंचवडे
४०.मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
४१.मा.अपर्णा निलेश डोके
४२.मा.अनंत सुभाष को-हाळे
४३.मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४४.मा.पवार मनिषा काळूराम
४५. मा.प्रसाद शेटटी
४६. मा.अविनाश (दादा) टेकावडे
४७. मा.काळभोर वैशाली जालिंदर
४८. मा.सौ साळुंके सविता सुरेश

४९ मा.शेख अस्लम शैकत

५०. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

५१. मा.वाबळे संजय मल्हारराव

५२. मा.सौ.गवळी सुनिता(माई) पांडूरंग

५३. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५४. मा.अजित दामोदर गव्हाणे

५५. मा.गोफणे अनुराधा देविदास

५६. मा.जालिंदर (बापू) शिंदे

५७. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

५८. मा.महेशदादा किसन लांडगे

५९. मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६०. मा.सावळे सिमा रविंद्र

६१. मा.भोसले राहुल हनुमंतराव

६२. मा.पालांडे सुजाता सुनिल

६३. मा.बहल योगेश मंगलसेन

६४. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

६५. मा.कदम सदगुरु महोदव

६६. मा.कैलास महादेव कदम

६७. मा.चाबुकस्वार गौतम सुखदेव

६८. मा.आसवाणी सविता धनराज

६९. मा.वाघेरे सुनिता राजेश

७०. मा.आसवाणी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

७१. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव

७२. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७३. मा.काळे विमल रमेश

७४. मा.पाडाळे निता विलास

७५. मा.विनोद जयवंत नढे

७६. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

७७. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

७८. मा.विमलताई सुरेश जगताप

७९. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
८०. मा.बारणे निलेश हिरामण
८१. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
८२. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे
८३. मा.बारणे माया संतोष
८४. मा.यमुनाताई रमणनाना पवार
८५. मा.कलाटे स्वाती मयुर
८६. मा.नांदगुडे विलास एकनाथ
८७. मा.चौंधे आरती सुरेश
८८. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
८९. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे
९०. मा.बोकड रामदास गेणभाऊ
९१. मा.जवळकर वैशाली राहुल
९२. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
९३. मा.जगताप राजेंद्र गणपत
९४. मा.शितोळे शैलजा बाबुराव
९५. मा.जगताप नवनाथ दत्तू
९६. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
९७. मा.अतुल अरविंद उर्फ नानासाहेब शितोळे
९८. मा.प्रशांत शितोळे
९९. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
१००. मा.शेंडगे आशा सुखदेव
१०१. मा.मोटे किरण बाळासाहेब
१०२. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
१०३. मा.संजय केशवराव काटे
१०४. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब
१०५. मा.बो-हाडे अरुण तुकाराम
१०६. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.डॉ.श्रीकर परदेशी-आयुक्त,मा.झुरे-सहआयुक्त,मा.मुंढे, मा.कुलकर्णी, मा.टेकाळे,मा.दुरगुडे–सहा.आयुक्त,मा.घाडगे-मुख्यलेखापरिक्षक,मा.गावडे-नगरसचिव,

मा.कांबळे-प्र.शहर अभियंता,मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.चव्हाण, मा.तुपे, मा.काची-सहशहर अभियंता,मा.भोसले-मुख्यलेखापाल,मा.डॉ.गायकवाड-प्र.आरोग्य वैद्य.अधिकारी,मा.डॉ.पवन साळवे-अति.आरोग्य वैद्य.अधिकारी मा.भदाणे-उपसंचालक (नगररचना),मा.दुधेकर,मा.निकम, मा.सवणे, मा.शरद जाधव,मा.तांबे, मा.साळवी, मा.कुलकर्णी, मा.लडकत, मा.पिरजादे, मा.दांगट, मा.बरशेटटी, मा.खाबडे, मा.सय्यद-कार्य.अभियंता, मा.कांबळे-प्र.शिक्षणाधिकारी (माध्य.), मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक,मा.चव्हाण-आरोग्य कार्यकारी अधिकारी, मा.पोमण-संगणक अधिकारी, मा.पवार-प्र.कायदा सल्लागार,मा.लावंड-कायदा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर** :- उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.तानाजी खाडे** - मा महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब माझे प्रभागातील ज्येष्ठ नागरीक सुनिता मनसुख फिरोदिया यांचे आज रात्री/पहाटे दुखद निधन झाले त्यामुळे माझी सभागृहाला विनंती आहे की, त्यांना श्रध्दांजली देण्यात यावी.

**मा.उल्हास शेटटी** - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे कर्मचारी गणेश हगवणे यांचे डेपोमध्येच दुखद निधन झाले त्यांना सुध्दा श्रध्दांजली देण्यात यावी.

**मा.दत्ता साने** - मा.महापौर साहेब सुचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर** - सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

-------

**<u>नियुक्त्या</u>**

विषय क्रमांक १) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० अन्वये व पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इ. चे संचालन करण्याविषयीचे जादा नियमांपैकी नियम क्र.६७ मध्ये निर्देश केल्याप्रमाणे खालील ४ (चार) विशेष समित्या नेमणे :-

(१) विधी समिती -

(टिप-विधी समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.)

(२) महिला व बालकल्याण समिती –

अ) महिला व बालकल्याण समितीवर २ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करणे.

ब) महिला व बालकल्याण समितीवर ७ मा.महिला सदस्यांच्या नियुक्त्या करणे.

(३) शहर सुधारणा समिती

(टिप-शहर सुधारणा समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.)

(४) क्रिडा समिती

(टिप-क्रिडा समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.)

**मा.नगरसचिव** - विषय क्रमांक १ - मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० अन्वये व पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इ. संचालन करण्याविषयीचे जादा नियमांपैकी नियम क्र.६७ मध्ये निर्देश केल्याप्रमाणे ४ (चार) विशेष समित्या नेमणे. विशेष समित्यांच्या मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देऊन नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या आहेत.

(१) विधी समिती – विधी समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.

विधी समितीवर ९ पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करणेकामी महानगरपालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी-८३, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी-२२,शिवसेना व आर.पी.आय. महायुती (आघाडी)-१५, महाराष्ट्र नवनिर्माण सेना-०४, भारतीय जनता पक्ष-०३ याप्रमाणे असणारे पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळाप्रमाणे त्यांच्यावतीने विधी समितीवर नामनिर्देशित करावयाच्या सदस्यांची संख्या राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी-०६,भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी-२, शिवसेना व आर.पी.आय. महायुती (आघाडी) – १, याप्रमाणात असल्याचे महानगरपालिकेने विचारात घेवुन आणि महानगरपालिकेतील सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन त्यांनी महानगरपालिकेतील त्यांच्या पक्षाच्या/गटाच्या

तौलानीक संख्याबळाच्या प्रमाणात त्यांच्यामार्फत विधी समितीवर पालिका सदस्यांची नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी मा.महापौर यांजकडे सभेच्या वेळी पाठविलेल्या नावांचे बंद लखोटे मूळच्याच अवस्थेत असुन ते पुर्वी उघडलेले नाहीत याची उपस्थितांना खात्री करण्यासाठी बंद लखोटे सभेपुढे दाखविणेत आल्यानंतर सदर बंद लखोटे टेबलावर ठेवुन ते मा.महापौर यांनी क्रमाने सर्वांच्या समोर उघडुन प्रत्येक लखोटा उघडल्यानंतर त्यातील नावे सभेत उपस्थित श्री.बोदडे यांचेमार्फत सभेमध्ये वाचून दाखविण्यात आल्यानंतर सभेत वाचण्यात आलेल्या नावांबद्दल ज्या गटनेत्याकडून ही नावे आली होती त्यांचे काही आक्षेप नसल्याने त्याप्रमाणे पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.मोटे किरण बाळासाहेब,२) मा.काळभोर वैशाली जालिंदर, ३) मा.जाधव साधना रामदास,४) मा.प्रशांत शितोळे, ५) मा.शितोळे शैलजा बाबुराव,६) मा.काळजे नितीन प्रताप, ७) मा.जवळकर वैशाली राहूल, ८) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव, ९) मा.बारणे निलेश हिरामण या पालिका सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विधी समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाद्वारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे मा.महापौर यांजकडुन जाहीर करण्यात आले.

मा.नगरसचिव – (२) महिला व बालकल्याण समिती –

(अ) महिला व बालकल्याण समितीवर २ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.

[महिला व बालकल्याण समितीवर २ पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करणेकामी महानगरपालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी-८३, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी-२२,शिवसेना व आर.पी.आय. महायुती (आघाडी)-१५, महाराष्ट्र नवनिर्माण सेना-०४, भारतीय जनता पक्ष-०३ याप्रमाणे असणारे पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळाप्रमाणे त्यांच्यावतीने महिला व बालकल्याण समितीवर नामनिर्देशित करावयाच्या सदस्यांची संख्या राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी-०६,भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी-२, शिवसेना व आर.पी.आय. महायुती (आघाडी) – १, याप्रमाणात असल्याचे महानगरपालिकेने विचारात घेवुन आणि महानगरपालिकेतील सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/ पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन त्यांनी महानगरपालिकेतील त्यांच्या पक्षाच्या/गटाच्या तौलानीक संख्याबळाच्या प्रमाणात त्यांच्यामार्फत महिला

व बालकल्याण समितीवर पालिका सदस्यांची नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी मा.महापौर यांजकडे सभेच्या वेळी पाठविलेल्या नावांचे बंद लखोटे मूळच्याच अवस्थेत असुन ते पुर्वी उघडलेले नाहीत याची उपस्थितांना खात्री करण्यासाठी बंद लखोटे सभेपुढे दाखविणेत आल्यानंतर सदर बंद लखोटे टेबलावर ठेवुन ते मा.महापौर यांनी क्रमाने सर्वांच्या समोर उघडुन प्रत्येक लखोटा उघडल्यानंतर त्यातील नावे सभेत उपस्थित श्री.बोदडे यांचेमार्फत सभेमध्ये वाचून दाखविण्यात आल्यानंतर सभेत वाचण्यात आलेल्या नावांबद्दल ज्या गटनेत्याकडून ही नावे आली होती त्यांचे काही आक्षेप नसल्याने त्याप्रमाणे पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.तापकीर अनिता मच्छिंद्र व २) मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ या पालिका सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाद्वारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे मा.महापौर यांजकडुन जाहीर करण्यात आले.]

मा.नगरसचिव – (३) शहर सुधारणा समिती –

शहर सुधारणा समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.
[शहर सुधारणा समितीवर ९ पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करणेकामी महानगरपालिकेत राष्ट्रवादी कॉंग्रेस आघाडी-८३, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी-२२,शिवसेना व आर.पी.आय. महायुती (आघाडी)-१५, महाराष्ट्र नवनिर्माण सेना-०४, भारतीय जनता पक्ष-०३ याप्रमाणे असणारे पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळाप्रमाणे त्यांच्यावतीने शहर सुधारणा समितीवर नामनिर्देशित करावयाच्या सदस्यांची संख्या राष्ट्रवादी कॉंग्रेस आघाडी-०६, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी-२, शिवसेना व आर.पी.आय. महायुती (आघाडी) – १, याप्रमाणात असल्याचे महानगरपालिकेने विचारात घेवुन आणि महानगरपालिकेतील सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/ पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन त्यांनी महानगरपालिकेतील त्यांच्या पक्षाच्या/गटाच्या तौलानीक संख्याबळाच्या प्रमाणात त्यांच्यामार्फत शहर सुधारणा समितीवर पालिका सदस्यांची नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी मा.महापौर यांजकडे सभेच्या वेळी पाठविलेल्या नावांचे बंद लखोटे मूळच्याच अवस्थेत असुन ते पुर्वी उघडलेले नाहीत याची उपस्थितांना खात्री करण्यासाठी बंद लखोटे सभेपुढे दाखविणेत आल्यानंतर सदर बंद लखोटे टेबलावर ठेवुन ते मा.महापौर यांनी क्रमाने सर्वांच्या समोर उघडुन प्रत्येक लखोटा उघडल्यानंतर त्यातील नावे सभेत उपस्थित

श्री.बोदडे यांचेमार्फत सभेमध्ये वाचून दाखविण्यात आल्यानंतर सभेत वाचण्यात आलेल्या नावांबद्दल ज्या गटनेत्याकडून ही नावे आली होती त्यांचे काही आक्षेप नसल्याने त्याप्रमाणे पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.सुपे आशा रविंद्र, २) मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर, ३) मा.सौ.साळुंके सविता सुरेश, ४) मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के.बापू, ५) मा.तानाजी विठ्ठल खाडे, ६) मा.ननवरे जितेंद्र बाबा, ७) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील), ८) मा.जयश्री वसंत गावडे, ९) मा.चारुशिला प्रभाकर कुटे या पालिका सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शहर सुधारणा समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाद्वारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे मा.महापौर यांजकडुन जाहीर करण्यात आले.]

मा.नगरसचिव – (४) क्रिडा समिती –

क्रिडा समितीवर ०९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.

[क्रिडा समितीवर ९ पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करणेकामी महानगरपालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी-८३, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी-२२,शिवसेना व आर.पी.आय. महायुती (आघाडी)-१५, महाराष्ट्र नवनिर्माण सेना-०४, भारतीय जनता पक्ष-०३ याप्रमाणे असणारे पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळाप्रमाणे त्यांच्यावतीने क्रिडा समितीवर नामनिर्देशित करावयाच्या सदस्यांची संख्या राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी-०६, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी-२, शिवसेना व आर.पी.आय. महायुती (आघाडी) – १, याप्रमाणात असल्याचे महानगरपालिकेने विचारात घेवुन आणि महानगरपालिकेतील सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/ पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन त्यांनी पक्षाच्या/गटाच्या तौलानीक संख्याबळाच्या प्रमाणात त्यांच्यामार्फत शहर सुधारणा समितीवर पालिका सदस्यांची नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी मा.महापौर यांजकडे सभेच्या वेळी पाठविलेल्या नावांचे बंद लखोटे मूळच्याच अवस्थेत असुन ते पुर्वी उघडलेले नाहीत याची उपस्थितांना खात्री करण्यासाठी बंद लखोटे सभेपुढे दाखविणेत आल्यानंतर सदर बंद लखोटे टेबलावर ठेवुन ते मा.महापौर यांनी क्रमाने सर्वांच्या समोर उघडुन प्रत्येक लखोटा उघडल्यानंतर त्यातील नावे सभेत उपस्थित श्री.बोदडे यांचेमार्फत सभेमध्ये वाचून दाखविण्यात आल्यानंतर सभेत वाचण्यात आलेल्या नावांबद्दल ज्या गटनेत्याकडून ही नावे आली होती त्यांचे काही आक्षेप नसल्याने त्याप्रमाणे पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन, २) मा.वसंत (नाना)

आनंदराव लोंढे, ३) मा.बोकड रामदास गेणभाऊ, ४) मा.उल्हास शेट्टी, ५) मा.वाघेरे प्रभाकर नामदेव, ६) मा.भारती फरांदे, ७) मा.प्रसाद शेट्टी, ८) मा.काळे विमल रमेश, ९) मा.आल्हाट धनंजय मुरलीधर या पालिका सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्रिडा समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाद्वारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे मा.महापौर यांजकडुन जाहीर करण्यात आले.]

ठराव क्रमांक - २६२ विषय क्रमांक - १

दिनांक - ९/५/२०१३ विभाग - नगरसचिव

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० अन्वये व पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इ. चे संचालन करण्याविषयीचे जादा नियमांपैकी नियम क्र. ६७ मध्ये निर्देश केल्याप्रमाणे १) मा.विधी समिती, २) मा.महिला व बालकल्याण समिती, ३) मा.शहर सुधारणा समिती, ४) मा.क्रिडा समिती या ४ (चार) विशेष समित्या नेमण्यात आल्या असल्याचे जाहीर करणेत येत आहे. तसेच

१) **<u>मा.विधी समिती</u>** – विधी समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१ अ मध्ये तरतुद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाद्वारे करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे/नोंदणीकृत पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवुन आणि सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.मोटे किरण बाळासाहेब,२) मा.काळभोर वैशाली जालिंदर, ३) मा.जाधव साधना रामदास,४) मा.प्रशांत शितोळे, ५) मा.शितोळे शैलजा बाबुराव,६) मा.काळजे नितीन प्रताप, ७) मा.जवळकर वैशाली राहूल, ८) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव, ९) मा.बारणे निलेश हिरामण या पालिका सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विधी समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाद्वारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे जाहीर करणेत येत आहे. तसेच –

२) **<u>मा.महिला व बालकल्याण समिती</u>** - अ) महिला व बालकल्याण समितीवर २ मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१अ मध्ये तरतुद

केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाद्वारे करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे/नोंदणीकृत पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवुन आणि सभागृह नेता / विरोधी पक्षनेता / पक्षनेता / गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.तापकीर अनिता मच्छिंद्र व २) मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ या पालिका सदस्यांच्या व (ब) महिला व बाल कल्याण समितीवर ७ मा.महिला सदस्यांच्या नियुक्त्या सन सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१अ मध्ये तरतुद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाद्वारे करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे/नोंदणीकृत पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवुन आणि सभागृह नेता / विरोधी पक्षनेता / पक्षनेता / गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.लोंढे शुभांगी संतोष, २) मा.पालांडे सुजाता सुनिल ३) मा.नेटके सुमन राजेंद्र, ४) मा.गोफणे अनुराधा देविदास, ५) मा.थोरात वनिता एकनाथ, ६) मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर, ७) मा.विमलताई सुरेश जगताप या पालिका महिला सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महिला व बाल कल्याण समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाद्वारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे जाहीर करणेत येत आहे. तसेच –

३) **<u>मा.शहर सुधारणा समिती</u>** – शहर सुधारणा समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१ अ मध्ये तरतुद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाद्वारे करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे/नोंदणीकृत पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवुन आणि सभागृह नेता/ विरोधी पक्षनेता/पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.सुपे आशा रविंद्र, २) मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर, ३) मा.सौ.साळुंके सविता सुरेश, ४) मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के.बापू, ५) मा.तानाजी विठ्ठल खाडे, ६) मा.ननवरे जितेंद्र बाबा, ७) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील), ८) मा.जयश्री वसंत गावडे, ९) मा.चारुशिला प्रभाकर कुटे या पालिका सदस्यांच्या पिंपरी चिंचवड

महानगरपालिकेच्या शहर सुधारणा समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाद्वारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे जाहीर करणेत येत आहे. तसेच –

४) **मा.क्रिडा समिती** – मा.क्रिडा समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१ अ मध्ये तरतुद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाद्वारे करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे/नोंदणीकृत पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवुन आणि सभागृह नेता / विरोधी पक्षनेता/पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन, २) मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे, ३) मा.बोकड रामदास गेणभाऊ, ४) मा.उल्हास शेट्टी, ५) मा.वाघेरे प्रभाकर नामदेव, ६) मा.भारती फरांदे, ७) मा.प्रसाद शेट्टी, ८) मा.काळे विमल रमेश, ९) मा.आल्हाट धनंजय मुरलीधर या पालिका सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्रिडा समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाद्वारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

**महापौर**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी – ४११ ०१८.**

---------------

(अ) मा.महापालिका सभा क्र.११ दि.२०/१२/२०१२, दि.१९/१/२०१३, दि.२२/१/२०१३, दि.११/२/२०१३ व दि.१२/०२/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(ब) मा.महापालिका सभा क्र.१२ दि.१९/१/२०१३, दि.२२/१/२०१३ व दि.११/२/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(क) मा.महापालिका सभा क्र.१३ दि.२०/२/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(ड) मा.महापालिका सभा क्र.१५ दि.२०/३/२०१३, दि.२२/३/२०१३ (दुपारी १.०० व १.२०) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------------

**<u>प्रश्नोत्तरे</u>**

(मुंबई प्रांतिक म.न.पा. अधिनियम १९४९ चे कलम ४४ अन्वये)

**मा.महापौर** - प्रश्नोत्तरासाठी अर्धा तास वेळ देणेत येत आहे.

**मा.आर.एस.कुमार** - मिटिंगचे पुर्ण रेकॉर्डिंग होणार आहे का? प्रत्येक प्रश्नाचे उत्तर बरोबर दिलेले नाही. प्रश्नामध्ये जी माहीती विचारली त्याप्रमाणे उत्तर दिलेले नाही. बीआरटीबद्दल जे उत्तर दिलेले आहे, त्यामध्ये अनेक ठिकाणी प्रोजेक्टचे काम चालू आहे. कामे वेळेवर झालेली नाहीत. टेंडरमध्ये दिलेल्या काळात काम झालेले नाही. मुदतवाढ देण्यात आलेली आहे. मुदतवाढ देताना नगरसेवकांना कधी माहित पडत नाही ३ वर्षात काम पूर्ण झाले नाही. मुदतवाढ कोण देतो. अधिकारी देतात. ते म्हणतात आमचा राईट आहे. सदस्यांना कसे माहिती पडणार मुदतवाढ का दिली, कसे माहित पडणार. ज्यात एक्सलेशन आहे, सिमेंट प्राईज वाढवून देतात. मुदतवाढ दिली गेलीतरी सिमेंटचे रेट काय वाढलेतरी मुदतवाढ दिली गेली नाही पाहीजे. ठराविक मुदतीत कॉन्ट्रॅक्टर काम करत नसेल तर मुदत वाढ देताना क्लिअर झाले पाहीजे. मुदतवाढ देताना सभागृहाला सुध्दा याची माहिती मिळाली पाहिजे हे माझे म्हणणे आहे. **Hundreds of crores of rupees are involved**. सिस्टीम वर्कआऊट करा. वेबसाईटवर द्या, आम्हाला माहिती पडले पाहीजे. असे करायला पाहीजे. जेएनएनयूआरएमच्या प्रोजेक्टमध्ये जो काही प्रोजेक्ट सबमिट केला. त्याच्या अनुषंगाने आपले ५०%, स्टेट गव्हर्नमेंटचे २०%. सगळ्यांना वाढवून देतोय. यात स्टेट व सेंट्रल गव्हर्नमेंट काही देत नाही. गेल्या बजेटमध्ये महापालिकेचे ३०% कॉनट्रीब्युशन असताना प्रत्येक प्रोजेक्टमध्ये एक्सपांशन म्हणून प्राईज वाढवून दिलेली आहे. म्हणून शहरात अनेक प्रोजेक्टमध्ये ३०% निधी ५० ते ६०% पर्यंत दिलेला आहे. त्यामुळे मुदतवाढ द्यायला नाही पाहीजे. हे क्लिअर केले पाहीजे. मुंबई-पुणे रस्ता, चिंचवड मध्ये ३६ कोटी ६० लाखाच्या मूळ निविदेत सुधारीत खर्च एकूण ७० कोटींपर्यंत झालेला आहे. हे काही समजून आम्ही टेंडर काढत नाही. टेंडरच्या मूळ रकमेपेक्षा डबल रक्कम गेलेली आहे. ३६ कोटींच्या टेंडरची रक्कम ७० कोटींवर गेली. हे करायचा राईट तुम्हाला कोणी दिला? ३६ कोटींचे समजू शकतो २/३ कोटी वाढवले तर ठिक आहे. प्रोजेक्टला इतका जास्त खर्च कसा काय देऊ शकतो? सगळे टेंडर मागवले पाहीजेत. या टेंडरची वाढीव रक्कम बघितली तर ज्यांनी उपसूचना दिली त्यांना सुद्धा हे माहिती नाही. ज्याने २०

लाखाची उपसूचना दिली, त्याला विचारले. त्याखाली ३१ कोटी, १५ कोटींची वाढीव उपसूचना दिली होती. हे उपसूचनेच्या शिटमध्ये कसे काय आले? ते स्वतः म्हणाले मला माहीत नाही. २० लाखांची उपसूचना दिली होती. याचा अर्थ २० लाखांची उपसूचना मिटींगमध्ये मंजूर झाल्यानंतर कॉम्प्यूटर प्रिंटमध्ये वाढीव टाकून दुसरा ठराव टाईप झालेला आहे. २/४ माणसांनी संगनमत करुन ५० कोटींची वाढीव उपसूचना दिली. अशा प्रकारे ३६ कोटींची टेंडरची रक्कम ७० कोटींवर गेलेली आहे. यावर तुम्ही म्हणणार, हा विषय माझ्याकाळात झालेला नाही. आज जी.बी.त जे विषय आहेत, तिथे तुम्ही कमिशनर म्हणून आहात. असे सांगू नका माझ्या काळातला विषय नाही. तुम्ही इनव्हीस्टीगेट करा. तुम्ही एकवेळ टाईप केले असले तरी प्लॅनची मोजणी केलेली नाही अशा पद्धतीने कामे केलेली आहेत. उत्तर दिल्यानंतर माहिती पडते, ३६ कोटींचे ७० कोटी केले त्यावेळी कोण होते, याकडे लक्ष द्या. तुम्ही कोणते स्टेटमेंट दिले आहे. बीआरटी रोडचे १४ १/२ कोटींचे टेंडर दिले. त्याचा डीएसआर तीन वर्षे एकसारखा ३०% कमी होता. पूर्ण १० कोटी असायला पाहीजे होते. प्रत्येक किलोमीटरला ४ १/२ कोटी रुपये याप्रमाणे ८-९-१० मध्ये टेंडर आले होते. म्हणजे बीआरटीच्या सर्व टेंडरमध्ये रिंग झालेली आहे. आजवाणी इन्फ्रास्ट्रक्चर यांना त्या काळात टेंडर गेले होते. प्राईज कमी झालेली नाही. स्पेसीफीकेशनमध्ये फरक नाही. हेच आजवाणी इन्फ्रास्ट्रक्चर आता १४ १/२ कोटी करतात. मटेरिअल कॉस्टमध्ये कमी पडतो का? २० ते ३० टक्के मटेरिअल प्रायव्हेटकडून घेतो. बीआरटी प्रोजेक्टमध्ये खूप भ्रष्टाचार झालेला आहे. यात कन्सल्टंटपासून सर्व जबाबदार आहेत. किती कन्सल्टंट अपॉईंट करणार? आपले एक्झिक्युटीव्ह इंजिनिअर आहेत, डेप्युटी इंजिनिअर आहेत. ३०/३० वर्षांचा कामाचा अनुभव आहे. ते कोटेशन सुद्धा तयार करु शकत नाहीत. स्पेसिफिकेशन तयार करु शकत नाहीत. करोडो रुपये देऊन कन्सल्टंट रेडिमेड पुस्तक पाठवतात. काय मटेरिअल वापरायचे हे पब्लिश करुन ते पुस्तक पाठवतात. आपले इंजिनिअर काय काम करतात. क्वालिटी तपासण्यासाठी एच.जी.एस.चे एक्झिक्युशन करतात. ३ इंजिनिअर असूनही कन्सल्टंट कशाला पाहीजे. एक जर्मनीचा कन्सल्टंट अपॉईंट केला होता. कन्सल्टंट काय करतो? तो कधीही योग्य रेट देणार नाही. प्रॉफीट शून्य टक्के होतो. प्रोजेक्टमधून प्रॉफीट कसा मिळवायचा, त्यात जास्तीत जास्त खर्च कसा दाखवायचा हाच प्रयत्न प्रत्येक माणूस करत असतो. प्रॉफीट प्रायसिंग त्याचे उदाहरण देतो. मॅकडोनल्डच्या दोन रस्त्यांचे काम करत असताना २ फूट गॅप वाढली. लोकांनी काय केले. २ फूट हाईटपर्यंत डांबरीकरण केले. ते करायची गरज

होती का? या प्रोजेक्टमध्ये स्वतःच्या प्रॉफीटसाठी प्रोजेक्टचे काम जास्त करणार, हेच सर्व प्रोजेक्टमध्ये कन्सल्टंट लोकांनी केलेले आहे, असा माझा दावा आहे. बोंब मारुन काय होणार? पेपरमध्ये छापून येण्यासाठी करत नाही. आम्हाला लोकांनी इथे निवडून पाठवले आहे. **I have to point out working corruption in the working there.** तुमच्यासमोर विषय मांडला आहे. एकाच पार्टीला आत्ता २० कि.मी. साठी १४ १/२ कोटी दिलेले आहेत. पार्टीला जास्त पैसे दिलेले आहेत. कोणी सांगितले, आत्ता त्यांच्याकडे काम नाही म्हणून ३० टक्के काम केले. **This is a very serious matter** म्हणून सुरुवातीला तुम्ही †क्शन घेणार नसाल तर मा.मुख्यमंत्र्यांकडे पत्र पाठवणार, मा.उपमुख्यमंत्र्यांना आमच्या वतीने पत्र पाठवून यात ३२ कोटींचा भ्रष्टाचार झाला म्हणून एनक्वायरी चालू करणार. अनेक प्रोजेक्टमध्ये कोणता रिमार्क लिहिला, सांगितले काम पूर्ण झाले नाही. पी.बी. इन्फ्रास्ट्रक्टर लिमिटेड यांना विचारायला पाहीजे. यात ५०% काम पूर्ण असेलतर काय काम, कोणते काम झालेले आहे त्याला सांगावे लागेल. डिलरला ६० कोटी पेमेण्ट केले. पाकीटासाठी टेंडर ओपन करतो का. टेंडर कोणी काढले, आमच्यासमोर डॉकेट ठेवताना असे ठेवता का. जागा ताब्यात नाही. कुठलेही म्हणावे केलेले आहे का? कुठलेही नाही. लॅण्ड †क्विझिशन पेंडींग आहे. जी.बी.त केलेले नाही. जागा ताब्यात नाही मग टेंडर काढून पार्टीला एक्स्पान्शन देणे योग्य आहे का? कोणी ६० कोटी दिले. जमिनीचे द्यायचे माहित आहे. ५०% काम झाले. बाकी कामाला काय करणार? वाढवून देणार का? शंका-कुशंका वाढतात. यात आम्हाला कॉन्फरन्स मिटींग घ्यायला पाहीजे. अधिकारी व नगरसेवक ही गाडीची दोन चाके आहेत. अधिका-याला पॉवर्स दिल्या असल्यातरी आम्ही सुद्धा निवडून आलो आहोत. अनेक अधिकारी समजतात, मी संस्थानिक आहे. सर्व महापालिका माझी आहे. पुणे महापालिकेत टीडीआर सबकमिटीत विषय मान्यतेला जातात.ज्यांची कामे चालतात, तिथे फक्त ऑफीसर कमिटीत आहेत. आमचे पक्षनेते,महापौर आमचे,पक्षाध्यक्ष, विरोधी पक्षाध्यक्ष कोणी का घेत नाहीत? या टीडीआर कमिटीमध्ये एच.ओ.डी. यांना सांगितले, आम्हाला तरी दाखवा. तुमचा राईट नाही, आमचा राईट आहे. कमिशनरांचा राईट आहे. त्यांच्याकडे ३ अमेंडमेंट होत्या. सबकमिटीत आलेले नाही, नियम एक्सपाण्ड केलेला नाही. पुणे महापालिकेत शहर सुधारणा कमिटीत अप्रूव्हलसाठी ठेवतात, इथे ठेवत नाही. अधिकारी समजतात आम्ही संस्थानिक आहोत. ५०% कामे पूर्ण झालेली आहेत. बाकी यापुढे एक्सपान्शन देणार नाही. एस्टिमेट सील करताना कॉस्ट वाढते म्हणून पैसे देणार नाही. महापालिकेत अकाऊंटॅबिलिटी नावाची काही गोष्ट नाही.

मोठमोठ्या प्रोजेक्टसला मुदतवाढ देताय, त्यावेळी माहिती मिळाली पाहीजे काय घडते? हे तुम्हाला सांगायची गरज नाही. याच झालेल्या भ्रष्टाचाराला जे रिस्पाँसिबल आहेत त्यांनी गरज नसतानाही हे टेंडर वाढवले आहेत. यात चौकशी व्हायला पाहीजे. तुमच्या काळातले नाही म्हणून तुम्ही सांगून हात झटकू शकत नाही. त्याची चौकशी करायला पाहीजे. जो कोणी दोषी अधिकारी असेल त्याच्यावर कारवाई व्हायला पाहीजे. २०१४ पर्यंत पूर्ण झालेले नाही. जेएनएनयूआरएमचे प्रोजेक्ट चालू करताना २००७ पासून २०१२ पर्यंत पूर्ण होणार असे सांगितले होते. अनेक प्रोजेक्टची माहिती आमच्यापर्यंत सांगितलेली नाही. जागा ताब्यात नाही. टेंडर कसे काढतो. आपण पैसे घेणार. वर्कऑर्डरचा फॉलोअप का करत नाही. टेंडर काढले त्याच्यावर कारवाई करा.

**झोपडपट्टी पुनर्वसन** – डिमॉलिश व्हायला पाहीजे. सभासद प्रश्न विचारतात. त्यात हाईड अण्ड सीक केलेतर फार मोठा गुन्हा होतो. ऑफीसरवर कारवाई व्हायला पाहीजे. एक आठवड्यात सांगा काय कारवाई केली. बीआरटीचा फॉर्मेट काय आहे? झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पात मी १९८६ मध्ये इथे निवडून आलो, त्यावेळी नेत्यांनी सांगितले,१०० टक्के पुनर्वसन करु. १९९५ साली १० वर्षानंतर बघितले. हजार दोन हजार लोकांचे पुनर्वसन झाले होते. पुढील १० वर्षात कोणी झोपडपट्टी पुनर्वसन करु असे सांगितले.नंतर जेएनएनयूआरएमच्या प्रोजेक्टमध्ये पुनर्वसन करायची ऑर्डर दिली. १८,००० घरांची ऑर्डर दिली. आत्ता त्याचा चार्ट बघितला तर ५० टक्के सुद्धा घरे बांधून झाली आहेत का नाही. सेक्टर २२ची कंम्प्लिशन डेट ३१ मार्च २०१२ होती. ६९६० घरे कंम्प्लिट करायला पाहीजे होती. १२८० घरे बांधली. सेक्टर २२ निगडीचे काम थांबले आहे. निगडी प्रोजेक्टमधील १८४० घरे बांधताना मा.सिमा सावळे यांनी सांगितले होते,सेक्टर २२ रेड झोनमध्ये येते. रेडझोनमध्ये आपण टाईमपास कामे करु शकत नाही. जिथे महापालिकेचा प्रोजेक्ट राबविला आहे, तिथे रेड झोन असून सुद्धा प्रोजेक्ट राबविला आहे. पहिले दिलीप बंड यांना पॉईंट आऊट करा. आम्ही बजेट मांडायचे काम करतो. कोर्टाने स्टे दिला. ७ बिलांमध्ये कोर्टाने स्टे दिला. प्रोजेक्ट कंम्प्लिशन डेट काय आहे? प्रोजेक्ट ३१/३/१२मध्ये पूर्ण व्हायला पाहीजे होता. अधिकारी सांगतात,कोर्टाचा स्टे आहे. ठरवून दिलेल्या तारखेमध्ये प्रोजेक्ट का कंम्प्लिट केला नाही. इथे आलेले सर्व लोक इलेक्टेड लोक आहेत. प्रत्येकाला ज्ञान आहे. स्टे डेट प्रोजेक्ट कंम्प्लिट डेट झाल्यानंतर आलेली आहे. प्रोजेक्ट कंम्प्लिट का केला नाही. रेड झोन नंतर आला.

आत्ता महापालिकेत रेडझोनचा स्टे आला म्हणून प्रोजेक्ट कंम्प्लिट केला नाही. काय अकाऊंटॅबिलिटी आहे का? ३१ मार्च २०१२ला प्रोजेक्ट कंम्प्लिट केला नाही. आत्ता काय होणार?सिमेंट,वाळूचा रेट वाढला. टेंडरमध्ये सगळ्यांना किती देणार,परत प्रोजेक्टची कॉस्ट वाढणार. महापालिकेचा पैसा नाहक जास्त खर्च होतो. याचे उदाहरण आहे. उद्योननगर, मिलिंदनगर, अजंठानगर इथे काय झाले. काहीही झालेले नाही. तिथे रेड झोन नाही तरी प्रोजेक्ट कम्प्लिट झाला नाही. कोणताही प्रोजेक्ट वेळेवर होत नाही म्हणून पैसे वाचवतात. ते वाचवू शकतो. **This is a deal between contractor & officer**. तुम्ही कधी मुदतवाढ देता ते आम्हाला माहीती पडत नाही. चौकशी केली पाहीजे. यात काय होणार. लोक चूक करणार नाहीत. ईडब्ल्यूएसच्या प्रोजेक्टचे पवार साहेबांच्या हस्ते भूमिपूजन केले. १३,००० कुटूंबांना घर देणार असे सांगितले.विकर सेक्शनसाठी आज घराची किंमत ३.७५ लाख झाली आहे. घरे बांधून रेडी आहेत. पण प्राधिकरणाने कंप्लिशन दिलेले नाही. बाकी ५० टक्क्यांचे काय. एक दीड वर्षापूर्वी हाच प्रश्न विचारला होता. १३,००० लोक वाट बघत आहेत. बाकी ५० टक्के लोकांचे काय करणार. काय बोलणार. तुमच्यासमोर सगळे पुरावे आहेत. एक-एक प्रोजेक्टचे डील कसे होते याचा पुरावा तुमच्यासमोर आणला आहे. ट्रान्सफरन्सी पाहीजे. महापालिकेतील गोष्टींबद्दल कॉर्पोरेटरला माहीत नसते. कॉर्पोरेटर कुठे गुंजभर सुद्धा नसतो. कॉर्पोरेटरवर ब्लेम केले जाते. टक्केवारी सोडून मुदतवाढ व बाकी एस्कलेशनमध्ये पैसे कमवले जातात. इथे काही अधिकारी १ करोड कमवतात. काही अधिका-यांचे १ ते २ कोटींचे इन्कम आहे. तुम्ही करणार, काय-काय करणार असा प्रकार इथे आहे. मनपाचा प्रॉब्लेम आहे, काही सुधारत नाहीत, कितीही बोंब मारा. इथे चांगली माणसे नाहीत. कधीतरी मिटींग होत असल्यामुळे सगळे विषय आमच्यासमोर मांडले आहेत. तुम्हाला पटले तर करा. काही करु शकत नाही. जी उत्तरे दिलेली आहेत. शंभर पाने आहेत. खालच्या लेवलपासून वरच्या लेवलपर्यंत मिनिमम १०० कोटींचा भ्रष्टाचार झाला आहे हे कोणाला माहीत नाही. हे सत्य आहे. मी तुमच्याकडे बिल्डींग परमिशन द्या म्हणून येणार नाही. कॉन्ट्रॅक्टरला ऑर्डर द्या म्हणून येणार नाही. या गोष्टी तुमच्या लक्षात आणून द्यायच्या आहेत. मला माहिती आहे. मला कोणी साथ देणार नाही. साथ देण्यासारखे कोणी नाही. मी माझी ड्युटी केली आहे. यात अनेक गोष्टी आहेत. अधिकारी कसे असतात. स्टॉर्म वॉटर ड्रेनेज, अंडरग्राऊंड ड्रेनेज या स्किम जेएनएनयूआरएममधून घ्यायचे ठरले होते. ४५ कोटींचा प्रोजेक्ट दिला. एका प्रभागात १५ कोटींचा प्रोजेक्ट केला. बाकी दोन प्रभागांत का करायचा नाही. दिल्लीकडून आलेला पैसा पूर्ण पिंपरी

चिंचवडमध्ये खर्च करण्यासाठी आला आहे. काही ठराविक ठिकाणी खर्च करण्यासाठी नाही. अधिका-यांना विचारा, त्यांना उत्तर देऊ द्या. पैसे देतात म्हणजे चारही प्रभागांत इक्वली खर्च व्हायला पाहीजे. अधिका-यांनी काय उत्तर दिले आमदारांना सांगा. तुमचे लोक काय करतात, याविषयी लोक काम करतात. चारही प्रभागांत ही कामे करायचे ठरवले होते. काही अधिकारी सकाळी उठून नमस्कार करायला जातात. त्यांच्याच वॉर्डातली कामे करतात. क व ड प्रभागांत खर्च होतो तर अ प्रभागांत का होत नाही. मी ३० वर्षांपासून नगरसेवक असून काय उपयोग? ४५ कोटींची कामे तुकड्यांत केलेली होती, असे अधिकारी आम्हाला बोलेल काय? हा बॉंब मारणारच. पुन्हा असे घडतेय म्हणून मी बोलतोय. सगळे वॉर्ड, सगळ्या प्रभागांत ईक्वल डिस्ट्रीब्युशन नाही. हे यापुढे बंद करा. लेजिस्लेचर आहेत, ब्रिलियंट ऑफीसर आहेत. माझ्या प्रभागातील लोक विचारतात. यात अनेक मॅटर आहेत. जेवढा विषय काढणार, वेळ कमीच पडणार आहे. मुख्यतः तोंड बघूनच काम करायचे. ही स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न करा. हे कसे सुधारायला पाहीजे ते पहा. क्वालिटी पाहीजे. कॉर्पोरेशनला बंद करु शकत नाही. परंतू एस्कलेशन बंद करु शकतो. यात फरक आहे. कॉर्पोरेशनमध्येच १०% वाटप होतो. उरलेल्या २५% मध्ये काय काम करणार. इथे क्वालिटी मिळत नाही. त्यांच्याकडून पैसे काढून घेतल्यानंतर काय क्वालिटी देणार. यात फक्त अजवानीच नाही तर अनेक पदाधिकारी आहेत. हे मला अजूनही पटत नाही. ४ १/२ कोटींच्या टेंडरमध्ये किती भ्रष्टाचार असणार, का केला. हे सगळे शोधून काढा.

**मा.महापौर** – प्रश्नोत्तरांचा तास संपलेला आहे.

--------

**मा.तानाजी खाडे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक - २

दिनांक -०४/०५/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भः-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.प्रशा/१अ/कावि/२८/२०१३ दि.८/१/२०१३

२) मा.स्थायी समिती सभा दिनांक १५/०१/२०१३ ठराव क्र.२४२३ नुसार

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.२४० दि.२२/०३/२०१३

मनपा परिसरातील अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलनासाठी महापालिका क्षेत्रात एक विशेष पोलिस ठाणे प्रत्येक अ, ब, क ड प्रभागासाठी चार पोलिस चौक्या याकरिता पदे निर्मिती करणेकामी प्रस्तावात नमुद परिशिष्ट अ प्रमाणे ७८ पदे,परिशिष्ट ब प्रमाणे २८ पदे अशी एकूण १०६ पदे राज्य शासनाच्या आस्थापनेवर निर्माण केली जाणार असून त्यावरील खर्चाची प्रतिपुर्ती आगावू **(Advance Payment)** च्या स्वरूपात मनपाने करावयाची असून ही बाब विचारात घेता अ) प्रस्तावात नमुद शासन निर्णयात नमुद केलेल्या आणि मनपासाठी अनुज्ञेय असलेल्या पोलिस अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्ते, निवृत्तीवेतन अंशदान होणा-या खर्चास व सदर खर्चाची रक्कम आगावू तिमाही हत्याच्या स्वरूपात राज्य शासनाकडे / संबंधीत पोलिस आयुक्तालयाकडे भरण्यास ब) सदर अधिकारी व कर्मचारी यांना पुरविण्यात येणा-या वाहन, कार्यालय व इतर सुविधांवर येणा-या खर्चास व तो शासनाकडे/संबंधीत विभागाच्या पोलिस आयुक्तांकडे आगावू स्वरूपात भरण्यास क)सदर कक्षाच्या निर्मितीमुळे होणा-या खर्चाची पुर्तता करण्यासाठी मनपाच्या अंदाजपत्रकात नवीन लेखाशिर्ष निर्माण करून त्याखाली आवश्यक तरतूद प्रतिवर्षी करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.रामदास बोकड** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.आप्पा बारणे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खरेतर मनपा परिसरातील अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलनासाठी महापालिका क्षेत्रात एक विशेष पोलिस ठाणे प्रत्येक अ, ब, क, ड प्रभागासाठी चार पोलिस चौक्या याकरिता पदे निर्मितीसंदर्भात हा विषय आहे. मुळात पोलिस चौक्या करणे, पदे निर्माण करणे, त्यांचा पगार आपण करणे हा विषय मुळात चुकीचा आहे. राज्यशासनाच्या वतीने २ मार्च २००९ मध्ये कळविण्यात आले होते. राज्य शासनाने सांगितले होते, स्थानिक स्वराज्य संस्थेत अनधिकृत बांधकामे/अतिक्रमण निर्मुलनासाठी समकक्ष निर्माण करणे, ही जबाबदारी प्रशासनाची आहे. अतिक्रमणासाठी वेगळा कक्ष, सहाय्यक आयुक्त दर्जाचे, उपआयुक्त दर्जाचे अधिकारी असावा यासाठी पत्र दिले होते. त्यावर शासनाचेवतीने लिहीलेले होते, अनधिकृत बांधकामे/अतिक्रमण निर्मुलनासाठी नेमलेले पथक उपआयुक्त दर्जाच्या अधिका-याच्या नेतृत्वाखाली कार्यरत राहील. तशा प्रकारचे पथक निर्माण करण्यास २००९ मध्ये सांगितले होते. २००९ पासून

आजतागायत महापालिकेचे वतीने कोणत्याही प्रकारचा स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यासंदर्भात कारवाई करण्यात आली पाहिजे होती. आज जो विषय होतो आहे, याच्या अनुषंगाने सभागृहात काही गोष्टींचा खुलासा केला पाहिजे. आपण १०६ पदे निर्माण करताय. ही १०६ पदे राज्यशासनाच्या आस्थापनेवर निर्माण केली जाणार असून त्यांचा पगार कोण देणार आहेत? त्याचा भूर्दंड महापालिकेवर पडत असेल तर आज महापालिकेची आर्थिक परिस्थिती अतिशय उत्तम असेल देखील, तरी भविष्यात हीच परिस्थिती राहील का? सांगता येत नाही. एखाद्याने चांगला विचार करताना भविष्याचा विचार करुन निर्णय केला पाहिजे. आज कदाचित महानगरपालिकेतील शंभर टक्के ऐवजी ९८ टक्के अनधिकृत बांधकामे थांबलेली आहेत. तुमच्यासारखा सक्षम अधिकारी आले आहेत. राज्यशासनाच्या,न्यायालयाच्या आदेशानुसार यापुढे अनधिकृत बांधकामे १०० टक्के होणार नाहीत. हा विषय मंजूर केलातर अशा प्रकारची सेवा निर्माण करुन महापालिकेच्या तिजोरीवर बोजा निर्माण करायचे काम प्रामुख्याने करतोय. या दृष्टीने विचार केला पाहीजे. आत्ता इथूनपुढे अशा निर्मूलन व्यवस्थेची आवश्यकता मला तरी वाटत नाही. कारण आज जवळपास गेले ६ महिन्यांत पाहिलेतर सहा महिन्यांत मनपा क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे याव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचा विषय झालेला नाही. म्हणून अशाप्रकारची पदे निर्माण करुन, पोलिस चौक्या निर्माण करुन त्याचा खर्च म.न.पा.ने करणे अतिशय चुकीचा विषय होतो आहे. या विषयाला आमचा विरोध आहे. अशाप्रकारे पोलिस ठाणे निर्माण करणे,ही शासनाची जबाबदारी आहे. आपली जबाबदारी नाही. मा.आयुक्तांनी यासंदर्भात सविस्तर खुलासा करावा. ही पदे निर्माण करुन महापालिकेवर आर्थिक बोजा किती पडेल याचा महापालिकेचे आयुक्त यांनी सविस्तर खुलासा सभागृहाला सांगावा.

**मा.शमिम पठाण** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आपण याठिकाणी विषय आणला. गर्व्हन्मेंटकडून आपल्याला सर्क्युलर आले आहे. २ मार्च २००९ च्या सर्क्युलरमध्ये असे आहे, अनधिकृत बांधकामे व अतिक्रमण निर्मुलनासाठी स्वतंत्र सक्षम व समर्पित अशी एक स्वतंत्र यंत्रणा जॉईंट कमिशनर यांच्या अधिपत्याखाली किंवा त्यांना प्रमुख ठेवून उभी करावी. अशा प्रकारची पदे निर्माण करण्यासाठी आपण यापूर्वी सावंत साहेबांची जॉईंट कमिशनर म्हणून नेमणूक केली होती. हे जॉईंट कमिशनर यांचे काम होते. या परिपत्रकाप्रमाणे त्यांची नियुक्ती केली होती. मला वाटत नाही, त्यांनी एक दिवस, एक तास, एक मिनिट सुध्दा ते काम केले

आहे ज्या कामासाठी त्यांची नेमणूक केली होती. हे काम न करताच आयुक्तांचीच कामे पार पाडलेली आहेत. कोणतीही स्वतंत्र व समर्पित यंत्रणा त्यांनी तयार केलेली नाही. सागांयची आवश्यकता आहे का? ज्या परिपत्रकान्वये विषय आणला आहे तो नंतरचा भाग आहे. स्वतंत्र अधिका-याची नेमणूक करुन स्वतंत्र विभाग तयार करणे, असे असताना खरेतर पोलिसांच्या विषयावर पण येणार होतो. स्वतंत्र कक्ष निर्माण करत असताना सुद्धा काहीही नसताना आपण एखाद्यावर संपूर्णपणे जबाबदारी टाकून एखाद्याला बेजबाबदार ठरवणे हे कितपत योग्य वाटते. याचा आपण विचार करावा. त्याचा जास्त ऊहापोह करणार नाही. तुम्हाला भेटून बोलले होते, याचा संपूर्ण साकल्याने विचार करावा. याठिकाणी आत्ताच सांगितल्याप्रमाणे आपण निर्णय घ्यावयाचा आहे. खरोखरच आपल्या कामाचे सर्वत्र कौतुक होते आहे. आम्ही सुद्धा कौतुक करतोय. आपण अभिनंदनास पात्र आहात. आपल्या या निर्णयामुळे पिंपरी चिंचवड परिसरातील बहुतेक बांधकामे थांबली आहे. यापुढे ती होणार नाही एवढा वचक आपण निर्माण केला आहे. याबददल कोणाचे दुमत नाही. असे असताना आपण एवढी १०६ पदे भरल्यावर त्यांचे वेतन व निवृत्तीवेतन सुध्दा आम्ही त्यांना द्यायचे आहे. आप्पा आपण निवृत्ती वेतनाविषयी बोलला नाहीत. पोलिसांना किती कालावधीसाठी ठेवणार आहोत. पोलिस ठाणे निर्माण करणार आहोत. आपण जेव्हा मागताय, मिळतेय, पडलेल्या ढाब्यांना पत्रे नाहीत, त्या ठाण्यांसाठी, त्या १०६ पदांसाठी आपण कोटयावधी रुपये खर्च करावे असे आम्हाला वाटत नाही. त्यामुळे तिमाही हप्त्याच्या स्वरुपात राज्य शासनाकडे १०६ लोकांचा पगार आपण त्यांना सर्व भत्त्यांसह ३ महिने आधीच दयायचा आहे. त्याची पुढील सर्व तरतूद करायची आहे. भविष्यनिर्वाह निधी दयावयाचा आहे त्याबाबत पुन्हा एकदा विचार करावा. त्याची आत्तातरी आवश्यकता नाही. आवश्यकता असेल तर एखादे ठाणे मुख्य कार्यालयात असावे. आधी ही पदे मागवून घ्यावीत. दुसरे असे, यापूर्वी सांगितले होते त्याप्रमाणे याची आवश्यकता भासणार नाही. अनधिकृत बांधकामांवर तुमचे निरीक्षक नेमलेतर पोलिसांना बोलवायची कारवाई करायची वेळ येणार नाही. हा विषय मंजूर करावा असे वाटत नाही. तुमच्या कामाबददल तुमच्या कार्यपध्दतीबददल, चांगली कार्यपद्धती आहे, त्याबद्दल दुमत नाही. मी एका पेपरमध्ये वाचले. एका ठिकाणी भाषणात म्हणालात, हे लोकशाहीला घातक आहे. आपण किती अतिक्रमणे पाडली. पूर्वी हा विषय झालेला आहे. परंतू तुम्ही टक्केवारी दिली. लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी आपल्यापुढे असतात. सन्मा.सभागृहापुढे आपण बसलेले असतात. जो निर्णय घेता तो लोकांच्या हिताच्या दृष्टीने असला पाहीजे. तुमचे आणि आमचे काम

एकच आहे. दोघांनी मिळून ते करायचे आहे. परंतू आपण कोणत्याही राजकारणात पडू नये. व आपण राजकारणासारखे वागू नये. असा मी वडिलकीच्या नात्याने आपल्याला सल्ला दिला. बेकायदा बांधकामांबाबत तुम्ही ज्यावेळी मोहिम सुरु केली. जे लोक रस्त्यावर उतरले, विरोधकांनी मोठमोठे मोर्चे काढले. तेच लोक तुमच्या कथित बदलीच्या विरोधात सुद्धा बोलतात. म्हणजे बाजारात तुरी.... . म्हणून महापालिकेत अशा प्रकारचे निश्चितच राजकारण असो, आपला बळी घ्यायला बघत असतात. म्हणून करतोय या कामाचे राजकारण होणार नाही, त्याचा लोक बागुलबुवा करणार नाहीत एवढे सांभाळून घ्यावे. मी आत्ता सांगितल्याप्रमाणे तुम्ही महाराष्ट्र अधिनियमाप्रमाणे आकृतीबंध होता, त्यात तुम्हाला ४५० जे.ई. लागत आहेत. आत्ता फक्त १५० वर भागवतोय. लोक तिथे काम करत आहेत. याची ठोस जाणिव आपण ठेवावी. कामात कसुर झालीतर त्यांना समजून घ्यावे. आयुक्त साहेब तेवढे तुम्ही जाणते आहात. तुम्हाला कायद्याचे संपूर्ण, खूप ज्ञान आहे. त्याचा उपयोग मानवतेच्या दृष्टीकोनातून करावा. असे आवाहन करते. हा विषय तहकूब करावा अशी माझी विनंती आहे.

**मा.सुलभा उबाळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, हा विषय इथे कसा काय आला, याबाबत मनात प्रश्न उपस्थित झाला आहे. यापूर्वी अनेक पोलिस ठाण्यांसाठी महापालिकेच्या इमारती दिलेल्या आहेत. भाडे भरले जाते का, टॅक्स भरला जातो की नाही, थकबाकी आहे याची सुध्दा आपल्याला कल्पना आहे. असे असताना त्यांचे कर्मचारी आपण इथे पोसायचे हे मोठे प्रश्नचिन्ह आहे. खरेतर एलबीटीमधून आपल्या कर्मचा-यांचा पगार कसा करायचा हा भविष्यात प्रश्न येणार आहे. असे असताना वाढीव कर्मचारी घेताय. कर्मचारी कोणाला म्हणायचे. जे कर्मचारी ३० दिवस काम करतात. हे ३० दिवस काम करणार आहेत का? बरेच पोलिस पत्ते खेळत असतात, रिकामे बसलेले असतात. रोज काही बांधकाम पाडायला जात नाहीत. बाहेर बसून टाईमपास करत असतात. रिकाम्या वेळेत एसीपी, डीएसपी ऑफीसला जातात. याठिकाणी राष्ट्रवादीची सत्ता आहे. गृहखाते राष्ट्रवादीकडे आहे. आपली श्रीमंती तिथे वाटली जाते का अशी शंका निर्माण झाली आहे. अनधिकृत बांधकामाचा बागुलबुवा झाला आहे. आयुक्त साहेब सक्षमरित्या जबाबदारी पार पाडत आहेत. त्यांची पोलीस कर्मचा-यांचा पगार देऊन करायची असल्याचा असा दाट संशय इथे येतो आहे. खरेतर निवृत्तीवेतनाचा अत्यंत घातक विषय इथे आला आहे. निश्तितपणे विषय मंजूर करण्यासाठी इथे आणला आहे. हा विषय

तहकूब न ठेवता फेटाळावा असे वाटते. पोलिस कर्मचारी उभा राहीला असताना अधिका-यांच्या व पदाधिका-यांच्या अंगावर लोक धावून येत असले तरी ते बघ्याची भूमिका घेतात. त्यांचा किती उपयोग होतो आहे, ही वस्तुस्थिती आहे. हा खर्च अवाढव्य होतो आहे. आपण पोलिसात असतात तर अधिक पोलिस आले असते. अतिशय चुकीचा विषय आहे. मनपाच्या पैशांचा दुरुपयोग होत असेल तर आपल्याला विनंती आहे, हा विषय दप्तरी दाखल करावा. आपले खालच्या कर्मचा-यापासून जे.ई. सुद्धा डोळ्यात तेल घालून काम करत आहेत. पूर्वी हे काम केले असते तर आज ही वाईट वेळ आली नसती. अधिका-यांना काम करायला भाग पडले आहे. एवढे पोलिस पोसायचे हा मोठा प्रश्न चिन्हाचा भाग आहे. तुम्ही कायमच इथे नाहीत, जास्तीत जास्त ३ वर्षे. यातून भ्रष्टाचार वाढणार का कमी होणार आहे. बाईंनी वडीलकीचा सल्ला दिला आहे. ज्येष्ठ म्हणून समजावुन देतात. विरोधी पक्ष निश्चितच लोकांसाठी रस्त्यावर आले आहे. गव्हर्नमेंट बदला म्हणतोय. बदलीचा विषय तुमच्याकडूनचे आलेला होता. पेपरमध्ये वाचतोय. बदली कधी झाली, रद्द कधी केली. आम्हाला माहित नाही. सत्ताधारी सभागृहात घूमजाव करताना दिसताएत. अतिशय चुकीचा विषय आहे. मा.आयुक्त साहेब हा विषय दप्तरी दाखल करावा.

**मा.दत्ता साने** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आज मला याठिकाणी दोन प्रश्न विचारावयाचे आहेत. हा विषय आपल्या लक्षात येईल. आत्तापर्यंत आपण अतिक्रमणे काढताना पोलीस बंदोबस्तासाठी केलेला सर्व खर्च व इथून पुढे आता पोलीस बंदोबस्ताचा व जी पदे भरणार आहोत त्याचा एक्झॅट खर्च किती येणार आहे हे सभागृहाला सांगितलेतर खरा विषय डोळ्यासमोर येईल. हे डॉकेट नक्की काय आहे. आयुक्तांनी मांडले आहे का राज्यशासनाने आणले आहे. राज्य शासनाने २००९ मध्ये विषय आणला असलातरी हा विषय आत्ता घेण्याची गरज काय आहे? हा विषय २००९ मध्ये का घेतला नाही? आता हा विषय घेण्याचे कारण काय आहे. या प्रश्नाचे उत्तर दयावे. ३१ मार्च २०१२ नंतरची अतिक्रमणे किती होती, किती काढलेली आहेत. दररोज राज्यशासनाचे पोलीस किती आणले होते. पी.आय.पासून पोलिस कॉन्स्टेबलपासून एका पदाचा खर्च किती आहे. पी.आय.चा रोजचा भत्ता वेगळा असेल, पोलिस कर्मचा-याचा भत्ता वेगळा असेल. भत्ते कसे असतील याचे डिटेल्स् सभागृहापुढे मांडावेत.

**मा.अजित गव्हाणे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, हा जो विषय आहे अतिक्रमण कारवाईसाठी नवीन पोलिसांची गरज आहे. याअनुषंगाने विषय आणला आहे. खरेतर मागील काळात पोलीस नियुक्त्या व्हाव्यात अशाप्रकारचा आदेश होता. अतिक्रमणासाठी सेपरेट डिपार्टमेंट असावे अशा प्रकारचा सुद्धा आदेश होता. त्यांच्यावर एक जॉईंट कमिशनर नेमला होता. त्यानंतर कोणत्याही प्रकारची कारवाई झालेली नाही. हे सगळ्यात मोठे आव्हान आपल्यापुढे आहे. अनधिकृत बांधकामे होऊ नयेत म्हणून प्रयत्न करताय. यात सगळ्यात मोठी अडचण आहे. यामध्ये काम करणारे जे.ई., डेप्युटी इंजिनिअर, एक्झिक्युटीव्ह इंजिनिअर यांना अडचण येते. प्रत्यक्ष जागेवर जाऊन कारवाई करावी लागते. नंतर त्याच लोकांत जाऊन डेव्हलपमेंटची, वेगवेगळ्या स्वरुपाची कामे करावी लागतात. या निमित्ताने आपल्याला विनंती आहे, जसा पोलिसांचा विषय सेपरेट आणला, तसाच इंजिनिअर सुद्धा या कामासाठी सेपरेट नेमावेत. पूर्ण पिंपरी चिंचवड शहरासाठी काम करतील असे डेप्युटी, जे.ई. असतील त्यांना कोणतेही इतर जोखमीचे काम देऊ नये. निश्चितपणे भविष्यात अनधिकृत बांधकामे होणार नाहीत. सगळ्यात महत्वाचे काम हेच की, नव्याने बांधलेल्या बांधकामांचे प्लिंथ काढून काम थांबवावे. कुठेजरी गेलोतरी कोणी कारवाई केली असे होता कामा नये. स्वतंत्र यंत्रणा नेमलीतर त्याच माध्यमातून निश्चितपणे अशा प्रकारचे काम होईल. नागरीकांचे नाहक नुकसान होणार नाही. इंजिनिअर यांना सुद्धा साईटवर सुरक्षा व्यवस्था नाही. कोणताही जे.ई., डेप्युटी, एक्झिक्युटीव्ह जेव्हा प्रत्यक्ष साईटवर अतिक्रमणाच्या कारवाईच्या वेळी काम करतो, त्याच्या जिवाला फार मोठा धोका असतो. त्या अधिका-यांना सर्व कामे करावे लागतात. पोलिसांचा विषय आणला तसा सेपरेट टिमचा सुद्धा विषय आणायला पाहीजे होता. अशी प्रकारची अपेक्षा आहे. मा.दत्ता साने यांनी जो खुलासा मागीतला तो दिलातर निश्चितपणे भविष्यकाळात चांगल्या प्रकारची कामे करता येतील. विरोधी पक्ष, सत्ताधारी पक्ष असूनही मानसिकता होते. भविष्यकाळात अनधिकृत कामे होऊ नयेत त्यासाठी पाऊले उचलावी लागतील. त्यासाठी सर्वजण तयार आहेत. पोलिसांचा खर्च अतिशय जास्त वाटतो. कमीत कमी खर्च होईल हे पहावे. अधिका-यांना सुद्धा दिवसभर पोलिस स्टेशनमध्ये जाऊन बसावे लागते. प्रत्यक्ष काम करायला त्याला वेळ मिळत नाही. त्यानिमित्ताने महत्वाचा विषय सांगायचा आहे. बदल्या केल्यात. माझ्या प्रभागात एक्झिक्युटीव्ह, डेप्युटी व जे.ई. सगळेच बदलले. डेप्युटी अजून आलेच नाहीत. एक्झिक्युटीव्ह एकटेच आहेत.

कोणत्याही प्रकारचे काम झालेले नाही. यात लक्ष घालावे. सर्वांना अडचणी आहेत. काम लवकर सुरु करण्याच्या दृष्टीने नियोजनबद्ध काम करावे.

**मा.आर.एस.कुमार** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, इंजिनिअरला कामे देऊ नका.

**मा.भाऊसाहेब भोईर** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्वांचीच सविस्तर चर्चा झालेली आहे. परंतू अनधिकृत बांधकामासंदर्भात जे वादळ निर्माण झाले. नंतर न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे झालेली कारवाई या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने नंतर अध्यादेश काढून मार्च २०१२ नंतरच्या बांधकामांवरील कारवाई केली या सगळ्याचा पूर्ण खेद वाटतो. एक सक्षम यंत्रणा असतीतर किमान झालेल्या नुकसानीपासून वाचू शकतो. यंत्रणा असली तरी जे दुःख सोसावे लागते. त्याला राजकीय परिस्थिती, सामाजिक परिस्थिती सुद्धा जबाबदार आहे. २००९ साली शासनाने पत्र पाठवले होते, जी.आर. काढला होता. २००९ साली तो महापालिकेत उपलब्ध झाला होता. यात, स्थानिक स्वराज्य संस्थांनी केलेल्या उपाययोजना पुरेशा प्रमाणात नसल्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांची समर्पित व सक्षम यंत्रणा निर्माण करण्याबाबत २००९ साली कळवले होते. त्याठिकाणी सांगितले होते, मुख्यस्तरावरील अनधिकृत बांधकामे/अतिक्रमण निर्मुलन पथक यांचे नियंत्रण उपआयुक्त दर्जाच्या अधिका-याच्या अधिकाराखाली राहील. या पथकांना आवश्यक कर्मचारी व यंत्रसामुग्री उपलब्ध करुन देण्यात यावी. २००९ साली उपलब्ध असेल त्याप्रमाणे आयुक्तांनी उपाययोजना केल्या नाहीत. संपूर्ण निविदा प्रक्रिया पार पाडली. या संपूर्ण कालखंडात अनेक अनधिकृत बांधकामे सुरु झाली. नंतर पार पाडायची मोहीम हाती घेतली. जी.आर. आल्यानंतर त्याची अंमलबजावणी होते. प्रशासनाला अशा प्रकारचा जी.आर. २ मार्च २००९ मध्ये उपलब्ध झाल्यानंतर सुद्धा सक्षम यंत्रणा तयार केलेली नाही. सर्वांना मानसिक त्रास सहन करावा लागतो आहे. कायद्याच्या माध्यमातून वाटचाल करताय. माझा सुद्धा पाठींबा आहे. गरीब नागरीक कर्ज काढून,चणचण सहन करुन आर्थिक उपलब्धता करत असतो. या पार्श्वभूमीवर ही यंत्रणा असतीतर आपण अनधिकृत बांधकाम करणा-याला थांबवू शकलो असतो. गदारोळ चालला होता, तो देखील झाला नसता. किमान अंमलबजावणी का केली नाही? अनेक अधिकारी सस्पेण्ड होतील त्यापेक्षा स्वतंत्र यंत्रणा सुरु करा. त्यासाठी लागणारे कर्मचारी घ्या. तिजोरीवर भार पडणार आहे. एलबीटी, जकातीच्या माध्यमातून

उत्पन्न मिळत असले तरी कुठेतरी आर्थिक परिमाण लक्षात ठेवले पाहीजे. जकातीचे २५० कर्मचारी आहेत त्यांना वर्ग करा. अतिक्रमणासंदर्भात ही सगळी यंत्रणा, सेपरेट सक्षम यंत्रणा निर्माण करण्याबाबत जी.आर असताना त्याकडे सोयीस्कररित्या कानाडोळा करुन सर्व प्रकारच्या कारवाईला सर्व नगरसेवक जबाबदार आहेत असे वातावरण निर्माण झाले आहे. आयुक्त साहेबांना, महापौरांना विनंती करतो की जी.आर. प्रमाणे अंमलबजावणी करावी.

**मा.आयुक्त** - सन्मा.महापौर, सर्व अधिकारी व पत्रकार दिनांक ४/५/२०१३ रोजी दुपारी २ वाजल्यापासून ५ वाजेपर्यंत महापालिका सभा चालू असताना अनेक सदस्यांनी विषयाची मांडणी केली होती. मा.नगरसेवकांनी या विषयाच्या मुददयांवर खुलासा करण्याची मागणी केली होती. मी विनंती केली होती पण मला खुलाश्याची संधी मिळाली नाही. २ विषय आहेत. अनधिकृत बांधकाम हा विषय अनेक सदस्यांनी मांडला. सध्या अनधिकृत बांधकामाचा विषय असल्यामुळे त्याबाबतीत सविस्तर सांगावयाचे आहे. सभा संपताना उरलेल्या विषयांबाबत मला आपल्याला निवेदन करायचे आहे. बरेचसे विषय स्पष्ट झालेले नाहीत. सन्माननियांपर्यंत माहिती व्यवस्थित पोचली नाही. त्यामुळे गैरसमज असण्याची शक्यता आहे. अनधिकृत बांधकामांबाबत पिंपरी चिंचवडमध्येच कारवाई का केली जाते? पीसीएमसी विरुद्ध वंजारी या प्रकरणात मे.न्यायालयाचा आदेश झालेला होता. अनधिकृत बांधकामाबाबत पहिली मुदत मार्च २०११ पर्यंत होती. त्यानंतर ही मुदत ३१ मार्च २०१२ ला संपलेली होती. मागील वेळी चर्चेत असे ऐकले होते, अधिका-यांना पत्र पाठवून भिती घातली जाते की, तुमच्यावर कलम ३९७ या कायद्यानुसार कारवाई होईल. हा कायदा राज्यशासनाने २०१२ मध्ये केलेला आहे. विधीमंडळाने हा कायदा केलेला आहे. मा.राष्ट्रपतींनी संमती दिलेली आहे. या कायद्यामध्ये ३९७ कलम हे समाविष्ट झालेले आहे. यात पदनिर्देशित अधिका-यावर कारवाई करायची तरतूद आहे. कारवाई ३ महिने असेल. ३०,००० दंड लावला जाईल. मागे मुंब्रा इथे जी दुर्घटना झाली. त्यामध्ये जिवितहानी झाली होती. त्यावेळी आयुक्त, उपायुक्त, कार्यकारी अभियंता, उपअभियंता, सहा.आयुक्त या सगळयांवर कारवाई झालेली आहे. यात अधिका-यांवर आरोपपत्र दाखल झाले आहे. असे आपल्या महापालिकेमध्ये होऊ नये असे आयुक्त म्हणून माझे नम्र निवेदन व इच्छा आहे. यात ३१ मार्च २०१२ ही कट ऑफ डेट का धरली आहे? त्यानंतरची बांधकामे पाडण्यासाठी सांगितले नाहीतरी प्रशासनाकडून भूमिका का घेतली जाते? याचा घटनाक्रम आहे.

दि.३ फेब्रुवारी २०११ ला स्पष्टपणे नमूद केलेले आहे, "सहा महिन्यांत आत्ता जी बांधकामे पाडण्यासाठी निर्देशित केली होती. १८ मार्च २०११ ला महासभेने एक ठराव घेतला होता. त्यात उल्हासनगरच्या धर्तीवर शासनाने बांधकामे नियमानुकूल करावीत असे सांगितले होते." आपल्याकडे संधी होती. दिनांक २१ मार्च २००९ पासून सहा महिन्याच्या आत बांधकाम पाडावे असे आदेश केले होते. तो ठराव सभागृहाने घेतला नाही. तो ठराव त्यावेळी घेतला असतातर ही परिस्थिती उद्भवली नसती. राज्य शासनाकडे प्रस्ताव सादर केला. राज्य शासनाने प्रस्ताव फेटाळला आणि उच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन करावे असे निर्देश दिले. २ ऑगस्ट २०११ ला तत्कालीन आयुक्तांनी २०११ पर्यंतची बांधकामे रेग्युलराईज करण्यासाठी शासनाला प्रस्ताव पाठविला होता. त्यावर शासनाने कोणताही निर्णय घेतला नाही. ऑगस्ट २०११ मध्ये शासनाने निर्णय घेतला असता तर, जी.बी.मध्ये निर्णय झाला असता की, एकही अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण होणार नाहीतर अशी परिस्थिती उदभवली नसती. मार्च २०११ ला उच्च न्यायालयाने मुदत वाढविण्याचा निर्णय दिला होता. ३१ मार्च २०१२ पर्यंत मुदत वाढवून देण्यात आली होती. २९ नोव्हेंबर २०११ ला मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली सन्मा.उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत शहरातील सर्व सन्मा.आमदार,मा.महापौर यांचे उपस्थितीत बैठक झाली होती. पूर्वी झालेल्या बांधकामांवर सविस्तर चर्चा झाली. त्याचे कार्यवृत्त उपलब्ध आहे. त्यात लिहिलेले होते, जुन्या बांधकामांबाबत एमआरटीपी कायद्याच्या अनुषंगिक बदल शक्य आहे का. याबाबत नगरविकास विभागावर ही जबाबदारी सोपविली होती. यापुढे कोणतेही अनधिकृत बांधकाम होऊ देऊ नये. २९ मार्च २०११ ला झालेला निर्णय आहे. स्थानिक सन्माननिय त्यावेळी उपस्थित होते. त्याप्रमाणे १३ मार्च २०१२ ला कायदयातील बदल झालेला आहे. तो कायदा विधी मंडळाने केलेला होता. त्या कायद्याला सन्मा.राष्ट्रपतींनी मान्यता दिली आहे. २९ मार्च २०११ ला कायदा संमत झाला. ३९७ कलम व इतर कलम टाकले आहे. त्यानुसार पदनिर्देशित अधिकारी नेमावा. बांधकाम चालू असेल तर नोटीस दयावी व बांधकाम थांबविण्यास सांगावे. बांधकाम काढले नाहीतर त्या अधिका-याविरुद्ध गुन्हा दाखल करावा. पद निर्देशित अधिका-याला तीन महिने जेल व २० हजार रुपये दंड करावा अशी तरतूद आहे. ३१ मार्च २०१२ पर्यंत दिलेली कोर्टाची मुदत संपुष्टात आली. तीन घटनाक्रम लक्षात घ्या. आपल्या समक्ष उपस्थितीत घेतलेला निर्णय, १३ मार्चच्या नियमातील बदल, गुन्हा दाखल करण्याची केलेली कायद्यातील तरतूद व ३१ मार्च २०१२ रोजी हायकोर्टाने दिलेली मुदत संपलेली होती. त्यानंतर मी एक महिन्यानंतर

रुजू झालेलो आहे. त्यावेळच्या आयुक्तांनी काय केले नाही. मग मलाच हे घडवून आणायची हौस आली आहे का? हा घटनाक्रम बघितला तर मा.मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेली बैठक, मा.उच्च न्यायालयाचे निर्देश केले त्याला ४ महिने झाले होते. त्यानंतर महापालिकेत मी रुजू झालो होतो. अशा परिस्थितीतदेखील तत्कालिन आयुक्तांनी ३१ मार्च २०११ पर्यंत बांधकामे रेग्युलर करायचा प्रस्ताव पाठवला आहे. स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन ३१ मार्च २०१२ पर्यंत एक वर्ष मुदतवाढ देऊन न्यायालयाचा आदेश पाळायचा यापलिकडे कोणताही मार्ग प्रशासनापुढे उपलब्ध नव्हता. नाईलाजाने ही भूमिका पार पाडावी लागली. माझी ही भूमिका प्रशासनाने व सभागृहाने समजून घ्यावी. दोन दिवसांपूर्वी राज्य शासनाची बैठक झाली होती. प्रधानसचिवांनी देखील धोरण तयार करण्याबाबत मुद्दा मांडला होता. कायद्यात बदल झाला असलातरी कायदयाविरुध्द शासनाला जाता येणार नाही. कायदा सर्वांना पाळावा लागतो. सर्व समान असतात. विधी मंडळाने सुद्धा कायदा केलेला आहे. ३१ मार्च २०१२ नंतरची बांधकामे रेग्युलराईज होणार नाहीत हे पण त्यांनी स्पष्ट केलेले आहे. या मिटींगमध्ये शासनाने गुंठेवारी कायदयाला मुदतवाढ देणे शक्य नाही. यापद्धतीने चुकीची प्रथा पडेल अशी शासनाची भूमिका होती. त्या पद्धतीचे धोरण विचारात घेऊन ३१ मार्च २०१२ नंतर झालेली सर्व बांधकामांवर कारवाई करण्याऐवजी काही बांधकामे जी अनधिकृत व अवैध आहेत. अवैध म्हणजे ज्या ठिकाणी बांधकाम होऊ शकत नाही. नो-डेव्हलपमेंट झोन/नाविकास क्षेत्र आहे, काही पूर रेषातील जागा आहे, हरीत झोन आहे, रस्ते आहे, डी.पी.आरक्षण आहे अशा ठिकाणी बांधकामाला परवानगी देता येऊ शकत नाही. तिथे ३१ मार्च आधीचे बांधकाम असेलतर ते पाडावे लागेल. असे मा.नगरसेवक यांचे बैठकीमध्ये मुद्दे मांडले होते. ही बाब लक्षात घेता ही बांधकामे काढावी लागतील हे याठिकाणी समजून घ्यावे ही विनंती. गेल्या मे महिन्यामध्ये काही मुद्दे मांडण्यात आले होते की, मार्च २०१२ नंतरच्या बांधकामांवर कारवाई का सुरु केली? कोणताही कटू निर्णय घेतो त्यावेळी सर्वसामान्य वर्गाची नाराजी निर्माण होते. आर्थिक क्षमता असून सुद्धा,त्यांना कायदा माहित असून सुद्धा ते कायदा मोडतात. त्यांच्यापर्यंत संदेश जावा. इतरांपर्यंत संदेश जावा. वरिष्ठ लोकप्रतिनिधींनी हेच वक्तव्य केलेले आहे. म्हणून त्या पद्धतीनेच आकडेवारी तयार केली होती. २०१२ नंतरची बिगर परवाना बांधकामे ही कारवाईस पात्र आहेत. ३१ मार्च २०१२ नुसार बांधकाम करण्याचे पत्र किंबहुना २५ मार्च २०१३ ला दिले होते. गेल्या दिड महिन्यापुर्वी दुर्दैवाने चिंचवडमध्ये अशी घटना घडली की एक इमारत कोसळली व

त्यामध्ये काही लोक गंभीर जखमी झाले. हे बांधकाम बी३ कॅटेगरीतील होते. यानंतर कोणीही इंजिनिअर कोणत्याही बांधकामाची गॅरंटी दयायला तयार नाही. याची वर्गवारी आहे का, कोणीही याची गॅरंटी द्यायला तयार नाही. बांधकाम कोणी केले, कसे केले, बांधकामासाठी कोणते मटेरियल वापरले. सिमेंट, लोखंड कसे वापरले, हे कोणी कॉन्फीडंटली सांगू शकत नाही. मुंब्रा इथे कोसळलेल्या इमारतीमध्ये नित्कृष्ट स्टिल मटेरियल वापरले होते. पाया संपूर्ण भुसभूशीत होता. त्यामुळे ६ मार्च २०१३ ला गुन्हा दाखल झालेनंतर कोणीही १०,१२ मार्च पर्यंत परवानगी घेतलेली नाही. ८/१० महिन्यांतील बांधकामांना परमिशन नाही म्हणून त्याच्या सुपरविजनचा प्रश्नच येत नाही. ते बांधकाम सुरक्षित आहे का, धोकादायक आहे का हे सांगू शकत नाही. त्याची वर्गवारी करता येत नाही. म्हणून बी३ कॅटेगरीतील बांधकामे सुद्धा त्यात कारवाईस पात्र आहेत. फार मोठ्या प्रमाणात कारवाई होते आहे. घरांची आकडेवारीची माहीती, मध्यंतरी काही पेपरवाल्यांनी पुरावे विचारल्यानंतर माहीती दिली. करसंकलन विभागाकडून माहिती प्राप्त होते. बी२ मध्ये ३५% आकडेवारी आहे. ही आकडेवारी स्थापत्य विभागाकडून कळवली आहे. उच्च न्यायालयासमोर त्यांनी ही आकडेवारी सादर केलेली आहे, माझ्या मनाने प्राप्त केलेली नाही. मी रुजू झाल्यानंतर तयार केलेली आहे.

**मा.दत्ता साने** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, करसंकलन विभागाला हा अधिकार नाही आपणच सांगितले होते. हे करत असताना ढोबळ आकडेच सांगताय हे चुकीचे आहे. कायद्यावर बोट ठेवून बोलत असाल तर ते सांगायला नाही पाहीजे.

**मा.आयुक्त** - सन्मा.महापौर, सर्व अधिकारी व पत्रकार, मी रुजू व्हायच्या आधी उच्च न्यायालयाने सादर केलेली आकडेवारी सांगतोय. ही मनाने तयार केलेली नाही. १,१०,००० ही आकडेवारी उच्च न्यायालयात सादर केली आहे. मार्च २०१२ नंतरची आकडेवारी स्थापत्य विभागाने संकलित केलेली आहे. एकूण मिळकतींच्या तुलनेत दोन हजार सहाशे पंच्यान्नव भागिले एकूण मिळकती म्हणजे ०.०७% मिळकती अनधिकृत आहेत. त्यापैकी २४४ मिळकती पाडण्यात आलेल्या आहेत. एकूण मिळकतींच्या ०.०७% पाडण्यात आल्या आहेत. एकूण अधिकृत मिळकती ३,२०,००० धरल्या तर त्या .२% होतात. एकूण अधिकृत मिळकती .२% पाडल्या. पहिल्यांदा इथे आकडेवारी मांडली आहे. अनेक वेळा हा मुद्दा मांडला गेला आहे की, वेगळी यंत्रणा असावी. या मताशी मी पूर्णतः सहमत आहे. मनपातील अपूरा स्टाफ

लक्षात घेता वेगळी यंत्रणा ठेवण्याच्या विषयाला जरी मंजुरी दिली तरी तो कुठून आणायचा? त्यासाठी वेगळी टेक्निकल टिम लागते. पदनिर्देशित अधिकारी ज्यावेळी नेमण्यात आला, त्यावेळी आपल्या महापालिकेने इतर महापालिकांचा अभ्यास करुन पदनिर्देशित अधिकारी उशिरा नेमले आहेत. स्थापत्य विभागाने प्रस्ताव तयार केला त्याप्रमाणे पदनिर्देशित अधिकारी नेमले आहेत. पिंपरी चिंचवडबाबत वेगळा प्रश्न आहे. ही महापालिका राज्यातली सगळ्यात वेगाने वाढणारी महापालिका आहे. तेवढ्या प्रमाणात पदे निर्माण केली नाहीत. ही आकडेवारी सभागृहासमोर नमूद करतो. जेव्हा जेएनएनयूआरएम सुरु झाले, त्यावेळी २८९ इंजिनिअरींगची पदे होती. २००७ पासून २०१२ पर्यंत जेएनएनयूआरएमच्या योजना राबवत असताना इंजिनिअरींगची ३०९ पदे भरण्यात आली. म्हणजे फक्त ७% पदांमध्ये वाढ झालेली आहे. ७८ पदे वाढलेली आहेत. २००७ पासून आजपर्यंत किती कोटी खर्च केले. या वर्षी १००० कोटी भांडवली व जेएनएनयूआरएम वर खर्च करतोय. पाचशे टक्के जबाबदारी वाढली आहे. पदे मात्र ७% च वाढली आहेत. १९९२ मध्ये स्टाफींग पॅटर्नमध्ये बदल झाला. जेवढ्या प्रमाणात शहर वाढतेय, त्याप्रमाणात पदांना मंजूरी झाली नाही. म्हणून पद निर्मितीचा प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी दिला गेला असता तर पदे ताबडतोब प्रस्तावित झाली असती. हे करण्यासारखे आहे. शासनाकडे हा मुद्दा मांडला नाही. शासनाने आम्हाला मुंबई पॅटर्नचा अभ्यास करावा असे निर्देश दिले आहेत. त्याप्रमाणे अभ्यास केला आहे. सर्वजण शहर अभियंता, कार्यकारी अभियंता यांच्याबरोबर ४ ते ५ बैठका झाल्या. त्यासाठी कशा पद्धतीने प्रशासकीय पत्र पाहीजे. पीडब्ल्यूडी, पुणे यांची पदसोपानाची जी पद्धत आहे त्याचा अभ्यास करुन प्रस्ताव तयार केला आहे. जून महिन्यातील महापालिका सभेपुढे हा प्रस्ताव मांडणार आहोत. पाच पटीने जबाबदारी वाढली असली तरी त्याप्रमाणात पदांची संख्या वाढली नसल्यामुळे अतिक्रमण निर्मूलनासारखे मोठे काम करण्यासाठी स्टाफ कमी पडत असेलतर विकास कामांकडे लक्ष द्यायला वेळ कमी मिळतो म्हणून लवकरात लवकर स्टाफींग पॅटर्नची नियमावली अद्ययावत करावी लागणार आहे. स्वतःची पॉलिसी असण्याच्या विषयात शासन निर्णयाअन्वये सर्व महापालिकांना सूचना दिलेल्या होत्या. १०६ पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव सभागृहासमोर ठेवला आहे. अनेक प्रकारचे मुद्दे उपस्थित झाले होते. त्यात वनटाईम एक्सपेंडीचर, साहीत्य सामुग्री देण्यात ५० लाख, रिकरिंग एक्सपेंडीचर २ कोटी २४ लाख वाढीव खर्चाचा समावेश होणार आहे. रोजच्या रोज बांधकामे काढण्यात, नुकसान करण्यास, पोलिस बंदोबस्त करण्यासाठी पोलिस विभागात पैसे जमा करावे लागतात. ३१ मार्च

२०१२ नंतरच्या २६९५ बांधकामांपैकी २४४ बांधकामे जमिनदोस्त केली. हायकोर्टाचा आदेश असल्यामुळे ही आपली जबाबदारी आहे. ही जबाबदारी पार पाडण्यासाठी वेगळा बंदोबस्त मागितला तर त्यासाठी पैसे द्यावे लागतील. अनधिकृत बांधकामे थांबली असल्याचा मुद्दा उपस्थित केला आहे. साधारणतः जमिनींचे वाढते भाव, या पद्धतीने पैसे कमवण्याचा सोप्पा मार्ग लक्षात घेता, भविष्यात शहरात अनधिकृत बांधकामे होणारच नाही असे सांगु शकत नाही. यासाठी सक्षम यंत्रणा असणे आवश्यक आहे. रस्त्यांवरची अतिक्रमणे–अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे केलेली आहेत. झोपडपट्टीतील लोकांनी घरे वाढवली आहेत. अनेक ठिकाणी २४ मी.चा रस्ता ३० मी. सुंदर रस्ता तयार केलातरी त्यावर अतिक्रमण केले आहे. त्यामुळे रस्त्यावर चालणारी म्हातारी माणसे, कडेवर लहान बाळ घेऊन जाणा-या महिला यांना अडचण निर्माण होते. त्यामुळे ही अतिक्रमणे सुद्धा काढायचे काम या यंत्रणेला द्यायचे आहे. महापालिकेच्या मोकळ्या जागा मोठ्या प्रमाणात आहेत. भूसंपादनाच्या जागा, गायरानाच्या जमिनी, गावे समर्पित झाली त्यातून मिळालेल्या जागांवर अनेक ठिकाणी अतिक्रमणे काढण्यासाठी महापालिकेतील यंत्रणा उपयोगात येणार आहे. सव्वा दोन कोटींचा खर्च प्राईम प्रॉपर्टीजवर अतिक्रमण केले असेल तर ५ ते १० कोटींची कंपनी असेल, प्रभाग अधिका-यांना अतिक्रमणे काढण्याबाबत निर्देशित केले जाते. पोलिस बंदोबस्त मिळण्यात अडचणी येतात. त्यांच्याकडील पदरी काम करणा-या मनुष्यबळाची उपलब्धता लक्षात घेता ते प्रत्येक वेळी उपलब्ध होत नाही. जितकी पोलिस फोर्स येईल ती प्रत्येक प्रभागात वाटून देऊ शकतो. कुठेतरी प्रभाग अधिका-यावर जबाबदारी येऊ शकते. कोणत्याही रस्त्यावर टपरी राहणार नाही. फूटपाथवर अनधिकृत बांधकाम होणार नाही. लेखी आदेशाप्रमाणे केलेतर निश्चितपणे मनुष्यबळ प्रतिनियुक्तीने येवू शकते म्हणून हा विषय मंजूर करावा अशी विनंती आहे. व्हिडिओ कॉन्फरन्सींग ६ एप्रिलला झाले आहे. सूचना दिलेली आहे. या महापालिकेचा विचार करताना दोन मुद्दे समोर येतात. एक म्हणजे पिंपरी चिंचवड शहराच्या वाढीचा वेग राज्यात सर्वात जास्त आहे. म्हणून सर्वात मोठा धोका आपल्याला आहे. शहरातील अनधिकृत बांधकामांचे प्रमाण लक्षात घेता याची जबाबदारी आणि खबरदारी जास्त घेतली पाहीजे. पोलिस असताना फॉलोअप करावा लागतो. त्यापेक्षा पोलीस लोकांना आपलेकडे घेतले तर आपल्या इंजिनिअरला मनुष्यबळ मिळेल हे लक्षात घेता ते राज्य शासनाच्या आस्थापनेवर असल्यामुळे ट्रान्सफर होऊ शकते म्हणून हा विषय मंजूर करावा.

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, २ मार्च २००९ला शासनाने दिलेल्या जी.आर.च्या अनुषंगाने, आयुक्तांनी दिलेल्या विषयाच्या स्पष्टीकरणाच्या अनुषंगाने, पोलिसांचा एक भाग ऑलरेडी खर्च करतोय हे आयुक्तांनी त्यांच्या प्रस्तावनेत मान्य केलेले आहे. विनंती असणार आहे, हा खर्च भविष्यात करायला हरकत नाही. हा खर्च करत असताना हे बैठकीत सांगितलेले होते, उपआयुक्त दर्जाच्या अधिका-याच्या अधिपत्याखाली ४ प्रभागांत चार सक्षम अधिकारी नेमणार आहोत हे सर्वांना, ज्येष्ठ कार्यकर्त्यांना सांगितलेले होते. मा.आर.एस.कुमार यांनी सांगितले होते की, ठोस वेळ मिळेल. ५ नाहीतर १० वर्षांपासून मा.भाऊसाहेब भोईर, मा.आप्पा बारणे,मा.मंगलाताई कदम असतील,मा.अजित गव्हाणे असतील, मिनिटस् काढून दाखवतो. तुम्हाला पण विनंती आहे, जवळजवळ ४ ते ५ सभांमधून विनंती केलेली आहे. या कामासाठी रेव्हेन्यूचा अधिकारी व प्रभाग निहाय चांगला व सक्षम अधिकारी नेमावा. इंजिनिअर्स यांच्याकडून ही जबाबदारी काढून घ्यावी. २००४-०५ मध्ये २०० कोटींची कामे केली. इंजिनिअर याच्यासाठी किती स्ट्रॉंग आहेत. स्वतः त्यांनी कबूल केलेले आहे. इतके असताना मा.उल्हास शेट्टी यांनी सांगितल्याप्रमाणे त्याठिकाणी ४/५ वर्षांत आम्ही जेवढी कामे करतो, नगरसेवकापेक्षा तो इंजिनिअर वॉर्डात जास्त फिरत असतो. प्रत्येक गल्लीत पेंडींग कामे झालीत का हे बघायला त्याला फिरायला लावतात. संबंधितांना त्याचा दररोज रामराम असतो. तुमचे समर्थन करत असताना विनंती सुद्धा केलेली आहे. या अनुषंगाने नंबर १) कोर्टाचा आदेश, नंबर २) मुख्यमंत्र्यांनी मिटींग घेतली, अध्यादेश दिला, त्याप्रमाणे सगळ्यांनी सांगितले ते तुमच्यासमोर मांडतोय. तुम्ही सांगितले, २००२ मध्ये †क्शन घेतली होती. २६९५ इतका आकडा सांगितला होता. हे करत असताना आमचे दुखणे काय ते बघा. त्यासाठी आम्ही वारंवार ओरडतो. प्रत्येक जण याच प्रसंगातून गेलेला आहे. मा.पठाणबाईंनी पॉईंट आऊट केले होते. काही लोकांची झोप उडाली होती. आप्पा बारणे यांनीतर मोठमोठी पुस्तके,पत्रके छापली होती. आज हेच अभिनंदन करत आहेत. राजकारण्यांचे हेच काम आहे. कधी इकडे उडी मारणार. आज कोणताही परिसर घ्या, त्यात कामे करत असताना २५ ते ३० वर्षांपासून राजकारणात आहे. ३ टर्म निवडून आलो आहे. त्यावेळी आम्हाला सुद्धा लोकांमध्ये भेदभाव करता येत नाही. कायदा सर्वांसाठी सारखाच असतो. नगरविकास विभागाने सांगितले होते, दि.३१/३/२०१२ पर्यंतची बांधकामे, त्यानंतरच्या बांधकामांना गरजच नाही, या मताशी मी देखील सहमत आहे. कायद्याप्रमाणे करतोय असे म्हणताय. पण याला कायद्याचा बेस आहे का? २०१२ पर्यंत झालेली बांधकामे ठिक आहे मान्य

केले. तुम्ही २४ मे ला जॉईन झालात. तुमच्या आधी पण महापालिका होती. मी महापौर असताना मिटींग घेतली होती. मा.मुख्यमंत्र्यांबरोबर बैठक झाली होती. त्यात सेक्रेटरी होते, उपमुख्यमंत्री सर्व जण होते. मा.मुख्यमंत्र्यांनी स्वतः घोषणा केली होती. हीच गोष्ट मी मा.शरद पवार साहेब यांच्यासमोर मांडली होती. हेच पोटतिडकीने सांगितले होते, ब्ल्यू लाईन, रेड लाईन तुमच्यामुळे आलेली नाही, झालेली नाही. आम्ही सांगतोय, लाईन होती, अक्शन करताना २०११-१२ पर्यंत सांगितले होते, हे ऐकायची मानसिकता आमच्याकडे होती. १०० लोकांची बेकायदेशीर घरे वाचतात. १०/१२ लोकांची घरे पडतात. त्यांचा तळतळाट आम्हालापण लागतो आहे. तुमच्या अधिका-यांना, तुम्हाला पण लागतो आहे. २०१२ पर्यंत क्लिन केलेतरी, लोकांनी फटाफट सिमेंटचे प्लास्टरींग करुन काम संपवले. कोणाचेही घर गरीबाचे असले तरी दोन/तीन महिन्यांत बांधून होत नाही. तुम्ही डॉक्टर आहात. सिव्हील कामासाठी १० बाय १० ची खोली बांधायला ६ ते ८ महिने लागतात. लोकांची आर्थिक परिस्थीती नसते. ते कर्ज घेतात. फंडातून पैसे काढतात. सोसायटी काढतात. श्रीमंताचे घर पाडले म्हणून मी तुमच्या केबिनमध्ये कधी आलेलो नाही. कोणी ब्ल्यू लाईनमध्ये घर बांधले तर हे आधी सांगता आले नाही का? तुम्हाला विनंती करतो, तुम्ही अध्यादेश काढताय. त्यातला टेन्टेटीव्ह कोर्टाचा आदेश वाचत असताना ६ महिन्यांत करावे असे सांगितले होते. ते आपण केले का? २०११ मध्ये मुदत संपली. त्यावेळचे जे आयुक्त होते ते तुमच्यासारखे कडक असतेतर कदाचित आज ही वेळ आली नसती. लोक बेकायदेशीर बांधकामे का करतात? याकडे सुद्धा लक्ष द्या. रेसिडेन्शीयलसाठी एन.ए. लागतो ते घेण्याची सोय बिल्डींग परमिशन विभागात करा. एन.ए.साठी किती हेलपाटे मारावे लागतात. पैसे खर्च करावे लागतात. कलेक्टर ऑफीसने वहीवाटीची मोजणी बंद केलेली आहे. गावडे नावाचा एक मनुष्य आहे. त्याने २ गुंठे जागा घेतली. त्याला मोजणी करुन मिळत नाही. ४ हेक्टरचे पैसे त्याला भरावे लागतात. या रकमेत त्याचे घर बांधून होईल. अनेक कायदेशीर अडचणी आहेत. ग्रामपंचायतीचे नियम वेगळे, नगरपालिकेचे नियम वेगळे. गावाकडे प्रकरणे पडली होती. कधीतरी करुन देत होते का? तुम्हाला जबाबदार धरले नाही म्हणून साहेबांनी म्हटले. याबद्दल लोकांना दिलासा द्या. निर्णय करा. ३१ मार्च २०१२ म्हणताय. हे अंडरस्टँडींग आहे. मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री यांनी राज्य शासनात बोलावे. बेकायदेशीर करा म्हणत नाही. कलम ३९७ चा अध्यादेश काढला तसा हा अध्यादेश नाही. ज्यावेळी एखाद्याने नोव्हेंबर मध्ये काम सुरु केले असले तरी इंजिनिअर लोकांनी जो फोटो दिला, त्याच्या अनुषंगाने

अनधिकृत इमारतींची फिगर काढण्यात आली होती. त्या मनुष्याने ८ महिने आधी काम सुरु केले. तुम्ही आल्यानंतर तो घराचे प्लास्टरींग करत असल्यामुळे त्याने घराची नोंद महापालिकेकडे केली नसेल तर त्या अनधिकृत या कॅटेगरीत धरले गेले आहे. माझे म्हणणे तुम्ही लक्षात घ्या. फोटोवरुन लक्षात आले पाहीजे. हे काम आत्ता झालेले नाही. मी स्वतः डेप्युटी इंजिनिअरला जावून भेटलो. १० ते १४ महिन्यांपूर्वी काम सुरु झाले. तुम्ही आलात आणि सस्पेंड ऑर्डर काढली. यामुळे अधिका-यांत घबराट निर्माण झाली. त्यांनी पटापट पंचनामे करा, फोटो काढा. तुम्ही २३ मे ला जॉईंट झालात. समजा ज्यावेळी इंजिनिअर गेला त्यावेळी प्लिंथ लेवलचे काम चालू असेल, रुमवर रुम झाली, कॉलम टाकले, प्लास्टरींग झालेले आहे. तुमच्या माणसाने फोटो काढला. आत्ता त्याचे ड्रेनेजचे कनेक्शन तोडायला जात होते. इथे आमचा विरोध आहे. येथे पण नवा हिअरींग सक्षम अधिकारी नेमावा व जस्टीफाय करावे. नोटीसमध्ये व प्रत्यक्ष बांधकामाची स्थिती यात तफावत आहे. भविष्यात बेकायदेशीर कामे होऊ नयेत म्हणून आम्ही नेहमीच तुमच्याबरोबर आहोत. मोटे साहेबांनी सुद्धा हेच सांगितले. आपल्याला थांबावे लागेल. तुम्हाला विनंती आहे, तुमच्या इंजिनिअरने ज्यावेळी पंचनामा केला, त्यावेळी फोटो कोणता घेतला, हे नीट बघा. ही बांधकामे चार दिवसांत झाली का ८ दिवसांत झाली. कटऑफ डेट ३१ मार्च २०१२ हीच डेट असेलतर त्याला कुठेतरी बिलिव्ह केले पाहिजे. शास्ती लावून नियमित करा. कॉलम लेवलवर काढून टाका. दोन खोल्या बांधल्या असतील तर त्यासाठी वेगळी पद्धत असताना वेगळी माणसे रहात असतात. फोटो काढून दिला जातो. त्यानुसार त्याचे ड्रेनेजचे कनेक्शन कट करताय. एकीकडे राज्य शासनाने उघड्यावर बसू नका म्हणून मोहिम राबवायची. पाणी कट केलेतर त्याने काय करायचे. त्यासाठी भांडतोय. तुमचे आमचे वैयक्तिक भांडण नाही. टीडीआरच्या कोणत्याही फाईल तुमच्याकडे नाहीत. बहल यांनी सांगितले म्हणजे त्यांची फाईल तुमच्याकडे आहे का? पठाणताईंनी एखादा विषय सभेत रिप्रेझेंट केला म्हणजे त्याची फाईल तुमच्याकडे आहे का? अधिकृत परमिशन असेल, रेव्हेन्यूच्या अधिका-यांवर खूप लोड आहे. चिंचवडचे जे.ई.ला सस्पेण्ड केले. तो इतका सरळ मनुष्य आहे. आम्ही असे सांगत नाही, म्हणत नाही. चूकत असेल तर सस्पेण्ड केले पाहीजे. कायदा केला पाहीजे. तो विषय नाही. पण जस्टीफाय करा, हिअरींग करा, नियमाप्रमाणे पुरावे सादर करायला वेळ द्या. बांधकामाचे †ग्रीमेंट आहे का, अप्रोच रोड आहे का ते पहा. जादा रुमची पेनल्टी लावा. सर्टीफाय झाले नसेल तर †क्शन घ्या. दि. २९/११/२०११ रोजी मा.मुख्यमंत्र्यांच्या बैठकीबद्दल

म्हणताय. या बैठकीत क्लिअर कट अंडस्टँडींग होते. तो कायदा अजून झालेला नाही. सामान्य मनुष्य काय म्हणतोय हे समजून घ्या. तो आमच्या मागे का पडतोय? ३९७ कलमाप्रमाणे करताय हे बरोबर आहे. नगरसेवकाबरोबर अधिका-यावर कारवाई करायची आहे बरोबर आहे. अधिकारी बेकायदेशीर कामे करतात असे म्हणताय. परंतू मानवतेच्या दृष्टीकोणातून विचार केलातर त्या गरीब माणसाने असे का केले हे समजून घेणे जास्त महत्वाचे हे. पोलिसांच्या पदनिर्मितीबाबत सांगितले. ही आवश्यक बाब आहे. माझा मुद्दा सर्वांच्या लक्षात आलाच आहे की, हा विषय मंजूर करावा. रेव्हन्यूकडील उपआयुक्त दर्जाचा अधिकारी या कामासाठी नेमावा. नंतर बाकी अधिकारी नेमावेत. अ,ब,क,ड प्रभागानुसार अधिकारी नेमावेत. सगळा विषय एकत्र आणून मग विषयाला मंजूरी द्यावी. या विषयाला आमचा विरोध नाही. जी.आर.च्या अनुषंगाने शहरात उपआयुक्त दर्जाचे ४ प्रभागांत ४ अधिकारी असावेत. त्यांना लागणारी वाहने, जेसीबी असेल, पेट्रोल/डिझेल असेल, अधिक खर्च झालातरी चालेल. २० कोटी खर्च करताना, जे.ई.ची जबाबदारी कमी करा. वेगळा निरिक्षक नेमावा. विषय एकत्रित आणावा. सर्वजण मंजूरी देऊ. हा विषय आत्ता तहकूब करा.

**मा.शमीम पठाण** - अनुमोदन आहे.

**मा.आप्पा बारणे** - मा.आयुक्त साहेब, मा.महापौर साहेब, चुकीच्या पध्दतीने सभागृहाची दिशाभूल केली जाते आहे. माझे नाव घेतले आहे. २० फेब्रुवारीला निवेदन झाले. १ मार्चला ३४ अनधिकृत मिळकती नियमित करतो. नंतर बैठक घेऊन सांगता. म्हणजे तुम्ही लोकांची दिशाभूल करताय आणि सभागृहाचा वेळ घालवताय.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक – २६३ | विषय क्रमांक - २ |
| दिनांक - ९/५/२०१३ | विभाग - मा.आयुक्त |

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.प्रशा/१अ/कावि/२८/२०१३ दि.८/१/२०१३

२) मा.स्थायी समिती सभा दिनांक १५/०१/२०१३ ठराव क्र.२४२३ नुसार

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.२४० दि.२२/०३/२०१३

विषय क्रमांक २चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ७० प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.तानाजी खाडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – २६४ विषय क्रमांक - ३

दिनांक - ९/५/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र भूजिं/६/कावि/८८/२०१३ दि.२/३/२०१३.

२) मा.स्थायी समिती सभा दिनांक १२/३/२०१३ ठराव क्र.३०५६ नुसार

पिंपरी चिंचवड शहरासाठी सह.दुय्यम निबंधकासाठी दोन नविन कार्यालये सुरू करणेसाठी शासनाची मान्यता प्राप्त झाली असून सदर कार्यालयाकरिता पिंपरी चिंचवड शहरात जागा मिळणेबाबत सह जिल्हा निबंधक (वर्ग-१) मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर यांच्या मागणीनुसार अ) कासारवाडी, मंडई ग्रंथालयावरील तळमजल्यावरील ३,००० चौ.फुट जागा ब) पिंपरी वाघेरे येथील आरक्षण क्र.१६० वरील व्यापारी संकुलातील पहिल्या मजल्यावरील २,५३९ चौ.फुट जागा नगररचना विभागाने ठरवून दिलेल्या भाडेदराने अनु.प्रति चौ.फुट र.रू.१३/- प्रतिमहा व र.रू.१८/- प्रति महा सह.दुय्यम निबंधक कार्यालयाकरिता निव्वळ मासिक भाडे अनु.रू.३९,०००/- व रू.४५,७०२/- या दराने (मनपा व इतर कराव्यतिरिक्त) प्रतिवर्षी मासिक भाडे दरात १२.५% वाढ करणे व मनपा अटी/शर्तीनुसार ५ वर्षे कालावधीकरिता नमूद जागा सह.दुय्यम निबंधक कार्यालयाकरिता भाड्याने देणेकामी मान्यता देणेत येत आहे.

**मा.दत्ता साने** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ७० प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

**मा.तानाजी खाडे :-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक ४

दिनांक - ९/५/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भः-१) मा.शकुंतला धराडे ,मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव.

२) मा.स्थायी समिती सभा दिनांक १२/३/२०१३ ठराव क्र.३०८५ नुसार

पिंपरी चिंचवड मनपा हददीतील ज्येष्ठ, तरुण मंडळी व प्रामुख्याने चिमुकल्यांचे विरंगुळा स्थान असणा-या उद्यानांची वाढविलेली प्रवेश फी कमी करुन पुर्ववत करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.दत्ता साने** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देतो.

**मा.रामदास बोकड** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो आहे –

१) वीर सावरकर उद्यान से.नं. २६ गणेश तलाव प्रवेश फी पूर्ण माफ करणेस तसेच २) राजमाता जिजाऊ उद्यान, पिंपळे गुरव सर्वे क्र. ७२/२ या उद्यानातील प्रवेश फी (स्थापनेवेळी) पूर्वीप्रमाणे आकारणेत यावी, ३) शाहू उद्यान,शाहूनगर, चिंचवड या उद्यानातील प्रवेश फी मोफत करणेस,४) स्व.तानाजीराव शितोळे (सरकार) उद्यान सांगवी या उद्यानातील प्रवेश फी ५ रु. आकारणेस मान्यता देणेत यावी.

**मा.राजू मिसाळ** :- मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.आर.एस.कुमार** - मा.महापौर साहेब,दुर्गा टेकडी येथे पार्किंग सुरु झाले आहे. टू व्हिलरसाठी १०/- घेतात. याची चौकशी केली समजले की, राजेश मेहता नावाच्या व्यक्तीने तत्कालिन आयुक्त शर्मा यांच्या उपस्थितीत ५ वर्षासाठी १५ लाखाचे †ग्रीमेंट करुन हे पार्किंग सुरु केले आहे. ढेरे साहेबांनी विषय सांगितला आहे. ही राजेश नावाची व्यक्ती कोण आहे? यांना अप्पूघर चालवायचे राईटस् कोणी दिले आहेत? इतर ठिकाणी पार्कींग चालू करण्यासाठी जे †ग्रीमेंट केलेले होते त्यात राजेश मेहता यांना राईटस् दिले होते का? याचे उत्तर द्यावे.

**मा.श्रीरंग बारणे** - मा.महापौर साहेब, प्रशासनाला असा ठराव करता येणार नाही. या शहरामध्ये जेवढी उद्याने आहेत त्यासाठी समान दर असावा. एका उद्यानासाठी मोफत व दुस-या उद्यानासाठी जास्त/कमी दर घ्यायचे. शहरातील लोक मोठ्या उद्यानांत जातात. फी आकारताना चुकीच्या पद्धतीने फी आकारु नये. हे दर आकारलेले आहेत. यासाठी जी उपसूचना दिली आहे ती नावानिशी दिली आहे. उद्यान अधिक्षकाने उद्यान विभागाची माहिती घेऊन दर ठरवावे. फी वाढवली असेल तर काय फरक पडला आहे. किती नागरीक कमी येतात हे सुद्धा सांगावे. एका उद्यानासाठी फी घेणार नाही तर, दुसरीकडे दहा रुपये आकारणे चुकीचे होते आहे. त्याची पुर्ण माहिती तपासून घेतल्यानंतर देण्यात यावी.

**मा.कुलकर्णी** (सहा.आयुक्त) - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, अप्पूघरच्या पार्किंगबाबतीत मुद्दा उपस्थित केला आहे. तक्रारी प्राप्त झाल्यानंतर चौकशी करुन अ प्रभाग अधिका-यांकडे माहिती दिलेली आहे. प्राथमिकरित्या करार करुन झाला आहे. त्यात त्रुटी असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यात आवश्यक त्या दुरुस्त्या करण्यात येतील.

**मा.आर.एस.कुमार** – मा.महापौर साहेब, पार्किंगसाठी १०/- घेणे बंद करा. अ प्रभाग अधिकारी रिपोर्ट करत आहेत. अहवाल प्राप्त झाल्यानंतर काय कारवाई निश्चित केली जाईल. करारनाम्याप्रमाणे जेवढी रकम घेणे आवश्यक आहे. अनेक लोक दुर्गा टेकडीवर फिरायला जातात. त्यांच्याकडून एक रुपया सुद्धा घेत नाही. त्याचवेळी महापालिकेच्या पार्किंगसाठी कशाला घेताय? ५ वर्षांसाठी १५ लाखाचा विषय दिलेला आहे. तो थर्ड पार्टीची व्यवस्था करणार. It is not Appu Ghar's parking, it is Durga Tekdi's parking.

**मा.कुलकर्णी** (सहा.आयुक्त) - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, दोन्हीसाठी करारनामा झालेला आहे. प्राथमिक तपासात चर्चेत मान्य केलेले आहे. जेवढी रक्कम अलॉट केलेली आहे, त्यापेक्षा जास्त घेत असेल तर अपेक्षित ती कारवाई केली जाईल.

**मा.आर.एस.कुमार** – मा.महापौर साहेब, अप्पूघरचे वॉटर पार्क भाड्याने दिलेले आहे. त्याची ५० लाख इतकी थकबाकी वसूल केलेली नाही. अधिका-यांनी †क्शन का घेतली नाही. तो कोर्टात गेला आहे. त्याच्याकडून अप्पूघरची १ कोटींचे भाडे

थकबाकी आहे. ही साधी रक्कम झाली का. १ कोटी थकबाकी होईपर्यंत का थांबलात? उद्यापासून वॉटर पार्क बंद करा. भाड्याची रक्कम वसूल करा.

**मा.शमीम पठाण** - मा.महापौर साहेब, तुम्ही आदेश द्या. पार्कींगची रक्कम बंद करा.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, हा उद्यानाचा विषय आहे. अप्पूघरासाठी जे पार्किंग आहे त्या विषयानुसार सगळ्या शहरात छोटी-मोठी उद्याने आहेत. त्यांचे करारनामे सुद्धा बघून घेतले पाहीजेत. ब-याचशा ठिकाणी †ग्रीमेंटमध्ये नमूद केलेले नाही. बाहेरची कोणी नवीन माणसे असतात. मागच्या वेळेस निदर्शनास आणून दिले होते. तिथे गुंड प्रवृत्तीचे लोक असतील, मला त्यांची नांवे काही घ्यायची नाही. परंतू ते लोक वसुली करतात. पैसेवाल्यांकडून १००/- इतक्या रेटनी पैसे घेतले जातात. ते व्यवस्था करतात. अशापद्धतीची कामे चालली आहेत. रस्ता रुंद केला. प्रत्येक ठिकाणी †ग्रीमेंट बघायची वेळ आली तरी दरवर्षी बघणार असाल तर †ग्रीमेंट रिलिव्ह होत नाही का? प्रत्येक नगरसेवकाने †ग्रीमेंट चेक करायचे का? सभागृहाने वाईटपणा का घ्यायचा या गोष्टीसाठी अधिका-यांनी त्यांचे काम केले पाहीजे. †ग्रीमेंटप्रमाणे काम होत नसेलतर ११ महिन्यांप्रमाणे दिलेले असेलतर स्टँडींग कमिटीत ११ महिन्यांनी विषय येतो. ११ महिन्यांत निदर्शनास आले नाही का १ कोटी थकबाकी आहे. रितसर रिन्यू करताना बघितले तरी त्यात अडचण असायचे कारण नाही. हा विषय उपसुचनेसहीत मंजूर करावा.

**मा.तानाजी खाडे** :- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - २६५ विषय क्रमांक - ४
दिनांक -९/५/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भः-१) मा.शकुंतला धराडे, मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव.
२) मा.स्थायी समिती सभा दिनांक १२/३/२०१३ ठराव क्र.३०८५ नुसार

पिंपरी चिंचवड मनपा हददीतील ज्येष्ठ, तरुण मंडळी व प्रामुख्याने चिमुकल्यांचे विरंगुळा स्थान असणा-या उद्यानांची वाढविलेली प्रवेश फी कमी करुन पुर्ववत करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच १) वीर सावरकर उद्यान से.नं. २६ गणेश

तलाव प्रवेश फी पूर्ण माफ करणेस तसेच २) राजमाता जिजाऊ उद्यान, पिंपळे गुरव सर्वे क्र. ७२/२ या उद्यानातील प्रवेश फी (स्थापनेवेळी) पूर्वीप्रमाणे आकारणेत यावी, ३) शाहू उद्यान, शाहूनगर, चिंचवड या उद्यानातील प्रवेश फी मोफत करणेस, ४) स्व.तानाजीराव शितोळे (सरकार) उद्यान सांगवी या उद्यानातील प्रवेश फी ५ रु. आकारणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकुल **-** ७० प्रतिकुल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.भारती फरांदे *:-*** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ५

दिनांक - ९/५/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.स्था/श.अ.तां/१/कावि/१४८/ २०१२, दिनांक २१/०८/२०१२

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.५१, दिनांक २१/०९/२०१२

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.२४२ दि..२२/०३/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील सर्व अनाधिकृत बांधकामास / बेकायदेशीर बांधकामास यापुढे सर्व सेवा सुविधा (उदा.पिण्याचे पाणी, सांडपाण्याची व्यवस्था, रस्ते, दिवाबत्ती इ.) देणे बंद करणेबाबतच्या निर्णयास तसेच यापुढे या महानगरपालिका हद्दीतील बांधकामांना विद्युत जोड देण्यापूर्वी महानगरपालिकेकडील बांधकाम चालू करण्याचा दाखला/महानगरपालिकेच्या संबंधित विभागाकडील ना हरकत दाखला सादर केल्यानंतरच विद्युत जोड देणेबाबत कार्यवाही करणेबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. यांना कळविणेस तसेच ज्या ठिकाणी १००% अनाधिकृत बांधकाम झालेले असेल त्याच ठिकाणी रस्ते व दिवाबत्तीची सोय न करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.प्रतिभा भालेराव** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.श्रीरंग बारणे** - मा.महापौर साहेब, खास याचसंदर्भात बोलायचे आहे. आयुक्तांनी खुलासा केलेला आहे. ज्या-ज्या वेळी अनधिकृत बांधकामाबाबत राज्य शासनाने सभागृहाच्या वतीने ठराव मंजूर करुन अनधिकृत बांधकामे नियमित करण्यासंदर्भात प्रस्ताव पाठवला गेला. इथून पुढे शहरात अनधिकृत बांधकामे होणार नाहीत ही जबाबदारी प्रशासनाने घ्यावी अशा प्रकारचा ठराव मंजूर करावा अशी प्रकारचे प्रयत्न कोणी केले नाहीत. आयुक्त साहेबांनी सभागृहावर ठपका ठेवला होता. पण ही प्राथमिक जबाबदारी लोकप्रतिनिधींची असण्यापेक्षा प्रशासनाची जबाबदारी आहे. बीपीएमसी ॲक्टमध्ये तशा प्रकारचा कायदा आहे. महापालिकेत रिझर्वेशनच्या २५ हजार मिळकती आहेत. व २६ हजार अनधिकृत बांधकामे त्यांचे जागेवर झालेली आहे. शहरात अनधिकृत बांधकामे होऊ नयेत. होत असतील तर त्यावर निर्बंध घालण्याची पूर्ण जबाबदारी प्रशासनाची आहे. असे मी ठामपणे सभागृहात सांगतो. सभागृहाची कुठेतरी दिशाभूल केली जाते. सभागृहाचे ज्येष्ठ सहकारी मा.योगेश बहल यांनी माझ्या नावाचा उल्लेख केला म्हणून प्रामुख्याने याबाबत निदर्शनास आणून देतो. अनधिकृत मिळकतींबाबत नागरीकांनी रस्त्यावर येऊन मोर्चा काढला. केवळ आयुक्तांच्या विरोधात नव्हते. असा उल्लेख सभागृहात आला. राज्य शासनाने या संबंधित अनधिकृत मिळकतींबाबत निर्णय घ्यावा या दृष्टीकोणातून दि.२९ नोव्हेंबर २०११ रोजी नागरीकांनी शहरात मोठ्या प्रमाणात मोर्चा काढला होता. २० फेब्रुवारी २०१२ मध्ये निवडणूक झाली. त्या अगोदर राज्यशासनाने विधीमंडळात कायदा केला. आयुक्तांनी आत्ता उत्तरात सांगितले, १३ मार्च २०१२ रोजी विधी मंडळाने कायदा केला. त्यावेळी शहरातील तीनही आमदार विधी मंडळात उपस्थित होते. मा.महापौर साहेब, ज्यावेळी कायदा केला, त्यावेळी ज्या पक्षाचे आपण नेतृत्व करता, त्या राष्ट्रवादी पक्षाच्या जाहीरनाम्यात निवडणूका झाल्या त्यावेळी टाकले होते की, १,३५,००० अनधिकृत मिळकती नियमित करु. हे आपल्या निदर्शनास आणून दयायचे आहे. लोकप्रतिनिधी म्हणून सहकारी सदस्य असतील तर डायरेक्ट जाऊन कोणी नागरीक अनधिकृत बांधकाम करत असेल तर तो असे करु शकत नाही. लोकप्रतिनिधींना सुद्धा त्यांचा जबाबदारी असतेच. महापालिका स्तरावर प्रशासनाची याच्यापेक्षा मोठी जबाबदारी आहे. त्यापासून प्रशासन कुठेतरी बाजूला गेले आहे का? राज्य शासनाने व न्यायालयाने तशाप्रकारचे आदेश दिल्यानंतर ही कार्यवाही झाली. १८ महिन्यांच्या कालावधीत शहरातील कार्यकर्ता, नागरीक यांच्या भावनेशी खेळण्याचा प्रकार झाला होता. माझ्या नावाचा उल्लेख केला म्हणून मला बोलायचे होते, म्हणणे मांडायचे होते. धन्यवाद.

**मा.दत्ता साने** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, पिंपरी चिंचवड हद्दीतील अनाधिकृत बांधकामासंदर्भात हा विषय आलेला आहे. हा विषय खरेतर आयुक्तांनी आपल्या अधिकारांत मंजूर पण केला आहे. त्यामुळे या विषयावर जास्त ऊहापोह करण्यात तथ्य दिसत नाही. माझे एकच म्हणणे आहे, ज्यावेळी आमच्या भागात साधारणतः एका गल्लीत २० फुटाच्या रस्त्यासाठी ५०/५० घरे असतील. आपल्या म्हणण्यानुसार जर अशी २४/२५ अनाधिकृत घरे असतील तर त्या घरांची ड्रेनेज लाईन तोडली तर आजूबाजूच्या गल्ल्यांत त्याचा येणारा जो नैसर्गिक प्रवाह आहे तो जाऊ शकत नाही. याला कुठेतरी कंट्रोल करावा लागणार आहे. अशा माणसांत १० मध्ये ५ जणांची कनेक्शन्स तोडली गेलीतर. त्यांच्या सुविधा त्यांना दयाव्याच लागणार आहेत. हे आपल्या कायद्यात नसले तरी महाराष्ट्र शासनाचे नियम आहेत. अन्न, वस्त्र, निवारा या माणसाच्या मुलभूत गरजांपासून या माणसांना वंचित करत असालतर यापेक्षा निंदनीय बाब दुसरी असणार नाही. जर त्या माणसाच्या ड्रेनेज लाईन तोडल्यातर जो मैला रस्त्यावर येईल, हे आरोग्याला विघातक ठरत असेल तर याला जबाबदार कोण असणार आहे? यातून गल्यागल्यांत त्या परिसरातून दुर्गंधी पसरेल. याला अनेक कारणे आहेत. प्राधिकरण, एमआयडीसी व इतर माध्यमांतून सर्वसामान्यांना घरे देत होते, हे ते विसरले आहेत. प्राधिकरणात बघितले तर बिल्डर लॉबी फॉर्मात आली आहे. गेले १५ वर्षांत सर्वसामान्य नागरीकांसाठी जनतेसाठी कोणतीही स्किम जाहीर केलेली नाही. एमआयडीसी इथे सुद्धा हीच परिस्थीती आहे. आपल्याकडून माहिती हवी आहे. घर बांधून देणे हा महापालिकेचा अधिकार आहे का? आपण ६,००० घरे बांधली आहेत. अशा माध्यमातून हा प्रकार चालू केलेला आहे. आपल्याला विनंती आहे, हा विषय आयुक्तांनी मंजूर पण केलेला आहे. सध्या कारवाई पण चालू आहे. मा.योगेश बहल यांनी सविस्तर सांगितले आहे. आमच्या भागात १० ते २० घरांत एक अनाधिकृत असेल तर कनेक्शन तोडल्यावर येणा-या प्रसंगाला आपल्यालाच सामोरे जावे लागणार आहे. हे तोडायचे प्रकार थांबवावेत. बी ३ सोडून बाकींवर कारवाई करायची असेलतर ते करावे अशी विनंती आहे. माझ्या गावातील एक माणूस कारगिलच्या युद्धात पाय पूर्ण फ्रॅक्चर होऊन अपंग झाला आहे. चिखली गावात भरवस्तीत पूर्ण घर बांधलेले आहे. ६/६ महिन्यांतून त्याला जो निधी मिळाला, त्यातून त्याने हे घर बांधलेले आहे. त्याच्या घराचे प्लॅस्टर चालू असताना अधिका-यांनी फोटो काढला. यासारखी निंदनीय बाब कोणतीही नाही. तो मनुष्य दाखवेल, त्याचे घर सुद्धा दाखवेल. याच्यापेक्षा चुकीचा प्रसंग कधीच होणार नाही. आपल्याला विनंती

आहे, त्या माणसाला व्यवस्थित चेक करा. त्याच्या पायाला शंभर ते दीडशे टाके पडले आहेत. अशा अवस्थेत माझे घर वाचवा म्हणून तो रडतो आहे. कारगिलमध्ये मदत मिळाली पण इथे घर वाचवण्यासाठी रडावे लागते आहे, ही अतिशय गांभीर्याची गोष्ट आहे. अशा माणसाला न्याय देणार नसाल तर याच्यापेक्षा दुसरे काय? यात लक्ष घालावे. कनेक्शन तोडायची कारवाई अधिका-यांनी चालू केलेली आहे. बी३ सोडून बाकीच्यांवर कारवाई करावी अशी विनंती करतो.

**मा.शांताराम भालेकर** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, या ठिकाणी अनधिकृत घरे, नळ तोडणे, ड्रेनेजलाईन या गोष्टीला आपले अधिकारी जबाबदार आहे. आपल्या अधिका-यांनी योग्य रितीने काम केले असते तर ही वेळ आली नसती व ही परिस्थिती उदभवली नसती. खरेतर मा.आयुक्त हे काम करीत असून आपले संबंधित अधिकारी किती खूष आहेत. नेतृत्व करत असताना पाठीमागे वळून पाहीले तर कार्यकर्त्यांना सांगितले, योग्य काय अयोग्य काय हे पाहत असतात. अधिकारी आपलेवर किती खूष किंवा नाराज आहेत याचा सामान्य कार्यकर्ता या नात्याने खोलात जाऊन अभ्यास करावा, चिंतन करावे. खरेतर हे अयोग्य आहे. संबंधित अधिका-यांना वेळच्या वेळी पाठबळ दिले असते तर माथ्यावर खापर फोडले जाते. पदाधिकारी व अधिकारी हे रथाची दोन चाके आहेत. सन्मानाने काम करणे गरजेचे आहे. मुळात हा विषय अजेंडावर का आणला? तो आणायचे कारण काय आहे? भविष्यात मोठमोठ्या अडचणी आहेत. माझ्या वॉर्डात तर रेडझोनची तलवार टांगती आहे. बायकांचे दागिने गहाण टाकून घर बांधले आहे. अतिशय बेकार परिस्थिती आहे. उल्हासनगरच्या धर्तीवर कोणाच्या तरी माध्यमातून प्रॅक्टीकल भूमिका घेऊन घरातले कोणी चुकले तर आपण त्याला फाशीची सजा देत नाही. घर पाडतो म्हणजे त्याला फाशीच झाल्यासारखे आहे. हा विषय मार्गी लावावा. आपले पुन्हा एकदा धन्यवाद मानतो.

**मा.शमीम पठाण** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, ब-याच महिन्यांपासून हा विषय रेंगाळतोय. अधिका-यांनी आपल्या अधिकारांत निर्णय घेतला. सन्मा सदस्य खूप जास्त बोलले पण स्पष्ट बोलले. हा अधिकार आम्हाला कोणी दिला? मी सर्व सन्मा.सदस्यांना विचारते, कोणी एखाद्या सभासदाने आपल्या लेटरहेडवर कोणाला शिफारसपत्र दिले आहे का, यांनी यांनी घर बांधले आहे. अनधिकृतला अधिकृत अशी नोंद द्यावी. एकाही सदस्याने कोणत्याही अधिका-याला कोणत्याही प्रभागांत

कोणतेही पत्र दिलेले नाही. फोनसुद्धा केलेला नसेल. ही वेळच येत नाही. आपले अधिकारी, मिटरनिरीक्षक, प्लंबर जे मेन पाईपला होल पाडतात. ते परस्पर ही सगळी कामे करतात. जो बोंब करतो. जे काम प्रशासनाकडून केले जाते ते काम आमच्याकडून का वदवून घेता. आमच्या खांद्यावर बंदूक ठेवून नेम का धरता. तुमचे अधिकारी, कर्मचारी ही कामे करतात. त्यांना तुम्ही तशा सूचना दिल्या आहेत का? तसे सर्क्यूलर त्यांच्यापर्यंत पोचले आहे का? ज्यावेळी विषय आणला त्यावेळी हा विषय आल्यानंतर आमच्या प्रभागात त्यांना सांगितले त्या त्या ठिकाणी अनधिकृत नळ कनेक्शन घेतलेले होते. कोणत्याही प्रकारचा अर्ज न करता परस्पर कनेक्शन घेतलेले आहेत. मी तिथे सांगितले नंतर मला डावलून ८/१० दिवसांनी कळाले की, त्या व्यक्तीचे कनेक्शन ऑथराईज झालेले आहे. म्हणजे सगळ्या प्रभागांत वर्षभरात तुमच्या अधिका-यांना माहिती नाही का? तुम्ही आल्यानंतर लोकांनीच अनधिकृत बांधकामांबाबतीत मोहिम सुरु केलेली आहे. मी त्यांना विचारले, तक्रार केली. कोणतीही परमिशन न घेता अनधिकृत नळ कनेक्शन घेतले ते कसे काय ऑथराईज केले? अभय योजनेखाली त्याला करुन देतो. अभय योजनेत जो बसतो, त्याचे तुमच्या आदेशानुसार कनेक्शन तोडतात. काय चालले आहे? अभय योजना तुम्हीच राबवताय व तोडातोडीची प्रकरणे तुम्हीच करताय? आपल्या हाताखालील कर्मचा-यांपासून अधिका-यांपर्यंत काय चालले आहे? याचा तुम्ही आधी अभ्यास करुन माहिती घ्या. प्रत्येक प्रभागांत किती अधिकृत नोंदी कनेक्शन देण्यासाठी स्टॅम्प पेपरवर घेतले आहे. कनेक्टीव्हीटी करुन घेतली आहे. हा आमचा, सर्व सन्मा.सदस्यांचा अधिकार नाही. प्लबंर जो काम करतो हे काम आम्ही कशाला करायचे? आपले अधिकारी/कर्मचा-यांनी सांभाळावे. आमच्यापर्यंत विषय आणू नका. हे कळकळीचे आवाहन करते. तुमच्या अधिकारांत जे काही ते तुम्ही करताय. काहीबाबतीत तुम्हाला सहकार्याची भूमिका घ्यावी लागेल. आपण आपल्यावर सगळ्याच बाबतीत कंट्रोल करावा. प्रशासनात अतिशय बारकाईने लक्ष घातले. मागे सगळा गोंधळ चालला आहे. तुमच्या आदेशाचे पालन तुमचे अधिकारी कर्मचारी करत नाहीत हे आमच्याकडून करुन घेऊ नका.

**मा.तानाजी खाडे**-मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, हा ड्रेनेज लाईन, नळ जोडीचा विषय आहे. विनंती आहे, पिंपरी चिंचवड महापालिकेच्या हद्दीतील सर्व अनधिकृत बांधकामे मार्च २०१२ नंतरची बांधकामे असा विषय असेल तर आजपर्यंत झालेली सगळी बांधकामे व त्यांचे ड्रेनेज लाईन तोडायचा विषय असेल तर याला माझा

विरोध आहे. आमच्याकडे रेड झोन झाला तर सेक्टर २२ मध्ये केलेली बांधकामे, त्यांना दिलेल्या सोईसुविधा बंद कराव्या लागतील. आपला विषय आहे की, महापालिका हद्दीतील सर्व अनधिकृत बांधकामे, बेकायदेशीर बांधकामे यांना सर्व सेवासुविधा देण्यात येणार नाहीत. माझ्या भागातली मेंटेनन्सची कामे बंद आहेत. सेक्टर २२ रेड झोन आहे म्हणून शाळेची भिंत बांधत नाहीत. रुपीनगरमधील पाईपलाईन घरोघरी जाऊन तोडण्यापेक्षा पाईपलाईनच बंद करा. म्हणजे लोकांना पाणी मिळणार नाही. चुकीचा विषय आहे. मार्च २०१२ नंतरच्या बांधकामांचा विषय असला तरी विषयात दुरुस्ती करुन घ्या.

**मा.गोरक्ष लोखंडे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, काही वेळापूर्वी वाटले सगळे नागरीक शास्त्राच्या तासाला बसले आहेत का काय**?** महानगरपालिका ही नागरी सुविधा देणार एक संस्था आहे. एका वर्षात ५०० कोटींच्या एफ.डी. करुन टाकल्या म्हणजे फार मोठे काम केले असे नाही. महापालिका म्हणजे पतसंस्था चालवत नाही की व्याजाचा धंदा करत नाही. नागरीकांच्या प्रश्नासाठी नागरीकांना सेवासुविधा पुरवणारी एक संस्था आहे. देशाच्या संविधानाकडून मान्यताप्राप्त अशी संस्था आहे. बी३ मध्ये येणा-या घरांच्या सुविधा काढून घेण्याचा निर्णय घेत आहोत. एखाद्याचे नळ कनेक्शन तोडले तर तो दुस-याच्या घरात जाऊन पाणी भरेल. त्याची ड्रेनेज लाईन कट केलीतर त्याच्या बायकापोरांनी कुठे जाऊन बसायचे**?** फंडामेंटल राईटस् चे व्हायोलेशन करतो आहोत. नागरीकांना सेवासुविधांपासून वंचित करतो आहोत. ३१ मार्च २०१२ पर्यंत काही लोकांनी पटापट घरे बांधून घेतली. गरीब माणूस हळूहळू त्याचे घर बांधतो. गुगलवरुन इमेज घ्या. घर कधी बांधायला सुरुवात केली, कधी पूर्ण झाले. विधी मंडळाने कायदा केला. कोर्टाच्या आदेशानाच पालन करायचे आहे. राज्य शासनाच्या डायरेक्शन्स चे पालन करायचे आहे. हजारो कायदे होतात. तुम्ही स्वतःहून अप्लाय करु शकता. कायद्याची बाजू घेऊन प्रत्येक वेळी सांगता. त्यानुसार त्याअनुषंगाने कोर्टाच्या ऑर्डरचे पालन तुम्ही करत नाही. त्यात ४ पानांच्या ऑर्डरमध्ये स्पष्ट लिहिले आहे, you should take proper action. तुम्ही त्याप्रमाणे वागलात तर कदाचित शहरातील ५०**%** बांधकामे ऑथराईज होतील. कोर्टाचे स्पष्ट निर्देश आहेत. तुम्ही त्याच्या ऑर्डरचे ख-या अर्थाने डॉटटूडॉट पालन केलेतर शहरातील गरीब माणूस बेघर होण्यापासून वाचू शकतो. ड्रेनेज कनेक्शन, नळ कनेक्शन तोडणार असल्याचे सांगता. महापालिका ही

नागरी सुविधा देणारी संस्था असल्यामुळे असे करता येणार नाही. या गोष्टी थांबल्या पाहीजेत.

**मा.सुरेश म्हेत्रे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, माणुसकीच्या दृष्टीकोणातून अतिशय चुकीचा विषय आहे. पाणीपुरवठा व नळ कनेक्शन सुविधा अतिशय महत्वाच्या आहेत. एकवेळ पाणी शेजारच्यांकडून घेता येते. रस्त्यात अतिक्रमण करतील अशांसाठी बांधकाम योजना राबवाव्या लागतील. अशा गोष्टी न करणे चांगले आहे. सुप्रिम कोर्टाचे आदेश आहेत, अशा अनधिकृत बिल्डींग पाडण्याआधी रहिवाश्यांना ५ महिन्यांची मुदत द्यावी. त्याप्रमाणे त्यांचे पुनर्वसन करुन घ्यावे. असा ठराव महापालिका सभेत करावा अशी सर्वांना विनंती आहे. तो अधिकृत घर घेऊ शकेल. एवढे मात्र होईल. त्याला ३ वर्षांची मुदत द्यावी अशी कळकळीची विनंती आहे. चौथ्या विषयाबाबत सूचना करतो. आयुक्त लेवलचे काही सिव्हील इंजिनिअर असावेत. या अधिका-यांमार्फत मोजणी, एन.ए. करुन द्यावे. १०६ पदे निर्माण करण्यापेक्षा ५० पदे निर्माण करावीत. अशा गाईडलाईन्स द्याव्यात. जेणेकरुन लोक अधिकृत घरे बांधतील. पोलिस यंत्रणेचा वेळ वाया घालवण्यापेक्षा असे घडू नये म्हणून प्रयत्न करावेत. टीम तयार करावी. जेणेकरुन अर्ध्या गुंठ्यात सुद्धा घर बांधता येईल. किती प्रपोजल आले तरी काहीच झाले नाही. याचा अर्थ प्रत्येक प्रभागांत अशा बैठका घेत गेल्या पाहीजेत. ते घर बांधण्याबाबतच्या नियमावली, गाईडलाईन्स देतील. त्यामुळे नियमांत घर बांधायला अतिशय चांगली मदत होईल अशी सूचना मांडतो.

**मा.झामाबाई बारणे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, अनधिकृत बांधकाम, ड्रेनेज लाईन्स, नळ कनेक्शन्स तोडण्याबाबतचा विषय सगळ्यांच्या चर्चेमध्ये चालू आहे. हा सर्वांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. नळ कनेक्शन तोडलेतरी दुस-याच्या घरी जाऊन तो कुठेतरी पाण्याची सोय करतो. अनधिकृत बांधकामांचा विषय आता सगळ्यांनाच माहिती झालेला आहे. शहरात अनेक समस्या आहेत. रेड झोनचा प्रश्न असेल. अशा ठिकाणी बांधकामे झाली आहेत. थेरगाव परिसरात हाच प्रश्न आहे. प्राधिकरणात लोकांनी घाईघाईने बांधकामे केलेली होती. त्यावेळी सुद्धा पक्षनेत्यांनी सांगितले होते, याची कारणे काय आहेत. प्राधिकरणात वेदपाठक नावाचा कार्यकारी अभियंता अनधिकृत बांधकामांना प्रोत्साहन देणारी व्यक्ती होती. ज्याठिकाणी बांधकाम चालू असेल तिथे जाऊन जेवढी रक्कम मागेल तेवढी दिली तर ती

बांधकामे कारवाईपासून वाचत होती. अशा पद्धतीने प्राधिकरण भागात अनेक बांधकामे झाली आहेत. तिथे बँकेचे लोन मिळत नव्हते. पर्याय नव्हता म्हणून लोकांनी बायकांचे दागिने मोडले आहेत. कर्जबाजारी झाले आहेत. त्या लोकांनी सुद्धा त्यावेळी डेव्हलपमेंट चार्ज भरला होता. स्क्वे. फूटाला ४,०००/- इतकी रक्कम भरली होती. नळ कनेक्शन घेतले होते. एका एका रुमचे बांधकाम केले असेल. घरगुती अडचणीमुळे छोटी छोटी बांधकामे केलेली होती. २५ वर्षांपासून आपल्याकडे पाणीपट्‌टी भरतात, प्रॉपर्टी टॅक्स भरतात, लाईटबील भरत आले आहेत. लोकांकडे पुरावे आहेत, फाईल तयार आहे. तरी तुमचे लोक तिथे जाऊन नळ कनेक्शन तोडतात. या नागरीकांची काय चूक आहे? लोकांच्या मनात भिती आहे. आम्ही खाली राहतो व वरील १/१ रुम बांधली आणि तिथे दुसरी व्यक्ती रहात असेल तर कसे काय करणार? ड्रेनेज लाईन, पाण्याची लाईन तोडली तर दोघांचे एकच कनेक्शन असणार. त्याच्यासाठी काय करणार आहात? या कारवाईला ज्या-ज्या ठिकाणी सुरुवात केली आहे, प्रत्येक ठिकाणी हेच काम चालू आहे. या लोकांनी २०१०-११ ची पाणीपट्‌टी भरली आहे. हजारो रुपयांचे बील आलेले होते. ही काय पद्धत आहे? ड प्रभागातील अधिकारी असतील तर त्यांनी माहिती द्यावी. लोक अक्षरशः रडत आहेत. सर्वांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. सर्वांना न्याय द्यावा. मा.दत्ता साने यांना जिव्हाळ्याचा प्रश्न वाटतो म्हणून ते कळकळीने बोलले आहेत. सर्व सदस्यांच्या भावनेशी मी सुद्धा सहमत आहे.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, यात कनेक्शन तोडा म्हणून शासनाचे आदेश आहेत का?

**मा.आयुक्त** - मा.महापौर साहेब, सर्व उपस्थित सन्मा.सदस्य, इथे ४/५ मुद्दे उपस्थित झाले आहेत. अनधिकृत बांधकामांना प्रशासनच जबाबदार आहे अशी भूमिका मांडली आहे. यापूर्वी १० वर्षांपूर्वी कारवाई झाली असती तर आज इतकी कारवाई करावी लागली असती का? प्रशासनाबरोबर सभागृह सुद्धा तितकेच जबाबदार आहे. याची कायदेशीर बाजू आधी मांडतो. फेब्रुवारी २००३ ची हायकोर्टाची ऑर्डर पाहीलीतर रिस्पाँडण्ट क्र.२ कमिशनर असून त्यात म्हटले होते, director of corporation is directed to take proper decision. महाराष्ट्र अधिनियम सेक्शन ४ मध्ये म्हटले आहे, अधिनियमाच्या तरतूदींची अंमलबजावणी करावी लागेल. महापालिकेकडे अधिकार सोपवण्यात आले होते. क दर्जाच्या महापालिकेच्या

आयुक्तांनी कायद्याची अंमलबजावणी करावी. महापालिकेकडे पहिल्यांदा जबाबदारी टाकली नाही तर ही जबाबदारी स्थायी समितीनंतर आयुक्तांकडे टाकली आहे. पुढील जबाबदारी सदस्यांची असेल. प्रभागांतून निवडून आलेले पालिका सदस्यांना असे म्हणता येणार नाही की ही फक्त प्रशासनाची जबाबदारी आहे. ही प्रशासन व पालिका सदस्य यांची संयुक्त जबाबदारी आहे. ही जबाबदारी गांभिर्याने पार पाडणे आवश्यक आहे. ज्यावेळी नागरीक मोठ्या प्रमाणात प्रभावित होणार होते, त्यावेळी सर्वसंमतीने ठराव केला तर तो व्यापक व प्रमाणिकृत होईल. ६ महिन्यांचा कालावधी झालातर त्यात प्रकरण २ मधील नियम सादर केले. अधिका-यांना दिलेल्या सूचनेनुसार त्यांनी ३१ मार्च २०१२ नंतरच्या सेवासुविधा खंडीत केलेल्या आहेत. एक सूचना मांडण्यात आली होती की, ज्यांनी अर्धे बांधकाम केले, ३१ मार्च २०१२ नंतरही बांधकाम चालू होते. त्याबाबत सहानुभूती दाखवली पाहीजे. दि.२८ जून २०१२ रोजी पहिले बांधकाम पाडण्यात आले होते. हे बांधकाम केशवनगरमधले पाडण्यात आले होते. ३ फेब्रुवारी २०११ ला उच्च न्यायालयाने केलेल्या निर्देशांनंतर १६ महिन्यांनी कारवाई झालेली आहे. कायद्याचे जाणकार जाणतात, कायदा आहे तर त्याचा आग्रह धरावा लागतो. दि.३ फेब्रुवारी २०११ ला कोर्टाचा आदेश आला, त्यावेळी मा.महापालिका सभेत व्यापक चर्चा झाली होती. ऊल्हासनगरच्या धर्तीवर नियमानुकूल करायची मागणी केली होती. त्याप्रमाणे जवळपास १५ महिन्यांनी पहिली कारवाई झाली. त्यात ज्यांची बांधकामे २/४ महिन्यांत पूर्ण झालेली होती, उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे, कायद्याप्रमाणे कारवाई करतोय. म्हणून असे रिलॅक्सेशन देता येणार आहे. संत तुकारामनगरमधील बांधकामे, कारगिलच्या युद्धातील निवृत्त सोल्जरचा विषय, मला त्याबद्दल माहिती आहे. परंतू कायदेशीर भूमिका बघता काहीही करता येणार नाही. ही बाबही समजून घ्यावी. २५ वर्षांपासून लोक इथे राहतात. त्यांनी †डीशनल मजले बांधले आहेत. विस्थापित होण्यासाठी ५ महिन्यांची मुदत दिली होती. सुप्रिम कोर्टाने कडक भूमिका घेतली होती. लोकसत्तामध्ये स्टेटमेंट होते की, कोणालाही अनधिकृत बांधकाम करायचा अधिकार नाही. हायकोर्टाच्या ऑर्डरप्रमाणे अनधिकृत इमारतींच्या सोयीसुविधा खंडीत करायचा अधिकार त्याच दृष्टीकोणातून घेतला होता. तसे प्रस्तावित केले होते. †डमिनिस्ट्रेटीव्ह ऑर्डर ३१ मार्च २०१२ नंतरची काढली होती. असा विषय मा.महापौरांसमोर, सभागृहासमोर पहिल्यांदा आला होता. प्रशासनाचा विषय ९० दिवसांत मान्य केला नाही. आपल्याकडे मान्य झाल्यावर तो शासनाकडे पाठवण्यात येईल. तो आपल्या अवलोकनार्थ इथे कंटिन्यू झाला आहे. दुसरा मुद्दा असा होता

की, कोर्टाच्या ऑर्डरचे पालन व्यवस्थित केले गेले नाही असा मुद्दा मांडला गेला. प्रत्येक प्रकाराने नोटीसा दिल्या गेल्या आहेत. किती नोटीसा दिल्या गेल्या याची टेन्टेटीव्ह आकडेवारी उच्च न्यायालयात दाखल केली आहे. कलम २६० नुसार नोटीस देतो. संबंधिताला त्याचे म्हणणे मांडायची मुदत देतो. अपवादात्मक परिस्थितीत तथ्य आढळल्यास त्यांच्यावरील कारवाई थांबवली आहे. कागदपत्रे दाखल केल्यानंतर कारवाई थांबवली आहे. नुसतेच कायद्याचे पालन करण्याबाबत आयुक्तांकडे बोट दाखवतात. प्रत्यक्षात अनधिकृत बांधकामे होत असतील तर अनेक ठिकाणांहून तक्रारी येतात. अनेक सन्माननियांनी तक्रारी केल्या होत्या की, त्यांच्या भागात पुरेश्या दाबाने पाणी येत नाही. याचे कारण म्हणजे मोठ्या प्रमाणात अनधिकृत नळ कनेक्शन घेतली आहेत. मी नावानिशी सभागृहात सांगायला तयार आहे. अनेक ठिकाणी ४ ते ५ एफ.एस.आय. चे बांधकाम केले जाते. आणि पार्किंगची सुविधा केली जात नाही. सगळ्या गाड्या रस्त्यांवर लागतात. लोकांना यायला-जायला त्रास होतो. रात्री सुद्धा रस्ता सुरक्षित रहात नाही. अपघात होतात. सर्वसामान्य टॅक्स पेअर रितसर फ्लॅट घेतो. वाडी/वस्तीतले लोक यांचे पाणी चोरुन घेतात. यांचा रस्ता अडवला जातो. सांडपाणी अडवले जाते. कायद्याचे पालन करायचा कुठेतरी विचार केलाच पाहीजे. त्याचबरोबर इन्फ्रास्ट्रक्चरचा योग्य वापर करताना सिटीचे डिजाईन केले गेले पाहीजे. एवढ्या मोठ्या प्रमाणात शहरात गुंतवणूक केली जात असेल तर रस्ते, पाणी, सांडपाण्याची व्यवस्था योग्य दिली गेली पाहीजे. आज या शहराला केंद्र सरकारचा बेस्ट सिटी पुरस्कार मिळाला आहे. परंतू हेच शहर १० वर्षांत उपयुक्त राहणार नाही. जर इथे पिण्याचे पाणी व्यवस्थित मिळत नसेल तर लोकांचे स्थलांतर व्हायला लागेल. भविष्याचा विचार करता ही कठोर भूमिका घ्यावी लागणार आहे. हे आपण कृपया समजून घ्यावे.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, मुळात शंभर टक्के अनधिकृत बांधकामे झालेली असलीतरी दिवाबत्ती, नळ कनेक्शन, ड्रेनेज या सोयी न करण्याबाबतचा विषय आहे. तुम्हीच प्रमुख नाहीत. जे झालेले आहे त्याला कोण जबाबदार आहे असे मला वाटत नाही. इथे काही सदस्यांनी सांगितले, आम्ही बांधकाम करायला मदत केली होती. यांना दिवाबत्तीची सोय देऊ नका असे आम्ही सांगितले नाही. एकाही सदस्याने कोणाला सांगितले नाही. आमचे पत्र घ्या, अनधिकृत बांधकामे करा. हे मात्र विसरायचे नाही की, इथे सुविधा देऊ नका. असे आम्ही कुठेतरी म्हटले का? बांधकाम करा असे जरी नक्की म्हटले होते तरी, तुम्ही

इथे सुविधा देऊ नका असे आम्ही म्हटलेच नाही. अनधिकृत काम चालू होते तर चालू द्या. मुंबईला मिटींगमध्ये म्हटले होते, काही लोकांचे घरांच्या दुरुस्त्या करणे चालले होते. काही नगरसेवक याचसाठी भयभीत झाले आहेत. सरळ सरळ पाडणार आहात का? ज्यावेळी नोंदणी बंद झाली, त्यावेळी काही लोकांच्या नोंदी केल्या गेल्या नाहीत. हा विषय ४ महिने का थांबला? सगळे हेच म्हणत होते, ज्यांची नोंदणी पूर्ण झाली नाही, त्यांचे करुन घेणार आहात का? स्वतःच्या ताब्यातल्या जागेच्या नोंदणीसाठी अर्ज केला, त्यांचे झाले नाही. त्यांची सुद्धा नोंदणी बंद करणार आहात का? ज्यावेळी अर्ज केला,फोटो काढल्यानंतर बांधकाम पूर्ण झाले. त्याची नोंदणी पूर्ण झाली पाहीजे होती. तुमचीपण ५०% कामे सोप्पी होतील. कितीतरी नगरसेवक स्वतःहून सांगणार होते, माझ्या भागात अनधिकृत बांधकाम चालू होते. कितीतरी सदस्यांनी सांगितले,त्यावेळी कारवाई होत नाही. ५० लाख खर्च करुन हॉकर झोन बांधा. ८ लोकांना अनाथ,अपंग,मतिमंद यांना उदरनिर्वाहासाठी गाळे देण्यात यावेत. प्रभाग अधिका-यांनी त्या फाईलचे पुढे काय केले? ५० लाखांच्या हॉकर झोनमध्ये लोक अनधिकृतपणे वस्ती करुन आहेत. याला जबाबदार कोण? तुम्हाला सांगून सुद्धा कारवाई होत नाही. त्यांना पाणी देऊ नका, लाईट देऊ नका. पूर्णानगरमधील महापालिकेच्या ताब्यात आलेल्या प्लॉटवर ८ दिवसांत ६ झोपड्या पडल्या आहेत. त्या भागातल्या लोकांनी काय करायचे? सफाई कर्मचारी, जे.ई., त्यांचे इतर कर्मचारी याला जबाबदार नाहीत का? मी बोलले तरी राहीलेल्या लोकांचे कोणाशी तरी लागेबांधे असतील. मंगलाताईंनी सभागृहात सांगितले म्हणून त्यांच्यावर कारवाई झाली आहे का. तुम्ही मला सांगा, दोनदा/तीनदा सांगितले तरी कारवाई होत नाही. वीज कनेक्शन तोडा, ड्रेनेज लाईन तोडा, पाण्याचे कनेक्शन तोडा. याला आम्ही जबाबदार असल्याचे सांगता. आम्ही मात्र भितीमध्ये रहायचे. तुम्ही अशा गोष्टी करण्यासाठी आमची हरकत नाही. असे विषय सभागृहात येणे योग्य नाही. १/२ गुंठ्यांसाठी नियमावली केली पाहीजे. मोठमोठ्या सोसायटींत १०० घरे असतात. १/२ लोकांची अनधिकृत घरे असतील, कनेक्शन कट केलेतर आरोग्याच्या दृष्टीने मोठी वाईट परिस्थिती निर्माण होणार आहे. तिथे सुद्धा विचारपूर्वक गोष्टी केल्या पाहीजेत. याला आम्ही जबाबदार नाही. तुम्हीही अजिबात जबाबदार नाही. म्हणून हा विषय दप्तरी दाखल करावा अशी विनंती करते.

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, प्रथमतः आयुक्त साहेबांनी सभागृहावर जो आरोप केला तो खोडून काढतो. रद्दड अधिकारी इथे भरलेले आहेत.

एक श्रीकर हुशार असले तरी सर्व घाण दूर करु शकत नाही. तुम्हाला उत्तम उदाहरण द्यायचे झालेतर टाऊन प्लॅनिंगचे घ्या. त्यांच्याकडून डी.पी. प्लॅन बनवला जातो. आत्ता तो हातात घेऊन बघा. शहरात हॉकर झोन, रिक्षा स्टँडसाठी, कमर्शिअल पार्किंगसाठी जागा ठेवली आहे का? लोक चूका करतात. पण प्रशासन काय करते? विकास करतोय असे म्हणतो. तुमचे सगळे अधिकारी पैसे घेऊन काम करतात. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत १९९५ मध्ये डी.पी. मंजूर आहे तरी कायद्याप्रमाणे काम करायची धमक दाखवा. आमचे चॅलेंज स्विकारून दाखवा. पिंपरी चिंचवडला रेड लाईन, ब्ल्यू लाईन आहे. मग पुण्याला का नाही? काम कसे करणार? आयुक्त म्हणून काम करुन दाखवा. तुम्ही येण्याआधी नवीन गावांचा डेव्हलपमेंट प्लॅन मंजूर झाला. ज्येष्ठ नगरसेवक चर्चा करतात. इतका आनंदी कारभार चालला आहे. टाऊन प्लॅनिंगमध्ये लोकांचे हिअरिंग घेतले. ब्ल्यू लाईनमध्ये आरक्षण टाकले. नंतर प्रशासनाच्या लक्षात आले की, डी.पी. प्लॅनचे डिक्लरेशन झालेले नाही. राज्य शासनाच्या लक्षात आले की, ब्ल्यू लाईनमध्ये शाळा, दवाखान्यांचे आरक्षण टाकले आहे. आयएएस असलेले लोक अशी बोंब करु शकतात तर बाकी चौथी, आठवी पास लोकांना काय दोष देताय? You should give respect to the Corporators. आम्ही एक्झिक्युटीव्ह आहोत. तुम्ही आयुक्त म्हणून इथे आलेला आहात. मी शनिवारवाडा विकून टाकणार आहे का? हे पाहणे ही प्रशासनाची पहिली जबाबदारी आहे. तुम्ही विषय ठेवला नाही. या दिरंगाईबद्दल आमची चूक आहे का? परंतू प्रशासनाकडून अंमलबजावणी करायचा अधिकार तुमचा आहे, अधिकारी तुमचे आहेत. कट ऑफ डेट म्हटली तरी तुम्ही तसे वागलात का? इथून मागील आयुक्त असे वागले असले तरी त्यात त्यांचे नुकसान झालेले नाही. तुम्ही महापालिकेत विषय ठेवला नाही. विषयाच्या मंजुरीची सुद्धा मर्यादा आहे. We cannot implement. लोकांनी अनधिकृत घरे बांधली. तुम्हाला इन्फॉर्म करुन सुद्धा तुमच्या लोकांनी कारवाई केली नाही. अशी १०० उदाहरणे तुम्हाला देऊ का? तुमचे विषय अजेंडावर वाचले तेव्हा १४/८/१२ चे आयुक्त साहेबांचे परिपत्रक होते, राज्याचा आदेश होता का, कोर्टाचा आदेश होता का? २४ मे ला तुम्ही रुजू झालात. ऑगस्टमध्ये पत्र आले. २१/९/१२ला मा.विधी समितीसमोर विषय ठेवला. तेव्हा तो आमच्या समोर आला. ४/५ महिने विषय समितीसमोर ठेवण्यात गेले. आधीच्या आयुक्तांच्या वेळी कटऑफ डेट होती. तेव्हा अधिकारी का थांबले होते? अतिक्रमण विभाग काय करत होता? १० वर्षांचे मिनिटस् काढा. त्यात आम्ही सारखेच बोंबलतोय, २४ तास स्कॉड करा. या बांधकामांना तुम्ही जबाबदार आहात, आम्ही

नाही. तुम्ही खुशाल सांगताय, corporator is responsible. १० वर्षांचे मिनिटस् वाचा. या २४ मे ला तुम्हाला या महापालिकेत येऊन वर्ष होणार आहे. तुम्ही करु शकलात का? १ वर्षात जी घाण झाली ती आमच्यामुळे झालेली नाही, तुमच्यामुळे झाली आहे. एखाद्याने अध्यादेश काढण्याआधी, ३१ मार्च २०१२ त्या कोर्टाच्या आदेशापूर्वी बांधकाम सुरु केलेतरी त्याला बांधकाम पूर्ण करायला ८ महिने तरी लागतात. दरम्यान अधिका-यांनी फोटो काढला तरी तुमच्या लोकांना फोटो काढल्यानंतर त्या मनुष्याकडे पाणी कनेक्शन येते, वीज पुरवठा येतो. तो कसा आला? तेव्हा त्याने नगरसेवकांना माहिती दिली होती का? सांगितले होते का? मा.पठाणताईंनी मुद्दा मांडला होता, सर्व सोयींनीयुक्त घरात राहणा-यांचे कनेक्शन कसे कट करणार? बेकायदेशीर बांधकामांची जबाबदारी कोणी जर आमच्यावर सोपवणार असेल तर हे आम्ही कदापि सहन करणार नाही. हे आम्ही करायला सांगितलेले नाही. असे असेल तर या पत्रकारांनी नोंद घेतली त्यांना सुद्धा विचारा. आम्ही ओरडून ओरडून सांगितले होते. रेव्हेन्यूचा माणूस घ्या. स्थानिक माणूस घेऊ नका. तुम्हाला अकाऊंट विभागात रेव्हेन्यूचा माणूस पाहीजे होता तर आम्ही तुम्हाला तिथे मदत केली. अनधिकृत बांधकामे झाली यात तुमची चूक आहे, आमची सुद्धा चूक आहे. परंतू पहिली प्रशासनाची चूक आहे. तुमचा अधिकार आहे आमचा नाही. प्रशासकीय कामात बाधा आणली तर तुम्हाला संबंधिताला रेस्टीकेट करता येते. मी राष्ट्रवादीचे काम करतो. भा.ज.पा. चा असला तरी तो म्हणतो मी पक्षापोटी काम करतो. आम्ही सत्तेवर असताना घरे पाडली म्हणजे आम्ही जबाबदार नाही. You are responsible for that. हेच सांगायचा प्रयत्न करतोय. दरम्यानच्या काळात जी डेव्हलपमेंट झाली त्याला कोण जबाबदार आहे? तुम्ही आम्ही एकमेकांवर बोट दाखवत बसलो तर अशी प्रश्नोत्तरे करत बसू. आम्हाला हुशार अधिकारी आवडतात. आमचे ज्ञान वाढेल. आमची बुद्धीमत्ता वाढेल. २० वर्षांपूर्वी तुमच्यासारखे अधिकारी आले असते तर शहर असे झालेच नसते. जेएनएनयूआरएमबाबत मा.आर.एस.कुमार यांनी सांगितले होते, एवढे तुम्ही काय-काय करु शकणार आहात? चांगल्या कामाला एप्रेशिएट करा. आम्ही तुमच्या पाठीशी राहू. हे झाल्यामुळे आम्हीसुद्धा, तुम्ही सुद्धा जबाबदार आहोत. कायद्याच्या चौकटीतच बसून करा. हायकोर्टाने म्हटले होते, तुम्ही हिअरींग द्या. आपल्याकडे हिअरींग दिले जात नाही. तुमच्या ऑर्डरमुळे १/२ अधिकारी कामाला लागले. सस्पेण्ड केले. घाबरुन लोकांना भित भित नोटीसा दिल्या. फोटो काढले, मोकळे झाले. आम्ही सांगितले, ज्यांच्याकडे पैसे नव्हते, त्यांची बोंब झाली. ज्यांची जुनी

बांधकामे होती, फोटो काढून मोकळे झाले. पंचनामा करुन मोकळे झाले. इथे आमचा कायदा आहे. जस्टीफाय करायला वेळ द्या. तुम्हाला कोणाचे घर पाडायला आनंद होतो का? बिल्कूल नाही. कायद्याच्या चौकटीत राहून जर आपल्या घरी तशी परिस्थिती असेलतर We should justify that. महापालिकेच्या दृष्टीकोणातून जिथे तुमचे म्हणणे बरोबर आहे, तिथे तुमच्या बरोबर आहोत. जे झाले त्यात आमचे सुद्धा म्हणणे ऐकून घ्या. २/३ वेळा काय ८ वेळा म्हणालो, प्लिंथ तोडा. त्यासाठी यंत्रणा आहे. †क्शन घेतली, मला वाटते तो दोषी आहे. प्रभागातील अधिकारी असतील, एक्झिक्युटीव्ह इंजिनिअर असतील, आरोग्यचा माणूस असेल तो बघत नव्हता. प्लिंथ भरताना,कॉलम भरायला दीड महिना जातो. ४ ते ५ महिने अधिका-यांना डोळ्याला डोळा नव्हता. त्यावेळी †क्शन घेतली असतीतर आज बांधकामे काढायची वेळ आली असती का? जितके खोलात जाल तितका प्रॉब्लेम जास्त होईल. मिनत्या केल्या तरी सगळे तोडले. त्या भितीपोटी दिले नाही. १/२/३/४/५ नगरसेवक असतील, बाकी जनतेवर चालले होते. भविष्यात शहरातील नागरीकाला १ चटई निर्देशांक वापरुन रितसर घर बांधता यावे म्हणून शासनाला निर्णय घ्यायला वेळ लागतोय. ज्यांनी कायद्याने घर बांधले होते त्यांची काय चूक होती. २ एफ.एस.आय. म्हटलेले आहे. त्यात फरक केला म्हणून शासनाला निर्णय घ्यायला वेळ लागतोय. कोणी कोर्टात गेलातर शासन, अधिकारी अडचणीत येणार आहेत. १० वेळा बोलताना हीच माहिती दिलेली आहे. सेक्रेटरी असतील, पी.एम. असतील त्यांना हीच अडचण आहे. नियमांत बांधले एकनिश्चित ज्याने बांधले त्याला रेग्युलराईज कसे करता येईल हा मोठा प्रश्न आहे. त्यासाठी दिरंगाई होते आहे. तुमच्या आमच्या वतीने दिरंगाई होते का? माझी कोणती इमारत पडली आहे का? शिस्त लावताना हिअरींग द्या. जस्टीफाय करायचा प्रयत्न करा. †क्शन डिसाईड करताना पूर्ण मुभा द्या. हे बेकायदेशीर करतो. पाणीपट्टी, लाईटबील, करारनामा, ठेकेदाराचे पेपर,ठराव मेनमेन करता येईल ते करावे. ऑर्ग्युमेंट तुमच्यासमोर आहे. आम्ही जबाबदार, तुम्ही जबाबदार हा विषय पुन्हा पुन्हा आणू नका. कायदा आम्ही करत नाही. हे तुमचे काम आहे. शासनाकडे विषय प्रलंबित आहे. राज्य शासनाच्या अधिका-यांना हिअरींग देतोय. शाळा कुठे टाकतोय. एवढी मोठी चूक अधिकारी करु शकतो का? आम्ही बेघर करतोय. सारखे रेड लाईन, ब्ल्यू लाईन असे करतोय. पुण्याला आहे का**?** ब्ल्यू लाईन, रेड लाईन दिलेली नाही. त्यात राज्यकर्ते असतील, मुख्यमंत्री असतील, उपमुख्यमंत्री असतील. हा भेदभाव झालेला आहे. चुकीचे काम झालेले आहे. बीआरटीप्रमाणे टीडीआरचे

नियम वेगळे. कमिटीप्रमाणे सांगेल त्याप्रमाणे नागरीक रेग्युलर टीडीआर भरतात. आम्ही हेच मागतोय, तिथे व्हायला पाहीजे, तिथे व्हायला पाहीजे. डी.पी.त आले आहे का? एका बाजूला रोड काढायचे म्हणताय. ५ मजली बिल्डींग बनवली पण पार्किंगसाठी जागा ठेवली नाही. टाऊन प्लॅनिंग नाही. त्यात केले आहे का? भदाणे मॅडम चांगले काम करतात. आम्हाला कोणाशी देणेघेणे नाही. नवीन प्लाण्ट चालवायलाच पाहीजे. बीआरटीमध्ये किती परमिशन दिल्या. १ स्क्वे.मी. जागेसाठी डेव्हलपमेंट चार्जेस घेतो. १ चटई निर्देशांक जागा ताब्यात येते तेव्हा पैसे भरुन घेतो. टीडीएस सर्व देतो. पुन्हा डेव्हलपमेंट चार्ज भरतो. इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलप होते. घरात प्रवेश करतो. त्याच्या रुपाने तिस-यांदा पैसे येतात. महापालिकेत तीनदा पैसे भरतात म्हणून टीडीआर मागतो. वर्षाची प्रशासकीय दिरंगाई होते आहे. यांना काहीतरी लिमिट द्या. चुकीचे करा असे आमचे अजिबात म्हणणे नाही. आपल्याला विनंती आहे, हे डायरेक्टरला सांगितले तर प्रस्ताव बाजूला राहील. कमिशनर व पाटील यांनी प्रस्ताव दप्तरी दाखल केला. हायकोर्टात †फीडेव्हीट दिलेले आहे. महापालिकेने गव्हर्नमेंटच्या अधिका-यांना आमच्याकडील †फीडेव्हीट दिलेले आहे ते बंद करा. कोणाला पत्र दिले, अधिका-यांना परत का बोलवावे हे समजून घ्या. That is supposed to do in future. आमची इच्छा चांगली कामे करायची आहे. शहर बकाल करायचे नाही. शहर चांगले करायचे आहे. चेंजेस इनकॉर्पोरेट करा. आम्ही नाही म्हटले नाही. चुकीच्या पद्धतीने काम करा असे म्हटले नाही. पहिल्यांदा तुमचा शब्द खोडून काढतो. या सभागृहापेक्षा जास्त जबाबदारी प्रशासनाची आहे. त्यासाठी म्हटले आहे. दोघे एका रथाची दोन चाके आहोत. तुम्ही मांडायचे, एक्झिक्युशन करायचे. दोघेही पब्लिकचे सर्वंट आहोत.

**मा.महेश लांडगे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आत्ता नगरसेवकांसाठी केलेले आरोप मा.योगेश बहल यांना खोडून काढलेले आहेत. महासभेत आमच्या परिसरातील नागरीकांच्या अडचणी दूर करण्यासाठी येत असतो. कोणत्याही प्रॉपर्टीवरुन भांडत नाही. आमचे प्रामाणिक व प्रांजळ मत आहे. आपल्यात वाद झाला नाही पाहीजे. प्रशासन व लोकप्रतिनिधी यांच्यात वाद निर्माण झाला नाही पाहीजे. त्यामुळे प्रशासन पण चालणार नाही, आमचे काम होणार नाही. ज्या लोकांची घरे वाचवायची तो विषय बाजूला राहीला. ज्या लोकांनी घरे इथे बांधली त्यांची भूमिका सुद्धा इथे मांडली आहे. प्रत्येक झोनमधील बांधकाम पाडावे लागेल, अमुक करावे लागेल. नवीन समाविष्ट भागातील जी घरे आहेत ती बरीचशी ग्रीन

झोनमध्ये येतात. यातून मार्ग काढावा लागेल. ही घरे ग्रामपंचायतीच्या काळातली आहेत. रेड झोन, ग्रीन झोन आत्ता झाला आहे. डी.पी प्लॅन तयार करताना आमच्या लोकांना त्रास होणार नाही असा करा. माझ्या वॉर्डात व्हिजिटसाठी गेलो होतो. जी बिल्डींग पीसीएमटीची आहे. त्यावेळी प्राधिकरण परमिशन देत होते. महापालिकेच्या आरक्षणात ती बिल्डींग होती. त्यावर कारवाई करणार का? प्रशासनाला नावे ठेवण्यात आम्हाला आनंद होतो का? ज्या लोकांवर अन्याय होतो त्या लोकांसाठी मार्ग काढा. तडजोडीने संसार, कुटूंब चालते. दोघांना तडजोड करावी लागते. एकाने टोकाची भूमिका घेऊन चालेल का? आम्ही पण घेत नाही, आम्हाला मार्ग सांगा. या गोष्टीला आम्हाला सामोरे जाता येत नाही. कायद्याबाहेर जाता येत नाही. प्रशासनाच्या दृष्टीकोणातून तुम्ही त्याचा फॉलोअप करा. समंजसपणा ठेवा. लोकांची घरे पाडली यात तुम्ही तुमचा इगो ठेवू नका. आम्ही आमचा ठेवत नाही. तुम्ही ३ वर्षांनी जाणार आहात. तुमची कारकीर्द चांगली राहणार आहे. असे करु नका. समक्ष तरी करु नका. तुमच्या केबिनमध्ये हितगुज काय करायचे ते करा. प्रत्येकाला वाटते आयुक्त आमचे सुद्धा आहेत. चर्चा चालेल, कामे बाजूला राहतील. सगळ्यातून मार्ग काढायचा आहे. आपण इथे मार्ग काढण्यासाठी आलेलो आहोत. आमच्या भावना समजून घ्या. कायदा व भावना यांचा कसातरी मेळ करुन मार्ग काढा. आजपर्यंत एवढे पोटतिडकीने बोललो नव्हतो. आमची मदत घ्या. यातून मार्ग काढा.

**मा.जावेद शेख** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आत्ता जो विषय आलेला आहे. आपण ब-याच जणांवर बेकायदेशीर नळ कनेक्शनबद्दल गुन्हा दाखल केला आहे. त्यांनी कोर्टाचा जामिन घेतला आहे. हा आपल्या अधिकार आहे का? ज्यांच्या प्रॉपर्टीची नोंदणी करायचे बंद केलेतर त्यांनी कोर्ट मॅटर केलातर तो अधिकार प्रशासनाला आहे का? याचा खुलासा करावा. एखादा नागरीक आपल्यासंदर्भात कोर्टात जाऊन आपल्या विरोधात केस दाखल करत असेलतर काहीतरी करावे. कदाचित विषय पास केला असतातर त्या नागरीकाने सगळ्यांनाच धारेवर धरले असते. आपल्यासमोर प्रश्न निर्माण झाला नसता. एखाद्या व्यक्तीने आरोप सिद्ध केला होता. कोर्टात मॅटर गेला तर आपण त्याचे काहीच करु शकत नाही. माझे घर मोकळे आहे आणि एखादा घरात घुसला असेल तर त्याला काढता येणार नाही. जोपर्यंत कोर्टातून निर्णय येणार नाही, तोपर्यंत गुन्हा दाखल केला होता. त्याचे पाणी व ड्रेनेज कनेक्शन बंद करा म्हणून निर्णय झाला होता, याचा खुलासा करावा.

**मा.अजित गव्हाणे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, या विषयाच्या अनुषंगाने आपण खुलासा केला. सगळेच सदस्य बोलले. जे काही वातावरण निर्माण झाले आहे, त्यात आयुक्त विरुद्ध सभागृह असे आहे. वास्तविक आमची भूमिका नव्याने अनधिकृत बांधकामे होऊ नयेत अशी असली तरी आपण याची दुसरी बाजू पाहत नाही. पिंपरी चिंचवड शहराचा विस्तार झालेला आहे, डेव्हलप झालेले आहे. मुळात यात इंडस्ट्रीज असल्यामुळे कामगार वर्ग आला. मोठ्या प्रमाणात घरे बांधली गेली. त्यावेळी कुठलाही सर्वसामान्य मनुष्य प्लॅन पास करु शकतो का? याचा बारकाईने विचार केला पाहीजे. पिंपरी चिंचवडमध्ये किती जणांनी बिल्डींग परमिशन घेतल्या गेल्या. किती सर्वसामान्य माणसांनी त्या घेतल्या? का घेता आली नाही याची कारणे तपासली पाहीजेत. पूर्ण महाराष्ट्रात अर्बन लॅण्ड सिलिंग कायदा ख-या अर्थाने गरीब माणसाला स्वस्तात घर मिळावे यासाठी निर्माण केला होता. प्रत्यक्षात याची अंमलबजावणी कोणाला करता आली नाही. म्हणून नाईलाजाने गरजेपोटी अनधिकृत बांधकामे केली गेली. संपूर्ण देशात असेच झाले आहे. आपल्या महापालिकेत मोठ्या संख्येने बांधकामे झाली आहेत. राज्यात व महापालिकेत फरक काय? लालजी वंजारी नावाचा मनुष्य कोर्टात गेले म्हणून ही कारवाई करावी लागते आहे. हे करत असताना एक विचाराने, एकत्रितपणे व्यवस्थेसाठी काम केलेतर कमीत कमी लोकांचे नुकसान झाले पाहीजे. टप्याटप्याने कारवाई करत असलातरी आम्ही आजसुद्धा तुमच्या बरोबर आहोत. भविष्यकाळात तुमच्याबरोबर असणार आहोत. आज सुद्धा शंभर टक्के अधिकृत बिल्डींगचा प्लॅन पास करु शकतो का? हे सुद्धा तपासले पाहीजे. २ गुंठ्यासाठी लाखो रुपये भरावे लागतात. एन.ए.साठी वर्षानुवर्षे फाईल प्रलंबित राहते. यूएलसी कायदा रद्द झाला तरी सुद्धा यूएलसी ची फाईल आणावी लागते. तुमच्यासारखा अधिकारी बसलातर तो कशासाठी यूएलसी आणेल? कलेक्टर यांनी घोषणा केली होती. प्लॅन तयार केला होता. त्या-त्या ग्रामपंचायतीला अधिकार दिलेले होते. कोणत्याही प्रकारची मोजणी लागणार नाही, यूएलसी लागणार नाही अशी कलेक्टर यांनी घोषणा केली होती. आपण सुद्धा तशाप्रकारची भूमिका, सर्व आयुक्तांनी महाराष्ट्रातील सचिवांसमोर विषय मांडला पाहीजे. सर्वसामान्य मनुष्याला घर बांधता येत नाही. नियमांत बदल करणे गरजेचे आहे. अशी कोणतीतरी भूमिका सर्वसामान्यांच्या धर्तीवर मांडली पाहीजे. अशी अपेक्षा आहे. असे केलेतर भविष्यकाळात सर्वसामान्य मनुष्य प्लॅन पास करु शकतो. आपल्या राज्यात, देशात, महापालिका क्षेत्रात बकालपणा दिसतो तो राहू नये म्हणून या नियमावलीत दुरुस्त्या होणे गरजेचे आहे. यासाठी कोर्टात कोणीतरी जाणे गरजेचे

होते. चुकीचे नियम झाले. या पूर्वीपासून केलेल्या चूका जोपर्यंत बदलत नाही, तोपर्यंत कठोर कारवाई करु शकत नाही. जरी पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रात बंदी झालीतरी ग्रामपंचायत हद्दीत भविष्यकाळात बांधकामे होणार. या दृष्टीने विचार करणे गरजेचे आहे. मा.योगेश बहल यांनी मुद्दा मांडला. लोक जेव्हा प्लॅन पास करायला टाकतात तेव्हा अडचणी येतात. प्रशासकीय पातळीवर दिरंगाई चालली आहे. शिस्तीच्या नावाखाली विभागाकडून लोकांना सांगितले जाते, अमुक नाही, तमुक नाही. एक फाईल ४ वेळा फिरत असते. टीडीआरबाबतीत लोकांमध्ये संभ्रम आहे. टीडीआरमध्ये खूप मोठा गौडबंगाल आहे. जमिन आरक्षित आहेत. भूसंपादन करायला मुभा आहे. त्याचा मोबदला टीडीआर स्वरुपात देत असतो. तो नसतातर पिंपरी चिंचवड शहरात अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात मा.आप्पा बारणे म्हणाले तसे २६,००० अनधिकृत बांधकामे का झाली. महापालिकेच्या ताब्यातली आरक्षणे घेऊ शकलो तरी भूसंपादनासाठी द्यायला पैसे नव्हते. टीडीआरशी संबंध नव्हता त्या शेतक-यांनी त्यांच्या गरजेपोटी त्यांच्या जमिनी विकल्या. कामगारांनी त्या गरजेपोटी विकत घेतल्या. मागील ५ ते १० वर्षांपूर्वी डी.पी. प्लॅनचे आरक्षण काय असते याचा गंध सर्वसामान्य किंबहुना हुशार माणसांना सुद्धा नव्हता. त्यावेळी टीडीआर असतातर जमिनी ताब्यात आल्या असत्या तर आज एवढ्या मोठ्या प्रमाणात कारवाई करावी लागली नसती. आरक्षणांच्या जागांवर शंभर टक्के झोपड्या झाल्याशिवाय राहणार नाहीत. तिथे बांधकामे होणार नाहीत अशा परिस्थीतीत आपण काय भूमिका घेतली पाहीजे. टीडीआरबाबत तुम्ही स्वतः नीट अभ्यास करा. बेकायदेशीर काम करा असे म्हणत नाही. कायदेशीर कामे केली पाहीजेत. पॅनलकडे फाईल जाते. किती दिवस फाईल गेली पाहीजे. ४ दिवस, ८ दिवस, १५ दिवस ३ ते ४ महिने फाईल निष्कारण पेंडींग राहत असेल तर बांधकाम करणा-या मनुष्याचे नुकसान होते. शेतक-याने फाईल सबमिट केलीतरी त्याचे नुकसान होते. आपले नगरसेवक निकाळजे यांनी रेसिडेन्शियल झोनमध्ये टीडीआर देण्याची मागणी केली तर नगरसेवक असूनही त्याचे काम होत नाही. त्यांची काय चूक आहे? वस्तुस्थिती काय. तुमचा गैरसमज होतो. पॅनलकडून दिरंगाई कशासाठी होते. त्यांची स्वतःची जमिन आहे. एका वाक्यात त्यांनी स्पष्ट सांगितले, मी सिव्हील लाईनमध्ये कधीच काम केले नाही. देशमुख यांना क्रिमिनलच्या केसेसमध्ये काम केले आहे. असे असताना त्यांच्याकडून अपेक्षित काम कसे होणार? टीडीआरची किती प्रकरणे प्रलंबित आहेत? लोकांना अर्ज करुन ६/६ महिने झाले आहेत. २ मजली ३ मजली बांधकाम करुन टीडीआर घेतला आहे. त्यांच्या फाईलवर ६/६ महिने सद्या झाल्या

नाहीत, कशासाठी थांबले आहेत? कायदेशीर काम होतात का याचा नीट अभ्यास करावा. सभागृहाला सुद्धा याची माहिती द्यावी. अशाप्रकारची दिरंगाई करत राहीलो तर भविष्यकाळात अधिकृत होणार ते होणार नाही. भविष्यकाळात सर्वसामान्य माणसाला प्लॅन पास करता यावा. आज एखाद्या सोसायटीत १० घरे झाली. ११ व्याचा प्लॉट रिकामा आहे. १५ फुटांचा रस्ता आहे. त्याचा प्लॅन पास होत नाही. कमीत कमी २५ फूटाचा रस्ता पाहीजे. कायदा कोणासाठी आहे. लोकांनी लोकांसाठी केलेले कायदे आहेत. आपण लोकशाहीत राहतोय म्हणून कायद्यात बदल करायला सुद्धा तुमच्या स्तरावर, आम्ही आमच्या स्तरावर प्रयत्न करतोय. तुम्हाला वाटते, एक दिवसांत सगळी सिस्टीम सुधारावी. सिस्टीममध्ये बदल करायला कालावधी द्यावा लागेल. कायद्यात बदल करावा या दृष्टीकोणातून भविष्यकाळात काम करावे लागेल. तुमचा आमचा संघर्ष चालला आहे. तुमच्याकडून स्टेटमेंट दिले जातात, मी नसताना निर्णय झाला आहे. आगामी काळात आपण एकत्रितपणे काम करावे. सदस्यांकडून आरोप होतो आहे, ज्या पॅनलकडे फाईल पेंडींग पडतात, तिथे अर्थकारण मूळ कारण आहे. असे असेलतर पॅनल करुन काय सिद्ध केले, खतपाणीच घातले आहे. निष्कारण दिरंगाई न करता ताबडतोब निर्णय देऊन टाका. होत असेलतर हो म्हणा, होत नसेल तर नाही म्हणा. तो मनुष्य दुसरा पर्याय शोधेल. मी वैयक्तिक बोललो तरी सगळ्या गोष्टी पर्सनली घेऊ नका. तुमच्या भूमिकेतूनच बोलतोय. सगळ्या गोष्टी भविष्यकाळात चांगल्या करायच्या असतील तर सर्वांना विश्वासात घ्या. कायदेशीर कामे करा. जिथे जिथे मदत करता येईल, बांधकाम वाढवत असतील तिथे तुमच्या स्टेटमेंट सांगतो. ०.०२ जास्त वाटते. दिघीतील मिलिटरी सैनिकाचे उदाहरण दिले, खूप वाईट वाटतेय. प्रत्यक्ष कारवाई ज्या ठिकाणी केली, त्या लोकांना फेस करतो. ज्या अधिका-यांनी कारवाई केली, त्यांची मानसिकता विचारा. हजारो लोकांनी दगडफेक केली. अधिकारी जीव मुठीत घेऊन पळत होते. अधिका-यांना कोणत्याही प्रकारे संरक्षण नव्हते. कायदे लोकांनी लोकांसाठी केलेले आहेत. माणूसकीच्या भूमिकेतून काम करा, आपल्याला नम्र विनंती आहे.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ दप्तरी दाखल करण्यात यावा अशी सूचना मांडते.

**मा.सुजाता पलांडे** – मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक -२६६ विषय क्रमांक - ५
दिनांक - ९/५/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ-१)मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.स्था/श.अ.तां/१/कावि/ १४८/२०१२, दिनांक २१/०८/२०१२
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.५१, दिनांक २१/०९/२०१२
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.२४२ दि..२२/०३/२०१३

विषय क्रमांक ५ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल -७० प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.भारती फरांदे**- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -२६७ विषय क्रमांक - ६
दिनांक - ९/५/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जशुकें/वि/३१/२०१३, दि.१९/०१/२०१३
२) मा. विधी समिती सभा ठराव क्र.१११ दिनांक ०१/०२/२०१३
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.२४४, दिनांक २२/०३/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जलशुध्दीकरण केंद्र से.२३ या ठिकाणी सी.सी.टी.व्ही.यंत्रणा बसविणेकामी येणा-या र.रु.१,३२,००,०००/- (अक्षरी र.रु.एक कोटी बत्तीस लाख फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.आर.एस.कुमार_** - महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.नंदा आल्हाट** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, किती कॅमेरे बसवितात याची माहिती दयावी. विषयाला विरोध नाही.

**मा.प्रविण तुपे (सहशहर अभियंता) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, या कामाअंतर्गत जलशुद्धीकरण केंद्र सेक्टर २३ इथे पोलिसांच्या मागणीनुसार एकूण ३६ एकर एरियामध्ये ७० कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. सर्व आय.पी. बेस कॅमेरे असतील. वेब कनेक्शन असू शकणार आहे. संबंधित अधिकारी मोबाईलवर बघु शकणार आहेत. पोलिसांच्या सीसीटीव्ही कॅमेराला कनेक्शन देता येऊ शकणार आहे.

**मा.श्रीरंग बारणे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, जलशुद्धीकरण केंद्राला अनुसरुन सूचना करायची आहे. रावेत बंधा-यावरुन पाणी उचलून सेक्टर २३ला घेऊन जातो. रावेत बंधा-याची परिस्थिती पाहिलीत का**?** तिथे गाड्या धुतल्या जातात. पाण्यात जवळपास दररोज १५० रिक्षा धुवून रोडला जातात. धरणातून ५० फूटांवरुन पाणी उचलतो. तिथे सगळे ह्रायसिंथ जमा झाले आहे. परिसर अतिशय घाण झाला आहे. पाण्यात ऑईल मिसळते. शहरात इथून पाणीपुरवठा करतो. तिकडचाच परिसर अतिशय दुर्गंधीयुक्त झाला आहे. धुणे धुण्यासाठी,गाड्या धुण्यासाठी बंदी घालावी. शहरातील नागरीकांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जातो. पाणी अतिशय घाण करण्याचा प्रकार चालतो. उघड्या डोळ्याने सगळे प्रकार चालतात. या संदर्भात आपण कडक कारवाई करावी.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ७० प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुनिता गवळी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -२६८ विषय क्रमांक - ७

दिनांक - ९/५/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.YCMH/ACAD/२५/२०१३, दि.२०/०२/२०१३

२) मा. विधी समिती सभा ठराव क्र.१२२ दिनांक ०१/०३/२०१३

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.२४६ दि.२२/३/२०१३

MUHS-PCMC P. G. Institute साठी प्रस्तावा सोबतचे प्रपत्र अ मध्ये नमूद केलेल्या ५४ पदनामाची ३३२ पदापैकी आवश्यक असणारा Teaching व Ancillary स्टाफ प्रपत्र ब मध्ये नमूद केल्याप्रमाणे एकूण २६ पदनामाची १९८ पदे निर्माण केल्यास अंदाजे दरवर्षी र.रु.१३,७५,९२,०००/- एवढा खर्च अपेक्षित असून सदरची पदनिर्मिती करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

**मा.प्रतिभा भालेराव** - महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ७० प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.मंदाकिनी ठाकरे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -२६९ विषय क्रमांक - ८

दिनांक - ९/५/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/१६३/२०१३, दि.१६/०२/२०१३

२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.१२५ दि.१५/३/२०१३

श्री.गायकवाड दत्तात्रय यशवंत यांना र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन र.रु.६६०० या वेतनश्रेणीमध्ये उपमुख्यलेखापाल (अंतर्गत लेखापरिक्षक) या पदावर पदोन्नतीने नेमणूक देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.ताकवणे नंदा** - महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ७० प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुनिता गवळी** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -२७० विषय क्रमांक - ९

दिनांक - ९/५/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/१८३/२०१३, दि.२१/०२/२०१३

२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.१२६ दि.१५/३/२०१३

दिनांक ०२/०१/२०१३ रोजीच्या पदोन्नती निवड समितीची शिफारस विचारात घेता श्री.डी.एम.फुंदे यांना "सहाय्यक आयुक्त" या पदावर पे बॅन्ड र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन र.रु.६६०० या वेतनश्रेणीमध्ये शासन त्यांचे नियुक्तीस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५(४) नुसार मान्यता देईल या अटीवर पदोन्नतीने नेमणूक देण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.भारती फरांदे** - महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ७० प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.नंदा ताकवणे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -२७१ विषय क्रमांक - १०

दिनांक - ९/५/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ:-१)मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.डप्र/स्था/०१/कावि/२७७/२०१३, दि.११/०३/२०१३

२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.१२८ दि.१५/३/२०१३

श्री.माछरे सुभाष सावन यांना र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन र.रु.६६०० या वेतनश्रेणीमध्ये सहाय्यक आयुक्त या पदावर शासन त्यांचे नियुक्तीस मंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५ (४) नुसार मान्यता देईल या अटीवर पदोन्नतीने नेमणूक देण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.मंदाकिनी ठाकरे** - महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ७० प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुनिता गवळी**- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक -२७२ | विषय क्रमांक - ११ |
| दिनांक - ९/५/२०१३ | विभाग- मा.आयुक्त |

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/३८२/२०१३, दि.२८/०३/२०१३

२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.१३२ दि.८/४/२०१३

श्री.झुरे पांडूरंग हणमंत यांना र.रु.१५६०० - ३९१०० ग्रेड वेतन र.रु. ६९०० या वेतनश्रेणीमध्ये सह आयुक्त (**Joint Commissioner**) या पदावर पदोन्नतीने नेमणूक देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.स्वाती साने** - महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.विलास नांदगुडे** – मा.महापौर साहेब,मी हात वर करत असतो. तुम्ही मला बोलायला संधी देत नाही. मी २५ वर्षे महापालिकेत प्रतिनिधित्व करतोय. कंटीन्यू मी याठिकाणी आहे. वॉर्ड कधी ओबीसी होतो, कधी महिला आरक्षित होतो. कधी मी निवडून येतो कधी माझी पत्नी निवडून येते. आम्ही दोघे गेली २५ वर्षे या प्रभागाचे

नेतृत्व करतोय. सांगायचे तात्पर्य हेच की, मी व माझी मिसेस आम्ही आजही एकत्र राहतोय. सगळ्याच विषयांवर बोलत नाही. सगळ्या विषयांवर बोलताना सभागृहात १३३ नगरसेवक आहेत. प्रत्येकाला वाटते प्रत्येक विषयावर बोलावे. मिटींग २ दिवस चालेल याची सुद्धा जाणीव आम्हाला आहे. झुरे साहेबांचा विषय याठिकाणी आहे. त्यांच्या विषयाला मान्यता देतोय. त्यांची व माझी वैयक्तिक दुश्मनी नाही. त्यांनी माझ्या कामाला कुठे अडकाठी आणली असा विषय नाही. त्यांचे व्यक्तिमत्व पाहीलेतर गावठी पुढा-यासारखे दिसतात आणि त्यांच्या कामाची पद्धत पाहीलीतर गावगुंडासारखी आहे. महापालिकेचा कारभार नियमाप्रमाणे चालतो का मनाने चालतो. जो नियम चालतो तो लक्षात ठेवा. ते ड प्रभागात प्रभाग अधिकारी असताना संपूर्ण कारभार त्यांच्या मनाने चालवला आहे. नियमांना बगल दिलेली आहे. अनेक उदाहरणे आहेत. एक उदाहरण देतो – माझ्या प्रभागात माजी पोलिस कमिशनर आहेत. प्रमोट झालेले आयएएस अधिकारी आहेत. पुण्याचे कमिशनर म्हणून त्यांनी काम केलेले आहे. पोलिस कमिशनर असताना आपल्या बंगल्याच्या आजूबाजूला राहूटी ठेवली होती. बंदोबस्तासाठी २ पोलिस ठेवले होते. कमिशनर होऊन निवृत्त झाले. ८/९ वर्षे झाली राहूटी अजून तशीच आहे. दुस-याच्या जागेत बांधली आहे. डी.पी. रस्त्यात बांधली आहे. अनेक वेळा त्या माणसाने कंम्प्लेण्ट केली. झुरे साहेबांकडे कंम्पलेण्ट केली. त्यावेळी कोणी कंम्पलेण्ट घ्यायला तयार नाही. झुरे साहेबांनी त्यावेळी सांगितले, कंम्पलेण्ट आली आहे. कागदोपत्री कारवाई दाखवू. मी आल्यासारखे करतो. मी निवडून आलो त्यावेळी त्या अधिका-यांकडे गेलो, झोपडी काढावी लागेल, अनऑथराईज कंस्ट्रक्शन आहे. आजूबाजुच्या लोकांच्या तक्रारी आहेत. त्यांनी सांगितले, मला अजूनही महापालिकेने स्टॉर्म वॉटरची सोय केलेली नाही. जोपर्यंत पाण्याची सोय होत नाही तोपर्यंत राहूट्या काढणार नाही. (त्यानुसार अनऑथराईज राहूटी काढली.) ७/८ महिने प्रयत्न करुन त्यांना स्टॉर्म वॉटरची सोय करुन ते मेन ड्रेनेजला जोडले. त्यावेळी संध्याकाळी मी त्यांच्याकडे गेलो व म्हणालो मी तुमचे काम केले. आता लोकांचे काम करा. सर्वसामान्य माणसासाठी एवढा प्रतिष्ठेचा प्रश्न का करताय? चुकीचे काम करताय. सर्वसामान्य अज्ञानी आहेत. ही माझी जबाबदारी आहे. त्या माणसाने सांगितले, आज पिंपरी चिंचवडचे तुमचे कमिशनर आयएएससाठी पुण्याला ट्रेनिंगला होते त्यावेळी मार्गदर्शनासाठी माझ्याकडे येत आहे. मला कोणी काहीच करु शकत नाही. माझ्या समोर त्यांने म्हटले त्यावेळी मी त्यांना सांगितले, तुम्ही पहिल्या राहूट्या काढल्या पाहीजेत. हे मला सांगायचे होते. झुरे साहेबांच्या या

प्रस्तावावर सभागृहाला विनंती आहे, असे अधिकारी चांगले अधिकारी असले तर प्रस्ताव मान्य करा. चुकीच्या अधिका-याला असे प्रमोशन दिलेतर निश्चितच महापालिकेचे नुकसान होईल म्हणून हा प्रस्ताव फेटाळण्यात य़ावा.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ७० प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.भारती फरांदे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक १२

दिनांक - ९/५/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भः- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र कप्र/स्था/का.अ./२००/२०१३, दि.०१/०४/२०१३

२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.१३३ दि.८/४/२०१३

आण्णासाहेब मगर स्टेडियम येथे क्रिकेट मैदान तयार करणेच्या कामाच्या (मूळ निविदा र.रु.५८,९८,२४६/-) र.रु.७३,३८,२३४/-चे सुधारित अंदाजपत्रकास व र.रु.१०,०७,९७४/- चे वाढीव खर्चास मान्यता देणेत येत आहे.

**मा.प्रतिभा भालेराव** - महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब सदर विषयाला पुढीलप्रमाणे उपसुचना मांडते - क्रिकेट व्यतिरिक्त अन्य खेळही सदर स्टेडीयमवर अन्य खेळांसाठी ग्राऊंड तयार करणेत येऊन खेळ खेळविण्यात यावेत. सदर स्टेडियम कोणत्याही †Ûú›í´ÖßÃÖöŠíß देणेत येऊ नये.

**मा.भाऊसाहेब भोईर** - मा.महापौर सदर उपसुचनेस अनुमोदन देतो.

**मा.महेशदादा लांडगे** – मा.महापौर साहेब, मगर स्टेडियमचे सुधारीत अंदाजपत्रक करा असा आपला प्रस्ताव आहे. मगर स्टेडियमवर आपण फक्त क्रिकेट खेळतो. सर्व खेळांसाठी ग्राऊंड तयार करणार आहोत का हा एक प्रश्न आहे. आपले महापालिकेचे

अधिकारी हे क्रिडा प्रबोधिनीचे आहेत. त्यांच्याकडे पुरेसे ग्राऊंड नाही. त्यामुळे रोडवर रनिंग करावे लागते. आपण डॉक्टर आहात. खेळाडू ज्यावेळी तयार होतो, तो डांबरावर पळाल्यामुळे त्याच्या गुडघ्यांना त्रास होत असतो. सिंथेटीक ट्रॅक असे काही असावे लागते. जे खेळाडू क्रिडा प्रबोधिनीत खेळतात, त्यांना ग्राऊंड उपलब्ध करुन द्यावे. मगर स्टेडियमचा विषय ५ वर्षांपूर्वी मांडला होता. त्यावेळी जी.बी.त बोललो होतो, चांगल्या पद्धतीने प्रत्येक बजेटमध्ये तरतूद करावी. त्यासाठी तरतूद केली नाही. त्यावर कारवाई झाली नाही. २ महिन्यांपूर्वी राज्य क्रिडा स्पर्धांव्यतिरिक्त स्पोर्टस् फंड माध्यमातून राज्यातून विविध संघांच्या टिम तिथे आल्या होत्या. ७५० खेळाडू ३३० महिला बरेचसे संघ आले होते. आपल्या मनपाच्या घरकुल योजनेतील बिल्डींग खरेतर खेळाडूंसाठी घेतली होती. त्यासाठी अधिका-यांनी रितसर पेमेण्ट भरुन होस्टेल घेतले असते. एक प्रश्न विचारायचा होता. एखाद्या ठेकेदाराकडून घरकुले बांधून घेत आहोत. त्यासाठी महापालिकेचा अधिकारी कोण आहे. करोडोंची बांधकामे करत असतो. महाराष्ट्रातल्या २२ संघांतून खेळाडू आले होते. त्यात देशाचे प्रतिनिधित्व केलेले ७ ते ८ खेळाडू होते. त्यांना रात्री १२ वा. हलवावे लागले. एकच दिवस ताब्यात घेतले होते. महिलांसह ७५० खेळाडू दुसरीकडे शिफ्ट केले. यांचा रोष असलातरी त्यांना चौकात आणून सोडत होतो. खेळाडूंवरील अन्याय कधीच सहन करणार नाही. रितसर परवानगी घ्यायला तांबे साहेबांकडे आलो होतो. ही प्रॉपर्टी अजूनही महापालिकेकडे शिफ्ट झालेली नाही. ही मान्यता तुम्हाला देऊ शकत नाही. तुम्हाला व त्यांना सुद्धा राज्यात अनुकूल नव्हतो, आम्हाला हे पत्र मिळाले. तुमच्या ताब्यात नसेल तर तुम्ही कसे देणार. आयुक्तांकडून कसे घेणार. रिक्वेस्ट केली. लाईट नसताना स्वखर्चाने चॅनेल आणले. मोटर लावून त्यांना पाणी दिलेले होते. माझ्याबद्दल व्यक्तिगत रोष असला तरी मला चार भिंतींच्या आत घ्या. माझा काय अपमान करायचा तो करा. त्या खेळाडूंचा अपमान करु नका. आपण सुद्धा खेळाडू आहात. रॉक क्लाईंबिंग करताय. आमचे काही चुकत असेल तर आम्हाला माफ करा. होस्टेलची गरज आहे. ती झाली असतीतर खेळाडू राहीले असते. शहराचा अपमान झाला नसता. आमचा अपमान झाला नसता. काही गोष्टींसाठी तरतूद करायला सांगा. यात काहीतरी तथ्य असते. चांगला अभ्यास, चांगला राहणारा माणूस, चांगला दिसणारा माणूस यांचे ऐकू नका. आपण एखाद्या डॉक्टरकडे गेलो की तो जे औषध देतो ते आपण मुकाट्याने घेतो. आम्हाला त्यातले माहीतच नसते. खेळाडू जो असतो त्याला त्या खेळातले काहीतरी कळत असते. होस्टेल बांधा का म्हणतोय. या गोष्टीचे कारण आहे. आपण जर एखाद्याला प्रॉपर्टी डेव्हलप करायला

दिली असेलतर महापालिकेकडे हँण्ड ओव्हर झाले नसेलतर महापालिकेचा त्याच्यावर अधिकार राहतो का? खेळाडूमुळे नुकसान झाले असते तर खेळाडूकडून भरुन घेऊ शकलो असतो. गुन्हा दाखल करणे इथपर्यंत प्रकरण गेले. अक्षरशः कळस झाला. महाराष्ट्रातून विविध जिल्ह्यांतून इथे खेळाडू आलेले आहेत. महेश लांडगेला मारायला ताकद लावायची होती. खेळाडूसाठी ताकद लावली नव्हती पाहीजे. एवढे काय वाईट केले होते. बांधकामांवर शंभर टक्के कारवाई करा. खेळाडूंवर कारवाई करायला नको होती.

**मा.गौतम चाबुकस्वार** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,मगर स्टेडियमचा विषय मूळ निविदा रु.५८,९८,२४६/- वाढीव घेऊन, ही किंमत का वाढवण्यात आली. एस्टीमेट का वाढले आपल्याला माहित आहे. कामगार कल्याण मंडळाकडे स्टेडियम होते. ४ कोटी रुपये व काही जागा कामगार मंडळाला दिली. आम्ही त्यावेळेपासून १५ वर्षे होतो. तेव्हापासून काहीच डेव्हलप केलेले नाही. आत्ता या ठिकाणी प्रस्ताव आहे. स्टेडीयम क्रिकेटसाठी वापरण्यात येणार आहे. शहरात एकूण क्रिडांगणे एकंदरीत कमी आहेत. ४ महत्वाची क्रिडांगणे आहेत. त्यापैकी थेरगावचे वेंगसरकर अकॅडमी व मगर स्टेडियम इथे क्रिकेट स्टेडियम केलेतर शहरात क्रिडा विकास करता येणार नाही. म्हणून विनंती राहील, क्रिकेटचा आग्रह का धरतो? कोणाला क्रिकेट स्टेडियम पाहीजे. २५ एकर जागा आहे. मा.महेश लांडगे यांनी अतिशय पोटतिडकीने विषय मांडला आहे. इथे राज्य पातळी, राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धा भरतात तेव्हा सगळ्यात मोठा प्रश्न त्यांच्या राहण्याच्या व्यवस्थेचा असतो. २००० शाळांतील राष्ट्रीय स्पर्धा याठिकाणी बालेवाडी इथे कराव्या लागतील. म्हणून इथे विनंती राहील, त्या जागेत किमान ५०० खेळाडूंच्या राहण्याची व्यवस्था करण्यात यावी. त्याचा एक आराखडा यापूर्वी झाला होता तो पहावा. त्यात अनेक प्रकारच्या खेळाडूंचा समावेश होता. तेवढ्या जागेत ही सगळी जागा समाविष्ट करुन एखादा गरीब त्याचे कुटूंब चालवू शकतो. जागा ताब्यात असताना, पैसे असताना त्या जागेचा वापर करु शकत नाही. तुम्ही प्राधिकरणात गेलातर तिथे क्रिकेटच्या मैदानाचा लोकांचा कोणताही आग्रह नाही. तिथे विविध खेळांचे प्रकार आहेत. भालाफेक, अथेलेटीक्ससाठी स्टेडीयम का वापरता येत नाही. बाकी खेळांकडे कोणी लक्ष देत नाही याचा विचार झाला पाहीजे. विनंती आहे, ५८ लाखांची मूळ निविदा होती. काय काम झाले हे स्वतः जाऊन पहा. अजून १० लाखांची मान्यता दिली आहे. एस्टीमेट का वाढले ते पुन्हा पहा. एवढ्या मोठ्या जागेचा चांगला वापर

करण्यासाठी एस्टीमेट तयार करा. सर्व खेळांचा समावेश करावा. इनडोअर गेम्स होऊ शकतात. कित्येक वर्षे जागा पडून राहीली आहे. क्रिकेट स्टेडियमसाठी ही जागा देऊ नका. माझा विरोध राहील. थेरगाव इथे मोठी क्रिकेट अकॅडमी आहे. सांघिक, वैयक्तिक अशा खेळांसाठी जागा द्या. याबद्दल निश्चित विचार करावा.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, कोंडे साहेब असताना सगळ्या स्पोर्टस् कॉम्प्लेक्ससाठी योजना आखली होती. ऑफीस निर्माण केले होते. तिथे परिस्थिती इतकी वाईट झाली होती. तिथे गेलोतर खेळांचे मटेरिअल इकडे तिकडे पडलेले होते. ऑडीटोरिअम केलेले होते. स्पोर्टस् लायब्ररी केली होती. उत्तम पद्धतीने प्रोजेक्ट सुरु झाला. तशाच पद्धतीने अधिकारी आले. पिंपरी चिंचवडमध्ये काहीतरी चांगले होईल या दृष्टीकोणातून सभागृह मंजूरी देते. अधिकारी बदलतो. ३ वर्षांपासून क्रिकेट स्टेडियमची योजना राबवतोय काय ही मोठी शंका आहे. इतकी मोठी क्रिडानगरी होईल. बालेवाडीचे पण क्रिकेट स्टेडियम झाले आहे. मनात म्हणतो क्रिडा नगरीत प्रवेश करतोय का? लोकांची सुद्धा भरती केली होती. शासनाकडून ज्यांची नियुक्ती केली गेली, मोठमोठे प्रोजेक्ट करायचे नियोजन केले गेले. सध्या काय परिस्थिती आहे. पिंपरी चिंचवडमध्ये इंटरनॅशनल स्टेडियम होते. ७० एकरची जागा आहे. नुसती इच्छा असून चालणार नाही. नुसते क्रिकेट स्टेडीयम न करता चांगले उत्कृष्ट खेळाडू तयार करण्यासाठी ट्रॅक तयार करुन स्टेडीयम तयार केले पाहीजे. खेळाडूला प्रॅक्टीससाठी संधी मिळत नाही. महाराष्ट्रात पहिल्यांदा चांगली योजना चालू करतोय. सायन्स पार्क सुरु झाले. सभासद मनापासून, अंतःकरणापासून प्रयत्न करत असतात. आऊटपुट काय. तिथे वॉचमन कोणी ठेवायचा. ठराव मंजूर होत नसेल, टेन्टेटीव्ह निर्णय होत नसेल तर ती गोष्ट तशीच पडून राहील. लाखो रुपये खर्च केलेतरी काय साध्य होणार. चांगला प्रयत्न करायचा असेलतर शुल्लक गोष्टींकडे न बघता चांगल्या पद्धतीने वापर केला गेला पाहीजे. आत्ता प्राधिकरणाचा विषय निघाला. मा.आप्पा बारणे यांनी वेंगसरकर अकॅडमीचा विषय केला. पिंपरी चिंचवडमध्ये किती मुले तयार झाली. त्यांनी सुद्धा पिंपरी चिंचवडचे नाव चांगले केले. त्या अकॅडमीत पिंपरी चिंचवडच्या किती विद्यार्थांना लाभ मिळणार ते पाहीले पाहीजे. किती मुलांना संधि द्यायची वेळ आली. मगर स्टेडीयमची २७ एकर जागा कोणत्याही अकॅडमीला देऊ नका. पिंपरी चिंचवड भागातील सगळ्या खेळाडूंना खेळता आले पाहीजे. माझी उपसूचना आहे, क्रिकेट व्यतिरिक्त अन्य खेळही सदर स्टेडीयमवर अन्य खेळांसाठी ग्राऊंड तयार करणेत

येऊन खेळ खेळविण्यात यावेत. सदर स्टेडियम कोणत्याही †Û¼›´ÖßÃÖÖŠß देणेत येऊ नये यास मान्यता देणेत यावी.

**मा.धनंजय आल्हाट** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, एक प्रश्न आहे. मा.विधी समितीतून विषय आला हे. अनेक वेळा चर्चा सुद्धा झाली हे. वाढीव खर्चासंदर्भात माहिती द्यावी. परंतू शर्मा साहेबांच्या काळात यावर चौकशी समिती नेमण्यात आली होती. या कामासंदर्भात काय अहवाल आहे. सदस्यांना माहिती दिलीतर बरेच काही निष्पन्न होईल. विषय मंजूर करावा अशी विनंती आहे.

**मा.भाऊसाहेब भोईर** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, महापौरांना नम्र निवेदन करतो. अनधिकृत बांधकामांसंदर्भात बोलताना विरोधी पक्षनेते असतात, काँग्रेस आय पक्ष, शासन आमचे, मुख्यमंत्री आमचे आहेत. त्याबाबत भाष्य केलेतरी पत्र देणे गरजेचे असते. याठिकाणी मगर स्टेडियम संदर्भात भावना निगडीत आहेत. मैदानी खेल केलेले आहेत. अकॅडमी काय प्रकार आहे. एक अकॅडमी केली आहे त्याचे आऊटपुट काही नाही काय. चर्चा न करता विषयाला मंजुरी दिलेली आहे. शहरात यापुढील काळात अकॅडमी असू नये. करायचीच असेल तर स्वतःची जागा घ्यावी, पैसे खर्च करावेत. मगर स्टेडीयम संदर्भात मा.चाबुकस्वार यांनी भूमिका मांडली. क्रिकेटचे मैदान करायचे, कोणाला तरी आनंद द्यायचा. तसे होऊ देणार नाही. महापालिका म्हणजे धर्मशाळा आहे का? मंगलाताईंनी उपसूचना मांडली होती. त्याला अनुमोदन देतो. ट्रॅक करता येतो, असे काही नाही मैदानी खेळ तिथे होऊ शकतात. अद्ययावत स्टेडीयम करा. झोपडपट्टीतील मुलांना सुद्धा क्रिकेट खेळू द्या. मनपाच्या शाळांमध्ये ४६,००० विद्यार्थी आहेत. ज्यांची निवड समितीवर आवजाव होती असे मोठे खेळाडू असतील त्यांना बोलवा. रणजी खेळाडू ते देखील चांगले क्रिकेट खेळतात. पुण्यातली अनेक चांगली मंडळी आहेत. सन्माननियांचा विशेष कालखंड होता.त्यांना इथे बोलवावे. इथे कोंडे साहेबांचा आवर्जून उल्लेख करणे गरजेचे आहे. त्यानिमित्ताने खेळाडू तयार झाले होते. शहराची उंची वाढवणारे एकच स्टेडीयम आहे. मगर स्टेडीयमशी अनेकांच्या भावना निगडीत आहेत. शहर तिथे स्टेडीयम असले पाहीजे. खरेतर यापूर्वी मागणी केली होती. पवार साहेब क्रिडा संघाचे अध्यक्ष झाल्यानंतर इथे अद्ययावत क्रिकेटचे स्टेडियम व्हावे अशी त्यांची इच्छा होती. पिंपरी चिंचवडचे हे स्टेडीयम कोणाला देवू नका, कोणाचा चेहरा बघून देऊ नका. हे करत असताना यातून काहीतरी नियोजन करा. काहीतरी धोरण करा.

पूर्वी ४०० मिटरचा †थलेटीक ट्रॅक सुद्धा तिथे होता. २ कोटींचे अनुदान देतो. सर्व प्रकारचे खेळ तिथे नाहीत. हे स्टेडियम चुकून देखील कोणाला देऊ नये. मा.मंगलाताईंनी जी उपसूचना मांडली त्याला अनुमोदन आहे.

**मा.श्रीरंग बारणे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, जवळपास स्टेडीयमबाबत २८ एकरचा सर्व परिसर कामगार कल्याण मंडळाच्या ताब्यात मिळाला आहे. त्याबदल्यात काही जागा महापालिकेने देऊ केली होती. रोख रक्कम देऊन स्टेडीयम ताब्यात घेतल्यानंतर या महापालिकेचे उपआयुक्त म्हणून श्री. आर.बी. कोंढे होते. त्यांच्या कारभारात महापालिकेत आयुक्तांचे सुद्धा काही चालत नव्हते. त्यांनी अतिशय सक्षमरित्या, चांगल्या पद्धतीने कारभार केला. परंतू त्याठिकाणी त्यांच्या मार्गदर्शनाखाली स्पोर्टस् लायब्ररी केली होती. आज त्याची परिस्थिती फार वाईट झालेली आहे. एकवेळ होती, जगभरातील सगळ्या खेळाडूंची माहिती संकलित केली होती. पवार साहेबांनी ही लायब्ररी पाहून शब्द व्यक्त केले, राज्यात काय पण देशभरात नाही अशी अतिशय चांगल्या प्रकारची लायब्ररी महापालिकेने केली त्याबद्दल धन्यवाद द्यावेत तेवढे कमी आहेत. आज या स्टेडीयमबाबत बरीचशी चर्चा झाली. त्यावेळी श्री.बंड आयुक्त असताना ४००/५०० एकर जागेत पुनर्वसनाचा प्रकल्प राबविला गेला. त्यावेळी मी विरोध केला होता. कामगार मंडळाची जागा घेऊन ४५०० झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन योजनेचा बेकायदेशीर प्रकल्प राबवतोय. त्यावेळी विरोध झाला नव्हता. आज मगर स्टेडीयमची परिस्थिती अतिशय दयनीय आहे. खर्च केला गेला. नंतरच्या कालावधीत स्टेडीयमची देखभाल दुरुस्ती होते का याकडे कोणी पाहीले का. आज परिक्षक नेमले जात नाहीत. साई चे कोच होते. तेव्हा अकॅडमी चालू होती. चांगल्या पद्धतीने खेळाडू खेळवले जात होते. एखादा अधिकारी गेल्यावर तो प्रकल्प दूर जातो. हा त्याकडे पाहण्याचा दृष्टीकोण होतो. सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे सगळ्या खेळांचा प्रसार केला पाहीजे. दिलीप वेंगसरकर यांचे नाव घेऊन उल्लेख केला. त्यांनी कधी देखील शहरात येऊन अकॅडमी उघडण्याबाबत सांगितले नव्हते. मा.अजित पवार यांनी स्वतः सांगितले होते, स्पोर्टस् अकॅडमी करायची आहे. पुणे परिसरात कुठेतरी जागा दाखवा. आयुक्तांनी सांगितले, ही जागा पाहा. यावरुन एवढे बंबाळ उठले. चांगली मुले घडतात. देश पातळीवर २ मुले खेळायला गेली होती. २ मुले आयपीएल मध्ये खेळतात. एक रुपया सुद्धा विद्यार्थ्यांकडून घेत नाही. ड्रेसपासून सगळे पुरवले जाते. या प्रकल्पावर महापालिकेचा एक रुपया सुद्धा खर्च होत नाही. अशा प्रकल्पांविषयी चर्चादेखील

झाली नाही पाहीजे. परंतू मगर स्टेडीयमबाबत जातीने लक्ष घालावे. या प्रकल्पावर केलेला खर्च, पाठीमागे सुद्धा चांगला खर्च केला असताना अधिकारी बदलले म्हणून खर्च वाया गेला, का, याला कोण जबाबदार आहे. यात लक्ष घातले पाहीजे. कॉन्फरन्स रुम तयार करण्यात आली होती. त्यांच्यावर लाखो रुपये खर्च केले होते. केवळ खर्च न करता त्याची देखभाल दुरुस्ती, भविष्यात लोकांना परिक्षक कायम स्वरुपात पाहीजेत. त्यांना जबाबदारी दिल्यानंतर तो ती पार पाडेल सुद्धा. तिथे कायम स्वरुपात परिक्षक नेमले गेले पाहीजेत. भविष्यात त्यांचे काय. मनपाला खेळाडूंची किंमत पाहीजे. मा.महेश दादांच्या भाषणाकडे वळतो. खरेतर महाराष्ट्रीयन मनुष्य हा खेळावर प्रेम करणारा आहे. या खेळाडूंना कबड्डी खेळताना रात्री १२ वा. पहा. शहराच्या दृष्टीकोणातून अभिनंदनीय बाब आहे. देशाबाहेर गेलेल्या खेळाडूला मनपाकडून अपमानास्पद वागणूक मिळते हे मनपाच्या दृष्टीकोणातून लांच्छनास्पद आहे. कायद्याच्या चौकटीला धरुन काही गोष्टी केल्या गेल्या पाहीजेत. खेळाडूचा अपमान प्रशासनाकडून होत असेल तर ते अतिशय चुकीची बाब आहे. केवळ महेश दादाच नाही. संपूर्ण खेळाडूंचा अपमान तिथे झाला होता. पिंपरी चिंचवड शहराचा अपमान झाला होता. मनपाच्या वतीने झाला आहे. कोट्यावधी खर्च होतो. घुसखोर घुसतो. त्याला बाहेर काढत नाही. खेळाडूचा अपमान होता कामा नये. तमाम पिंपरी चिंचवडकरांचा, शहराचा अपमान आहे. यापुढे कोणत्याही खेळाबाबत वेगळ्या नजरेने पाहता कामा नये.

**मा.भारती फरांदे** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक -२७३ विषय क्रमांक - १२
दिनांक -९/५/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भः- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र कप्र/स्था/का.अ./२००/२०१३,दि.०१/०४/२०१३
२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.१३३ दि.८/४/२०१३

आण्णासाहेब मगर स्टेडियम येथे क्रिकेट मैदान तयार करणेच्या कामाच्या (मूळ निविदा र.रु.५८,९८,२४६/-) र.रु.७३,३८,२३४/-चे सुधारित अंदाजपत्रकास व र.रु.१०,०७,९७४/- चे वाढीव खर्चास मान्यता देणेत येत आहे.

तसेच क्रिकेट व्यतिरिक्त अन्य खेळही सदर स्टेडीयमवर अन्य खेळांसाठी ग्राऊंड तयार करणेत येऊन खेळ खेळविण्यात यावेत. सदर स्टेडियम कोणत्याही †Ûú›´ÖßÃÖöŠß देणेत येऊ नये यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकुल - ७०                    प्रतिकुल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.प्रतिभा भालेराव** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -२७४                    विषय क्रमांक - १३
दिनांक - ९/५/२०१३                    विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र जेएनएनयुआरएम /०३/कावि/ २२८/२०१३, दि.०५/०४/२०१३
२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.१३४ दि.८/४/२०१३

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान (JNNURM) योजने अंतर्गत नवीन कामांचे अहवाल राज्य व केंद्रशासनाकडे प्रकल्पांचे प्रस्ताव खालीलप्रमाणे सादर केलेल्या योजनांपैकी ज्या योजनांना केंद्रशासनाकडून मान्यता मिळेल त्यासाठी ५०% निधी अनुदान म्हणून केंद्रशासन व राज्य शासनाकडून २०% निधी अनुदान म्हणून पुढील २ वर्षात उपलब्ध होईल तरी केंद्रशासनाकडून व राज्यशासनाकडून अनुदान मिळण्याच्या दृष्टीने प्रस्तावात नमुद कामांना प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | ताथवडे गाव येथे पाणीपुरवठा करणे.<br>Water Supply Scheme for Tathwade under Scruting with SLNA | ६५.३५ कोटी |
| २ | बसेस व बसस्टॉपसाठी आय.टी.एस. प्रणाली उभारणी करणे.<br>Intelligent Transport Management System for BRTS | ४९.७१ कोटी |
| ३ | बी.आर.टी.एस. बसस्टेशन्स. BRTS - Bus Station | ३३.६५ कोटी |
| ४ | पिंपरी चिंचवड मनपा नव्या हद्दीतील गावामध्ये | ९७.३७ कोटी |

| | | |
|---|---|---|
| | उर्वरित ठिकाणी मलनि:सारण नलिका टाकणे. Sewerage System for newly developed area of PCMC | |
| ५ | पिंपरी चिंचवड शहरामध्ये ( २४ x ७ प्रमाणे) पाणी पुरवठा करणे. Continuous ( 24 x 7 ) Pressurised water supply Project. | २१३.७५ कोटी |
| **एकूण रक्कम रुपये** | | **४५९.८३ कोटी** |

**मा.अरुणा भालेकर** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.उल्हास शेट्टी** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,या विषयासंदर्भात बोलायचे आहे. त्यामध्ये जेएनएनयूआरएममधील कामांची अंमलबजावणी करतो. वारंवार या निदर्शनास आणून देतो. अजंठा नगर मध्ये जेएनएनयूआरएम अंतर्गत प्रकल्प उभा केलेला आहे. गेले ३ ते ४ वर्षांपूर्वी ४ ते ५ बिल्डींग रेडी होत्या. त्याठिकाणी पुनर्वसन करायचे काम मागे पडतेय. कोणाची वाट बघतोय. खरा विकास करायची वाट बघतोय. बिल्डींग झाल्यानंतर पुनर्वसन करा याची आम्ही वाट बघतोय. मी निवडून आल्यापासून गावडे साहेबांकडे पाठपुरावा करतोय. पाटील, तांबे साहेबांकडे पाठपुरावा करतोय. याच मिटींगमध्ये या गोष्टी निदर्शनास आणून दिल्या. तुमचे पत्र गेल्यावर करतो, कशासाठी पेंडींग ठेवतात. एनव्हायरोमेंटची परमिशन आल्याशिवाय अलॉट करता येणार नाही. एक महिन्याने पैसे येणार आहेत. पत्राशेडमध्ये पुनर्वसन करणार आहोत. महापालिकेकडे पैसे भरले होते. गावडे साहेब इथे साक्षीदार आहेत. विचारु शकता. सोसायटी झाल्यानंतर पुनर्वसन करणार नाही का? ४ बिल्डींग ३ ते ४ वर्षांत खोल्या पडल्या आहेत. ५ वर्षांत अशाच काचा फोडल्या होत्या. नाही, मागणी होते. वेगळेच बघतोय, घुसखोरी कोणी करायची, आपण पुनर्वसन करायचे. गावडे साहेबांकडे पुन्हा पत्र देतो. घुसखोरांना कुठेतरी थांबवले पाहीजे. आपला उद्देश्य साध्य होत नाही. मिटिंगमध्ये फीडबॅक घेता. प्रश्न विचारल्यानंतर आदेश दिल्यानंतर १४ महिने झाले. पहिल्या दिवसापासून विनंती करतोय, ही घुसखोरी झाली ती करण्यासाठी घुसखोरांना संधी देतोय. पुनर्वसन प्रकल्पाचे ध्येय्य साध्य होण्यासाठी रिझर्वेशन प्लॉटवर भाजीमंडईचा प्रकल्प राबवू शकतो. भाजीवाले रोडवर बसतात. त्यांचे पुनर्वसन होणार आहे. लोड कमी होणार आहे. नगरसेवकाला वाटेल काहीतरी काम केले. ओपीडी चालू करण्यासाठी विनंती केली, पत्र दिले. मागील मिटींगमध्ये सपकाळ नावाच्या माणसाला गाळे देण्यात

आले. तो बाकी १५ गाळे घेणार होता. तिथे घुसखोरी आहे. असे होत असताना त्याकडे लक्ष द्यायचे का नाही. आपले उत्पन्न कमी होत नाही. ईललिगल कन्स्ट्रक्शन केलेली गोरगरीबांची घरे पाडतो. महापालिकेच्या ऑफीशियल प्रॉपर्टीत घुसखोरी करुन लोक वर्षानुवर्षे राहतात तिथे ओपीडी चालू करता येणार नाही का? पुढे काय पुढे काही होत नाही. तुमच्या कामाचा एवढा पसारा आहे. भाजीमंडई त्याचे काही झालेले नाही. पवार साहेबांना पत्र दिले. बागल यांच्याकडे पाठविले काय परिस्थीती आहे. ५२ गाळे खाली पडले आहेत. आपल्याला उत्पन्न नको का? एलबीटीसारख्या विषयावर चर्चा करतो. आपली स्वतःची प्रॉपर्टी घुसखोरी करुन खाली ठेवताय. तुमचे अधिकारी कुठपर्यंत होते. त्यांना करता येत नाही. प्रोटेक्शन पाहीजे होते. अजंठानगरमध्ये गेलोतर समोरची परिस्थिती वाईट होती. माझ्या वॉर्डात काहीच नाही. फक्त डांबरी रस्ता आहे. तिथे परिस्थिती इतकी वाईट आहे. थरमॅक्स चौकातून ६-६ महिने स्लो †ण्ड स्टेडी काम चालू आहे. परत प्रश्न उपस्थित राहणार आहे. मंगलाताई नेहमी म्हणतात, बिल्डींग परमिशनमध्ये छोटे छोटे शॉपिंग गाळे बांधायचे ठरले होते. आपले अधिकारी बांधू शकत नाहीत. आपल्या जागेत झोपडपट्टीतील लोक पत्रा ठोकून बसले आहेत. त्यांचे पुनर्वसन कधी होणार? प्लॅन सँक्शण्ड होतो. आपण सगळे करताय. पुढील गोष्टी अधिकारी करत नाहीत. लोक आंदोलने करतात, मोर्चे काढतात. त्यांनी पैसे भरले आहेत. आपण प्रकल्प पूर्ण करु शकत नाही. त्यांना ५० टक्के लोकांना घरे देऊन टाका. प्रामाणिक विनंती आहे, ४ बिल्डींग्ज् आहेत. तुम्ही ताबडतोब यांचे पुनर्वसन करावे. माझी प्रामाणिकपणे नम्र विनंती आहे. प्रश्नोत्तरांच्या तासात मा.आर.एस.कुमार यांनी प्रश्न उपस्थित केला होता की, सेक्टर २२ मध्ये निगडी योजनेत संबंधित लोकांचे टेंडर काढले होते. दि.१.३.२००८ मध्ये निविदा रक्कम ४८ टक्के त्यावेळी दिली होती. दि.२६.७.२००८ रोजी कृष्णाजी कंपनीचे ७५ टक्के काम झाले, हे काम पेंडींग आहे. आज प्रशासकीय मान्यता घेतोय. काम करा, डेव्हलप करा. त्यानंतर पुढे काय. ५० टक्के अबोव्ह टेंडर आहे. यात काय गौडबंगाल आहे. बिलोवाल्यांकडे बोट दाखवतात. इथे भ्रष्टाचार झाला. याची मुदत काय. आजपण ७५ टक्के विद्युतची कामे पेंडींग आहेत. निगडीचे २६.७ टक्के जास्त टेंडर काढले आहे. ३० टक्के काम झाले आहे. सूरज कॉन्ट्रॅक्टर याबद्दल कोण विचारणार. गोरगरीबांबद्दल विचार करतो. या गोष्टींकडे कोण लक्ष देते का? ईललिगल कन्स्ट्रक्शन असू द्या. बाकीच्या गोष्टींचा विचार कोणी करत नाही. लोकप्रतिनिधी म्हणून १४ महिने झाले तरी काही काम झालेले नाही. थरमॅक्सच्या रोडचे काम पेंडींग आहे. पुनर्वसनाचे काम बाकी

आहे. विद्युतचे काम बाकी आहे. डांबरीकरण बाकी आहे. याला जबाबदार कोण**?** संबंधित अधिकारी म्हणतात, कृपा करुन विनंती करतो. जी.बी. काही बोलू नका. तुमची व योगेश भाईंची जुगलबंदी चालली आहे. आम्हाला बघायला मिळते आहे. नगरसेवक म्हणून कामे करत असताना गोरगरीबांची आमची कामे व्हायला पाहीजेत. शहराची डेव्हलपमेंट व्हायला पाहीजे. अधिकारी वर्गाला आदेश द्यावा की, हे काम लवकरात लवकर व्हावे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ७० प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सुजाता पलांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - २७५ विषय क्रमांक - १४
दिनांक - ९/५/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.नारायण बहिरवाडे, मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव -
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.८१ दिनांक ०६/०३/२०१३
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.२४७ दि.२२/३/२०१३

मंजूर विकास योजनेतील मौजे थेरगांव हद्यीतील सर्व्हे नं.३३ ते ३६ पै. मधून मोरया मंगल कार्यालयाकडे जाणा-या २४ मी. रुंद रस्त्यापासून थेरगांव स्मशानभूमी पर्यंत १२ मी. रुंद रस्ता व स्मशानभूमी ते थेरगांव गावठान २४ मी. रस्त्यापर्यंत सध्या अस्तित्वातील रस्ता ९ मी. रस्ता रुंद केल्यास नागरिकांची स्मशानभूमीकडे जाण्यासाठी त्या भागातील नागरिकांना रस्त्याची सोय होणार असल्याने सदरचा रस्ता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेस तसेच मंजूर विकास योजनेतील मौजे थेरगांव हद्दीतील सर्व्हे नं.२५ व ३० मधून जाणारा १२ मीटर रस्ता सर्व्हे नं. २५ मध्ये अस्तित्वातील रस्त्याजवळ वाकडया वळणाचा असल्याने सदरचा रस्ता वाहतूकीच्यादृष्टीने सरळ

करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.अमिना पानसरे** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.मंदाकिनी ठाकरे** - मा.महापौर साहेब सदर विषय क्र. १४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

**मा.सुजाता पलांडे** - सदर उपसुचना स्विकारली आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

विषय क्रमांक १४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ७० प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पलांडे:-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक १५

दिनांक - ९/५/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.नारायण बहिरवाडे, मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव -

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.८२ दिनांक ०६/०३/२०१३

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.२४८ दि.२२/३/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेनुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, अधिसुचना क्र.टीपीएस-१८१०/२४५८/प्र.क्र.१६/११/नवि-१३, दिनांक १४/०५/२०१२ अन्वये मौजे किवळे येथील सर्व्हे नं.४० मधील मंजूर विकास योजनेमधील १५ मी. रुंदीचा दक्षिण उत्तर रस्ता तसेच (एम.४-२०) प्रमाणे शिफटेड रोड रद्द करुन सदर रस्त्याने बाधीत क्षेत्र निवासी विभागात समाविष्ट करण्याची मागणी संबंधीत सर्व जागेच्या मालकाची असल्याने व सदर जागेचे एकच जागामालक असून त्यांचे मागणीनुसार सदर प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना

अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.अमिना पानसरे** – मा.महापौर साहेब, सदर विषयाला अनुमोदन आहे.

**मा.शत्रुघ्न काटे** - मा.महापौर साहेब, मी उपसूचना मांडतो -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास आराखड्यातील मौजे सांगवी येथिल स.नं.७१ ते ७६ चे सोबत जोडलेल्या नकाशात दर्शविलेले १८ मी. रस्त्याच्या पूर्वेकडील हरित पट्ट्यातील क्षेत्र हे शासकीय निमशासकीय विभागात समाविष्ट करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वयेची कार्यवाही करण्यासाठी तसेच नागरिकांकडून हरकती, सूचना मागवुन शासनाच्या मंजुरीसाठी अंतिम प्रस्ताव शासनास सादर करण्याचे सर्व अधिकार आयुक्तांना प्रदान करण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.प्रशांत शितोळे** - सदर उपसुचनेस अनुमोदन देतो.

**मा.सुजाता पलांडे** - मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक **:-** २७६ विषय क्रमांक - १५
दिनांक -९/५/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.नारायण बहिरवाडे, मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव -
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.८२ दिनांक ०६/०३/२०१३
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.२४८ दि.२२/३/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेनुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, अधिसुचना क्र.टीपीएस-१८१०/२४५८/प्र.क्र.१६/११/नवि-१३, दिनांक १४/०५/२०१२ अन्वये मौजे किवळे येथील सर्व्हे नं.४० मधील मंजूर विकास योजनेमधील १५ मी. रुंदीचा दक्षिण उत्तर रस्ता तसेच (एम.४-२०) प्रमाणे शिफटेड रोड रद्द करुन सदर रस्त्याने बाधीत क्षेत्र निवासी विभागात समाविष्ट करण्याची मागणी संबंधीत सर्व जागेच्या मालकाची असल्याने व सदर जागेचे एकच जागामालक असून त्यांचे मागणीनुसार सदर प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना

अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास आराखड्यातील मौजे सांगवी येथिल स.नं.७१ ते ७६ चे सोबत जोडलेल्या नकाशात दर्शविलेले १८ मी. रस्त्याच्या पूर्वेकडील हरित पट्ट्यातील क्षेत्र हे शासकीय निमशासकीय विभागात समाविष्ट करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वयेची कार्यवाही करण्यासाठी तसेच नागरिकांकडून हरकती, सूचना मागवुन शासनाच्या मंजुरीसाठी अंतिम प्रस्ताव शासनास सादर करण्याचे सर्व अधिकार आयुक्तांना प्रदान करण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकुल **-** ७० प्रतिकुल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.सुजाता पलांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - २७७ विषय क्रमांक - १६
दिनांक - ९/५/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/सांगवी ड-२/६८/ २०१३, दि.८/३/२०१३
२) मा.शहर सुधारणा समिती ठ.क्र.८४ दि.८/४/२०१३

मौजे सांगवी येथील स.नं.९ व सांगवी गावठाण हद्दीवरील मंजूर विकास योजनेतील प्रस्तावित केलेल्या ६.०० मी.रुंद रस्त्याने बाधीत होणा-या जमिनीचे संपादन महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ (१) क किंवा १२६ (१) ग अन्वये करावे लागणार असल्याने सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करणेस तसेच सदर भूसंपादन प्रस्ताव महानगरपालिकेच्या वतीने सादर करणेचा अधिकार मा.आयुक्त यांना देणेत येत आहे.

**मा.अरुणा भालेकर** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकुल - ७० प्रतिकुल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे** :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक १७

दिनांक - ९/५/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :-१) मा.नितीन काळजे, मा.सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव

२) मा.शहर सुधारणा समिती ठ.क्र.८५ दि.८/४/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राच्या सन २००८ व २००९ च्या भागश: मंजूर विकास योजनेनुसार मौजे चिखली येथील देहु-आळंदी रस्त्याला समांतर व कमर्शिअल झोन C2 चे शेजारुन देहू-आळंदी बीआरटीएस रस्ता व कुदळवाडी बीआरटीएस यांना जोडणारा ३० मी. रस्ता मंजूर झालेला आहे. देहू-आळंदी रस्त्यावरील सद्यस्थितीतील व भविष्यातील वाहनांची वर्दळ/घनता याचा विचार करता कुदळवाडी बीआरटीएस रस्त्यामधील गट क्र.८७९ ते देहू –आळंदी बीआरटीएस रस्त्यामधील गट नं. १५६९ पर्यंतच्या ३० मी. रुंद रस्त्याने बाधीत होणा-या क्षेत्राचे भूसंपादन होणे आवश्यक असल्याने सदर रस्ता रुंदीकरणाने बाधित जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूसंपादन अधिनियम १८९४ च्या तरतूदी अंतर्गत भूसंपादन करणेकामी सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेस व याकामी येणा-या खर्चास (संबंधित भूमिसंपादन अधिकारी कळवतील ती नुकसान भरपाईची रक्कम) मान्यता देणेत येत आहे.

**मा.अमिना पानसरे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.सुरेश म्हेत्रे** - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीच्या विकास योजनेत मौजे तळवडे येथिल त्रिवेणीनगर चौकात ९०.०० मी. रुंद रस्ता प्रस्तावित करण्यात

आलेला आहे. सदर ९० मी. रुंद रस्त्याच्या दोन्ही टोकांकडे पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजूर विकास योजनेतील ७५.०० मी. रुंद रस्ता प्रस्तावित आहे. त्यानुषंगाने महापालिकेच्या विकास योजनेतही सदर ठिकाणी ९०.०० मीटरऐवजी ७५.०० मीटर रस्ता प्रस्तावित करुन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करणेकामी दि.२०/१२/२०१२ च्या मा.महापालिका सभेमध्ये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १-के अंतर्गत विषय दाखल करणेत आला होता. त्यास माहे २२ मार्च २०१३ च्या मा.महापालिका सभेमध्ये विषय क्र.१४ अन्वये मंजूरी देण्यात आलेली आहे. तरी मा.महापालिका सभेमध्ये ७५.०० मी. रुंद रस्त्याच्या आखणीस मान्यता दिल्याप्रमाणे भूसंपादन करणे आवश्यक आहे. तरी ७५.०० मी. रुंद रस्त्याने बाधित होणा-या क्षेत्राचे भूसंपादन, भूसंपादन अधिनियम १८९४ च्या तरतूदी अंतर्गत भूसंपादन करणेकामी सदर रस्त्याचा भुसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेस व याकामी येणा-या खर्चास (संबंधित भूमिसंपादन अधिकारी कळवतील ती नुकसान भरपाईची रक्कम) मान्यता देणेत यावी.

**मा.मंदाकिनी ठाकरे** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.सुजाता पलांडे** - मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - २७८ विषय क्रमांक - १७
दिनांक - ९/५/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :-१) मा.नितीन काळजे, मा.सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव
२) मा.शहर सुधारणा समिती ठ.क्र.८५ दि.८/४/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राच्या सन २००८ व २००९ च्या भागश: मंजूर विकास योजनेनुसार मौजे चिखली येथील देहु-आळंदी रस्त्याला समांतर व कमर्शिअल झोन C2 चे शेजारुन देहू-आळंदी बीआरटीएस रस्ता व कुदळवाडी बीआरटीएस यांना जोडणारा ३० मी. रस्ता मंजूर झालेला आहे. देहू-आळंदी रस्त्यावरील सद्यस्थितीतील व भविष्यातील वाहनांची

वर्दळ/घनता याचा विचार करता कुदळवाडी बीआरटीएस रस्त्यामधील गट क्र.८७९ ते देहू –आळंदी बीआरटीएस रस्त्यामधील गट नं. १५६९ पर्यंतच्या ३० मी. रुंद रस्त्याने बाधीत होणा-या क्षेत्राचे भूसंपादन होणे आवश्यक असल्याने सदर रस्ता रुंदीकरणाने बाधित जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूसंपादन अधिनियम १८९४ च्या तरतूदी अंतर्गत भूसंपादन करणेकामी सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेस व याकामी येणा-या खर्चास (संबंधित भूमिसंपादन अधिकारी कळवतील ती नुकसान भरपाईची रक्कम) मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीच्या विकास योजनेत मौजे तळवडे येथिल त्रिवेणीनगर चौकात ९०.०० मी. रुंद रस्ता प्रस्तावित करण्यात आलेला आहे. सदर ९० मी. रुंद रस्त्याच्या दोन्ही टोकांकडे पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजूर विकास योजनेतील ७५.०० मी. रुंद रस्ता प्रस्तावित आहे. त्यानुषंगाने महापालिकेच्या विकास योजनेतही सदर ठिकाणी ९०.०० मीटरऐवजी ७५.०० मीटर रस्ता प्रस्तावित करुन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करणेकामी दि.२०/१२/२०१२ च्या मा.महापालिका सभेमध्ये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १-के अंतर्गत विषय दाखल करणेत आला होता. त्यास माहे २२ मार्च २०१३ च्या मा.महापालिका सभेमध्ये विषय क्र.१४ अन्वये मंजूरी देण्यात आलेली आहे. तरी मा.महापालिका सभेमध्ये ७५.०० मी. रुंद रस्त्याच्या आखणीस मान्यता दिल्याप्रमाणे भूसंपादन करणे आवश्यक आहे. तरी ७५.०० मी. रुंद रस्त्याने बाधित होणा-या क्षेत्राचे भूसंपादन, भूसंपादन अधिनियम १८९४ च्या तरतूदी अंतर्गत भूसंपादन करणेकामी सदर रस्त्याचा भुसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेस व याकामी येणा-या खर्चास (संबंधित भूमिसंपादन अधिकारी कळवतील ती नुकसान भरपाईची रक्कम) मान्यता देणेत येत आहे.

अनुकुल - ७० प्रतिकुल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पलांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - २७९ विषय क्रमांक - १८
दिनांक - ९/५/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.नितीन काळजे, मा.सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव
२) मा.शहर सुधारणा समिती ठ.क्र.८६ दि.८/४/२०१३

प्रभाग क्र.६ मोशी मधील विकास आराखडयातील पुढील रस्त्यांचे १) विकास आराखडयातील ३० मी. मोशी-देहू रस्त्यालगत उत्तरेकडे जाणारा २४ मी. रस्ता गट नं.१३१४ (जूने) मधून पुन्हा पूर्वेकडे जाणारा १८ मी. रस्ता गट क्र.१३१८, १३२७, १३२१, १३२३, १३२९, १३४६ (जूने) पर्यंत भूसंपादन करणे, २) विकास आराखडयातील १९ मी. मोशी देहू रस्त्यालगत उत्तरेकडे जाणारा १८ मी. रस्ता गट क्र.१३४१, १३४३, १३४६ (जूने) पर्यंत भूसंपादन करणे, ३) विकास आराखडयातील ३० मी. मोशी आळंदी रस्त्यालगत २४ मी.व ३० मी. रस्त्याचे चौकाला जोडून दक्षिणेकडे गट क्र.२९२, २५८, २९३, २९१, २७१ (जूने) पर्यंत भूसंपादन करणे, ४) विकास आराखडयातील ३० मी. रस्ता गट क्र.६९४, ६५८, ६५०, व ६६२ (जूने) पर्यंत पुढे १८ मी. गट क्र. ३६४, ३६७, ३६८, ३७७, ३८० व ३४० (जूने) पर्यंत भूमिसंपादन करणे, ५) विकास आराखडयातील २४ मी. रस्ता गट क्र.४८, ६१, ६२, ६३, ६४ व ६५ (जूने) भूमिसंपादन करणे, ६) विकास आराखडयातील ३० मी. रस्ता गट क्र.६१३, ६१४ व ६१२ (जूने) भूमिसंपादन करणे, ७) विकास आराखडयातील ३० मी. रस्ता गट क्र.७५१, ७५३, ७४६, ७३२, ७२२ व ९४० (जूने) भूमिसंपादन करणे, ८) विकास आराखडयातील १८ मी. रस्ता गट क्र.७९१, ७९२, ९३४, ९३३, ९७०, ९६९, ९९२ व ९९३ (जूने) भूमिसंपादन करणे, ९) विकास आराखडयातील १८ मी. रस्ता गट क्र. ५३०, ५३१, ५१८, ५३३, ५३४, ५३६ व ५४० (जूने) भूमिसंपादन करणे, १०) विकास आराखडयातील १८ मी. रस्ता गट क्र. ५०४, ५०६ व ५०७ (जूने) भूमिसंपादन करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.अमिना पानसरे** - महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ७० प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुमन नेटके** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - २८० विषय क्रमांक - १९

दिनांक - ९/५/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.नितीन काळजे, मा.सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव

२) मा.शहर सुधारणा समिती ठ.क्र.८७ दि.८/४/२०१३

प्रभाग समिती ठराव १३८ विषय क्र.३ नुसार प्रभाग क्र.६ मोशी येथील पुणे नाशिक रस्त्यास जोडून गट क्र.५०,५१ व ५३ (जूने) या गटातून पूर्वेकडून जाणारा २० फुटी रुंद २५० मी. लांब रस्ता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये घोषित करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे**- महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ७० प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुमन नेटके**- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – २८१ विषय क्रमांक - २०

दिनांक - ९/५/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.नरवि/कावि/४क/४८८/२०१३ दिनांक २०/२/२०१३.

२) मा.महापालिका सभा ठराव क्र.२५२ दिनांक २२/३/२०१३

ताथवडे गावची विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २१ नुसार तयार करण्यात आली असून अधिनियमानुसार प्रसिध्द करणेकरीता मा.महापालिका सभेपुढे सादर केली आहे सदर विकास योजना प्रसिध्दीनंतर प्राप्त होणा-या सुचनांबाबत सुनावणी देण्याकरिता अधिनियमाच्या कलम २८ (२) अन्वये नियोजन समिती स्थापन करणे आवश्यक असल्याने सदर समितीमध्ये मनपाच्या स्थायी समिती मधील ३ सदस्यांची नेमणूक करणेकरिता प्रस्ताव मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे** - महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ७० प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे**- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २१ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - २८२ विषय क्रमांक - २१

दिनांक - ९/५/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.लेखा/३५/कावि/२००/२०१३, दिनांक ०८/०३/२०१३

२) मा.महापालिका सभा ठराव क्र.२५३ दि.२२/३/२०१३

महाराष्ट्र राज्य वित्त आयोगाचे अध्यक्ष मा.श्री.जे.पी.डांगे (I.A.S.) यांनी त्यांचे शिष्टमंडळासह पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दिनांक १०/०६/२०१२ रोजी भेट देऊन चौथ्या वित्त आयोगा संबंधी विविध विषयांवर चर्चा करुन ७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीनुसार महापालिकेस जी १९ कर्तव्ये/जबाबदा-या नेमून दिल्या आहेत. त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची ४ था वित्त आयोगासंदर्भात १० मुद्दांची विषयसुची तयार करुन सर्व संबंधित विभागांना पाठविणेत आली असून त्या विषय सुचीस मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुमन नेटके** - महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.विलास नांदगुडे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, हा विषय याठिकाणी आपण ठेवलेले आहे. वित्त आयोग शासनाला संपूर्ण माहिती सादर करतो. आपले महसूल उत्पन्न किती असेल, खर्च किती होणार आहे. भांडवली खर्चासाठी किती पैसे शिल्लक राहणार आहेत. २०११ पासून २०१६ पर्यंत सविस्तर माहिती महाराष्ट्र वित्त आयोगाला सादर करतो. त्यामध्ये श्री. डांगे यांचे शिष्ट मंडळ येऊन गेले. त्यानुसार संपूर्ण प्रस्ताव तयार करुन सभागृहापुढे ठेवला होता सभागृहाच्या लक्षात आणून द्यायचे होते. २००८-०९ साठी वरीष्ठ अधिका-यांची समिती नियुक्त केली. त्या समितीच्या सदस्यांचे नाव याठिकाणी नाही. समिती सदस्य कोण आहेत. समितीने अहवाल दिलेला आहे. सक्षम दिला आहे का. याविषयी संशय निर्माण होतो. २००८ ला ही समिती नियुक्त केली. मनपाला अहवाल सादर केला. ०८-१३ पर्यंत समितीच्या अहवालाची अंमलबजावणी का केली नाही. आधीच्या आयुक्तांनी त्यांच्याकडून का केली नाही. आपण कार्यक्षम आयुक्त आहात. आज सभापातळीवर विषय ठेवला आहे. त्यामुळे त्या समितीने उत्पन्न वाढवण्यासाठी ज्या सूचना केलेल्या आहेत. काही काही सूचना अतिशय चांगल्या आहेत. त्यात काही त्रुटी आहेत. थोडक्यात सांगतो – सन २०११-१२ ते १५-१६ पर्यंत सगळे नियोजन केलेले आहे. आपल्याकडे अपेक्षित खर्च आपण धरलाय. रु.३९५२ कोटी ८१ लाख धरला आहे. अजून २९३१ कोटी ४ लाख अपेक्षित धरले तरी पैसे शिल्लक राहतात. टोटल पैशांची गरज आहे. १०१९ कोटी ७३ लाख कमी पडतात. विकास कामांसाठी खर्च करण्यासाठी त्यामध्ये १४-१५ मध्ये महसूली खर्च दाखवला आहे. तो उत्पन्नाच्या ५५ ते ६० टक्के खर्च सुद्धा चुकीचा वाटतोय. इथे महसूली खर्च दिला आहे. असे माझ्या निदर्शनास येते. आज कितीतरी कर मनपाकडून लावतोय. सामान्य मनुष्यावर कर लावतोय. अनेक प्रकारचे कर लावतोय. पुन्हा समितीने सुचवले होते. रस्ताकर व पाणीपुरवठा लाभकर इनक्लूड करा. प्रामाणिक मनुष्य कर भरतो. त्याच्यावर किती भार टाकणार याचा सुद्धा गांभिर्याने विचार केला पाहीजे. कोण मनुष्य कर भरत नाही. त्याची आर्थिक परिस्थितीमुळे तो कुठेतरी अडचणीत येतो. कुठेतरी आजारी पडतो. त्यामुळे तो हे कर भरत नाही. २ टक्के शास्ती आकारणार का हे सुद्धा चुकीचे आहे. २ टक्के म्हणजे सावकारापेक्षा जास्त व्याज झालेले आहे. मागिल वर्षी १,३७,९२,००० निव्वळ धंद्यापोटी व्यवस्था केलीतरी जागतिक बँकेने आपल्याला दि. ५.२.१० साली २०९ कोटींचे कर्ज मंजूर केले होते. त्याचे व्याज किती याचा उल्लेख प्रस्तावित नाही. किती दराने व्याज मिळतेय. २ टक्के असेल

तर फायदा आहे. त्याचे व्याज जास्त आहे का. २०९ कोटींपैकी ६२ कोटी ७६ लाख उचललेले आहेत. २०१५-२५ पर्यंत परतफेड करायची आहे. संपूर्ण रक्कमेची आपण व्यवस्था केली पाहीजे. ते आपण वापरले पाहीजेत. आपण का विरोध करतोय. एखादा प्रोजेक्ट रखडला. १५ ते २० टक्के केसेसमध्ये अमाऊंट देतो. प्रॉपर खर्च द्यायला तयार आहोत. परंतू ४टक्के पैशाचा वापर नाही. कारण एकच त्यात कमिशन काही मिळणार नाही. कमिशन वाढवून देताना निश्चितच कॉन्ट्रॅक्टर तुम्हाला पैसे देणार नाही हा विचार गांभिर्याने करावा. भूमि आणि जिंदगी विभाग सक्षम झाला पाहीजे. उत्पन्न वाढवायचे असेल तर टॅक्स वाढवतोय. स्वतःचे उत्पन्न कुठे वाढवतोय. जिथे भाजी मंडईत गेलो, व्यायामशाळेत गेलोतर जिथे कष्टाचे काम आहे, त्रास होणार आहे, तिथे दुर्लक्ष करतोय. यावर कॉन्सनट्रेट करुन तेथे इन्कम कसा वाढेल याचा विचार आपण केला पाहीजे. आज नुसते हॉकर झोन करायचे आहे असे १० वर्षांपासून ऐकतोय. हॉकर झोन झाला का. कुठे झाला नाही. या माध्यमातून याठिकाणी उत्पन्न मिळवण्याचा प्रयत्न केलेला नाही. हा विचार याठिकाणी करावा. महापालिकेच्या मोकळ्या जागांवर, अनेक लोक रस्त्यावर वाहने लावतात. मनपाच्या मोकळ्या जागा असतील तर पे †ण्ड पार्क केले तर त्यातून सुद्धा मनपाला उत्पन्न मिळणार आहे. ख-या अर्थाने कष्ट करायचे तिथे फोकस करावा. जास्तीत जास्त उत्पन्न वाढावे. नागरीक प्रामाणिकपणे कर भरतात. त्यांच्यावर पुन्हा पुन्हा कर आकारणी करु नये ही विनंती आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ७० प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे**- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - २२

दिनांक - ९/५/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/१/कावि/३०१/२०१३ दि.६/२/२०१३.

२) मा.क्रीडा समिती सभा दिनांक २१/२/२०१३ ठराव क्र.४७.

३) मा.विधी समिती सभा दिनांक १/३/२०१३ रोजी ठराव क्र.१२४

४) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.३०६९ दिनांक १२/३/२०१३

५) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/१/कावि/६१५/१३ दि.१९/३/२०१३

६) मा.महापालिका सभा ठराव क्र.२६० दि.२२/३/२०१३

प्रस्तावात सविस्तर क्रिडा धोरण मसुदा परिशिष्ट-अ, क्रिडा धोरण मसुदा परिशिष्ट-ब, क्रिडा धोरण मसुदा परिशिष्ट-क, क्रिडा धोरण मसुदा परिशिष्ट-ड, मध्ये नमुद केलेप्रमाणे मनपा क्रिडा धोरण मसुद्यास तसेच ३ डिसेंबर अपंग दिनानिमित्त अंध, अपंग, व मतिमंद विद्यार्थ्यांच्या क्रीडा स्पर्धा आयोजित करणेकामी परिशिष्ट अ/ब मध्ये नमूद तपशिलाचा मूळ धोरण मसुद्यात समावेश करुन परिपूर्ण क्रीडा धोरण मसुद्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा. सुमन नेटके** - अनुमोदन देते.

**मा.रामदास बोकड –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, या विषयाच्या अनुषंगाने क्रिडा विभागाच्या वतीने पिंपरी चिंचवड शहरातील खेळाडूंसाठी आत्ताच याठिकाणी आमचे सहकारी सन्मा.महेश लांडगे यांनी भूमिका मांडली. त्यांचे समर्थन करतो. त्यांना धन्यवाद देतो. त्याच विषयाच्या अनुषंगाने कमिशनर साहेबांना बोलोवले होते. १२-१३ चे बजेट पाहीलेतर शहराचा विचार केलातर तुटपूंज्या बजेटमध्ये खेळाडूचा विकास होईल का. हा त्या अर्थाने खरा प्रश्न निर्माण होईल का निर्माण झाला आहे. ११ कोटी ५४ लाख त्यापैकी ६ कोटी ८० लाख आस्थापनेवर झालेला खर्च बजेटमध्ये खेळाडूंचा काय विकास झाला हे निदर्शनास आलेच आहे. आत्ताच्या पदामागे आदरणीय कमिशनर साहेबांनी एक कमिटी नेमली आहे. क्रिडा विभागाचे अधिकारी किंवा क्रिडा समिती यांच्यावर अंकुश ठेवण्यासाठी समिती नेमली. श्री.कदम, श्री.कारचे, श्री. कुलकर्णी यांनी काय अभ्यास केला याचा अहवाल द्यावा. एका खेळाडूला ८ लाख खर्च येऊ शकतो, त्याठिकाणी देखील तुटपुंजे बजेट ठेवले. फक्त २० लाख निधी ठेवला आहे. यातून खेळाडू घडणार आहेत का. सभागृहाच्या निदर्शनास हा विषय आणून द्यावयाचा आहे. शासन कायद्यानुसार ५ टक्के निधीतून एक उपसूचना ठेवली आहे. क्रिडा विभागाच्या वतीने, माझ्या वतीने ५० कोटींचा निधी विविध योजनांसाठी, शहरातील खेळाडूंसाठी ज्या उपसूचनेद्वारे घेतला आहे. ही उपसूचना देखील अकाऊंटंट विभागाने नाकारली. का नाकारली हा ख-या अर्थाने प्रश्न

आहे. याठिकाणी एकदा कॅल्क्युलेशन सांगायचे आहे. हा देश खेळाडूंचा देश आहे. या देशाचे नाव खेळाडूंमुळे जगात गेलेले आहे. म्हणून महापौर चषक साजरा केला. त्यामध्ये १५-१६ खेळाडूंचा समावेश केला परंतू बजेट पाहीलेतर वाढत नाही. आम्ही यातून खेळाडू घडवणार होतो. म्हणून याठिकाणी पुन्हा एकदा या विषयाच्या निमित्ताने विनंती करतो, आपण सीसीटीव्ही कॅमे-यांसाठी १ विषय मंजूर केला. ३७ कॅमे-यांसाठी दीड कोटी रुपये दिले. त्यासाठी दीड करोड देत असालतर दत्तक योजनेतून ८३ खेळाडूंसाठी १ कोटी द्यायला हरकत नाही. एका खेळाडूसाठी १ लाख खर्च झालातर खरा विकास घडेल. शहरातील खेळाडूंकडे दुर्लक्ष करु नका. मनपाचे खेळाडू खेळापासून,क्रिडा विभागापासून वंचित राहणार नाहीत अशी आशा वाटते. म्हणून सभागृहाच्या निदर्शनास हा विषय आणला आहे. पुन्हा एकदा क्रिडा धोरण आणणार आहोत. क्रिडा विभागात अशाच त्रुटी आहेत. म्हणून सभागृहाच्या वतीने विनंती करतो, पुन्हा एकदा संपूर्ण शहरातील खेळाडू व नागरीकांच्या सूचना क्रिडा धोरणावर मागवाव्यात. त्यात सुधारणा करावी. चांगल्या प्रकारचा मोठा प्रोजेक्ट क्रिडा धोरणावर ठेवावा. नंतरचा विषय मंजूर करावा. तोपर्यंत हा विषय तहकूब ठेवण्यात यावा अशी विनंती करतो.

**मा.राजेंद्र काटे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आत्ता या विषयावर पिंपळे गुरवमधील स्विमिंग टँक 2 महिने बंद होता. रज्जाक पानसरे यांनी काम करुन तो चालू केला. त्यावेळी निदर्शनास आले, स्विमिंग टँक मध्ये आपण जीवरक्षक नेमले आहेत. असे लोक नेमले आहेत ज्यांना पोहायला सुद्धा येत नाही. जीवरक्षक हे पोहणारेच पाहीजेत. तक्रारी ऐकल्या. परिसरात पाहीले तर प्रत्येक टँकमध्ये अशीच परिस्थिती आहे. ज्यांना पोहता येईल, त्यांनाच नेमावे. पिंपळे सौदागरचा टँक चालू झाला. सांगवी इथला बंद पडला, तो लवकरात लवकर चालू करावा अशी विनंती करतो.

**मा.रामदास बोकड** *:-* मा.महापौर विषय क्रमांक २२ चा विचार पुढील सभेचे वेळी करावा.

**मा.राजेंद्र जगताप** *:-* मा.महापौर साहेब सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर उपसुचना स्विकारली.

यानंतर सूचनेप्रमाणे सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - २८३ विषय क्रमांक - २२
दिनांक - ९/५/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जशुकें/वि/३१/२०१३, दि.१९/०१/२०१३
२) मा. विधी समिती सभा दिनांक ०१/०२/२०१३ ठराव क्र.१११ नुसार

विषय क्रमांक २२ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ७० प्रतिकूल -

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------------

**मा.अजित गव्हाणे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - २८४ विषय क्रमांक - २३
दिनांक - ९/५/२०१३ विभाग- मा.आयुक्त

**<u>मा.विधी समिती</u>**

(अ) दिनांक १/३/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
(ब) दिनांक १५/०३/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.नवनाथ जगताप :-** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ७० प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.अजित गव्हाणे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - २८५ विषय क्रमांक - २४

दिनांक - ९/५/२०१३ विभाग- मा.आयुक्त

**<u>मा.महिला व बालकल्याण समिती</u>**

(अ) दिनांक २७/२/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

(ब) दिनांक १३/३/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.नवनाथ जगताप :-** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ७० प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.अजित गव्हाणे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - २८६ विषय क्रमांक - २५

दिनांक - ९/५/२०१३ विभाग- मा.आयुक्त

**<u>मा.शहर सुधारणा समिती</u>**

(अ) दिनांक २०/०२/२०१३, २२/०२/२०१३ व ६/३/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

(ब) दिनांक ६/३/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.नवनाथ जगताप :-** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ७०　　　　प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.महापौर** - सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर करते.

(मोहिनीताई विलास लांडे)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ ***622*** / २०१३
दिनांक - ***07*** /०६/२०१३.

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.